



# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com


एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, शुक्रवार १९ डिसेंबर २०२५ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०





# ज्येष्ठ शिल्पकार महाराष्ट्र भूषण राम सुतार यांचे निधन




**नवी दिल्ली, १८ डिसेंबर (हिं.स.) :** आंतरराष्ट्रीय स्तरावर भारतीय शिल्पकलेचा ठसा उमटवणारे ज्येष्ठ शिल्पकार पद्मश्री, महाराष्ट्र भूषण राम सुतार यांचे बुधवारी रात्री निधन झाले. नोएडा येथील त्यांच्या निवासस्थानी मध्यरात्री सुमारे १.३० वाजता त्यांनी वयाच्या १०१व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला. दीर्घायुष्य लाभलेले राम सुतार हे अखेरपर्यंत सृजनशीलतेशी नाते जपणारे व्यक्तिमत्त्व होते. त्यांच्या निधनामुळे भारतीय कला, संस्कृती आणि शिल्पकलेच्या क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली आहे. कला क्षेत्रातून तसेच विविध स्तरांतून त्यांना श्रद्धांजली वाहिली जात आहे.

भारतासह जगभरातील अनेक देशांमध्ये उभारलेल्या त्यांच्या भव्य शिल्पकृतींनी भारतीय शिल्पपरंपरेला जागतिक ओळख मिळवून दिली. स्वातंत्र्योत्तर काळातील अनेक राष्ट्रीय नेत्यांची स्मारके, तसेच एकता आणि प्रेरणेचे प्रतीक ठरलेले पुतळे ही त्यांची अमूल्य देणगी मानली जाते.जगभरात २०० हून अधिक शिल्पांची निर्मिती करणारे राम सुतार हे नाव केवळ भारतातच नव्हे, तर आंतरराष्ट्रीय स्तरावरही आदराने घेतले जात होते. दिल्लीतील संसद भवन परिसरात उभारलेली त्यांची शिल्पे आजही भारतीय लोकशाहीची साक्ष देतात. राम सुतार यांना त्यांच्या योगदानाबद्दल पद्मश्री, पद्मभूषण तसेच महाराष्ट्र भूषण या प्रतिष्ठित पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले होते. काही दिवसांपूर्वीच राज्य सरकारकडून त्यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला होता. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वत? रुग्णालयात जाउन हा पुरस्कार त्यांच्या हाती सोपवला होता. या भेटीदरम्यान राम सुतार यांनी महाराष्ट्र अभिमान गीत गायले होते, तो क्षण अनेकांसाठी भावूक ठरला.अलीकडेच अंदमान येथे स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या पुतळ्याचे अनावरण झाले होते, तो पुतळा देखील राम सुतार यांच्या कलाकृतीचा भाग होता. त्यांच्या शिल्पांमधील सूक्ष्म बारकावे, भावभावना आणि वास्तववादी मांडणी ही त्यांच्या कलेची ओळख होती.

राम वनजी सुतार यांचा जन्म १९ फेब्रुवारी १९२५ रोजी धुळे जिल्ह्यातील गोंडूर या गावात झाला. प्रारंभी त्यांनी श्रीराम कृष्ण जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली शिल्पकलेचे धडे घेतले आणि पुढे मुंबईतील जे.जे. स्कूल ऑफ आर्ट्समधून औपचारिक शिक्षण पूर्ण केले. १९५९ साली त्यांनी दिल्लीत माहिती व दूरसंचार मंत्रालयात नोकरी स्वीकारली, मात्र काही वर्षांतच त्यांनी शासकीय सेवा सोडून पूर्णवेळ शिल्पकार म्हणून काम करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर दिल्लीमध्ये स्वतःचा स्टुडिओ उभारून त्यांनी आपल्या कलेचा स्वतंत्र प्रवास सुरू केला.

**स्टॅच्यू ऑफ युनिटी-सर्वात भव्य आणि ऐतिहासिक प्रकल्प**

जगातील सर्वात उंच, १८२ मीटर उंचीचा स्टॅच्यू ऑफ युनिटी हा राम सुतार यांच्या आयुष्यातील सर्वात भव्य आणि ऐतिहासिक प्रकल्प मानला जातो. या शिल्पाच्या संकल्पनेपासून ते डिझाइनपर्यंत संपूर्ण सर्जनशील वाटचाल त्यांनीच केली. सुमारे ६० वर्षांच्या कारकिर्दीत त्यांनी ५० हून अधिक भव्य शिल्पांची निर्मिती केली. संसद भवनातील महात्मा गांधी यांची मूर्ती, तसेच तिच्या प्रतिकृती इंग्लंड, फ्रान्स आणि रशिया येथे पोहोचल्या. १९५३ साली मेयो गोल्ड मेडल मिळवणारे राम सुतार हे केवळ शिल्पकार नव्हते, तर भारतीय संस्कृतीचे जागतिक प्रतिनिधी होते.

**गाजलेली शिल्पे-**राम सुतार हे जागतिक ख्यातीचे शिल्पकार होते. त्यांच्या कलाकृतीमध्ये मुख्यत: इतिहास आणि संस्कृतीचे दर्शन दिसते. त्यांना वर्ष २०१६ मध्ये पद्मभूषण आणि १९९९ मध्ये पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यांना अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कार सुद्धा मिळाले आहेत. त्यांच्या शिल्पकलेत भारतीय संस्कृती, इतिहासाचा आणि भावनेचा अनोखा मिलाफ दिसून येतो.

छत्रपती शिवरायांचा पुतळा : मालवण-राजकोट येथील समुद्र किना-यालगतचा छत्रपती शिवरायांचा पुतळा राम सुतार आणि त्यांचे पुत्र अनिल सुतार यांनी तयार केला.

**महात्मा गांधींचे पुतळे :** देशभरातच नाही तर जगभरात त्यांनी महात्मा गांधी यांचे शिल्प साकारले आहेत.

**स्टॅच्यू ऑफ युनिटी :** राम सुतार यांनी सरदार वल्लभभाई पटेल यांचा जगातील सर्वात उंच १८२ मीटर पुतळा उभारला. गुजरात राज्यातील केवडिया येथे हा पुतळा दिमाखात उभा आहे.


**बुद्ध आणि महावीर :** भगवान बुद्ध, महावीर आणि विवेकानंद यांच्यासह इतर महान विभूतींच्या मूर्ती अत्यंत सुबक आणि चित्तवेधक आहे. त्या पाहताना मनुष्य त्या कलाकृतीत हरवून, हरखून जाते.स्वातंत्र्यवीर सावरकरांचा पुतळा : काही दिवसांपूर्वी अंदमान येथे स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. हा पुतळाही राम सुतार यांनी साकारला होता.

## शिल्पकार राम सुतार यांच्या निधनाबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदींकडून शोक व्यक्त

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी प्रसिद्ध शिल्पकार राम सुतार यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्तकेला. राम सुतार यांना एक असाधारण कलाकार म्हणून वर्णन करताना त्यांनी म्हटले की, त्यांच्या कलात्मक प्रतिभेने देशाला स्टॅच्यू ऑफ युनिटीसह अनेक ऐतिहासिक स्मारके दिली आहेत.पंतप्रधान नरेंद्र मोदींनी एक्स-पोस्टमध्ये म्हटले आहे की, राम सुतार यांच्या कलाकृती भारताच्या इतिहासाची, संस्कृतीची आणि सामूहिक भावनेची शक्तिशाली अभिव्यक्ती आहेत आणि नेहमीच त्यांची कदर केली जाईल. त्यांनी येणा-या पिढ्यांसाठी राष्ट्रीय अभिमान अमर केला आहे आणि त्यांच्या कलाकृती कलाकारांना आणि सामान्य नागरिकांना प्रेरणा देत राहतील. मोदी म्हणाले की, राम सुतार यांच्या निधनाने त्यांना खूप दुख झाले आहे. ते एक असाधारण शिल्पकार होते ज्यांच्या कलात्मकतेने भारताला केवडिया येथील स्टॅच्यू ऑफ युनिटीसह अनेक प्रतिष्ठित स्मारके दिली. त्यांच्या कलाकृती नेहमीच भारताच्या इतिहासाची, संस्कृतीची आणि सामूहिक भावनेची शक्तिशाली अभिव्यक्ती म्हणून जपल्या जातील. त्यांनी येणा-या पिढ्यांसाठी राष्ट्रीय अभिमान अमर केला आहे. कलाविश्वात राम सुतार यांचे योगदान नेहमीच लक्षात ठेवले जाईल. पंतप्रधानांनी दिवंगत कलाकाराच्या कुटुंबीयांना, चाहत्यांना आणि त्यांच्या जीवनाने आणि कार्याने प्रभावित झालेल्या सर्वांप्रती शोक व्यक्त केला. स्टॅच्यू ऑफ युनिटीचे जनक मानले जाणारे प्रसिद्ध शिल्पकार राम सुतार यांचा जन्म १९ फेब्रुवारी १९२५ रोजी महाराष्ट्रातील धुळे जिल्ह्यातील गोंडूर गावात झाला. त्यांना मुंबईतील जेजे स्कूल ऑफ आर्ट अँड आर्किटेक्चरकडून सुवर्णपदक मिळाले. नवी दिल्लीतील संसद संकुलात स्थापित केलेले ध्यानस्थ अवस्थेतील महात्मा गांधी आणि घोड्यावर स्वार छत्रपती शिवाजी यांचे पुतळे हे त्यांच्या उत्कृष्ट कलाकृतींपैकी एक आहेत. राम सुतार यांना १९९९ मध्ये पद्मश्री आणि २०१६ मध्ये पद्मभूषण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यांना अलीकडेच महाराष्ट्राचा सर्वोच्च पुरस्कार, महाराष्ट्र भूषण प्रदान करण्यात आला. गुजरातमधील केवडिया येथे नर्मदा नदीजवळील स्टॅच्यू ऑफ युनिटी, पहिले उपपंतप्रधान आणि गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांना समर्पित आहे. हा जगातील सर्वात उंच पुतळा आहे, जो १८२ मीटर उंच आहे. हा भारताच्या एकतेचे प्रतीक आहे.



## राज्यभरात गारठा वाढला !



## नगर 8.5 अंशांवर, पुणेकरांनाही हुडहुडी; पुढील 2 दिवसात हवामान बदलणार

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील अनेक भागात सध्या थंडी वाढताना दिसत आहे. महाराष्ट्रात आठवडाभर कोरडं वातावरण राहणार आहे. देशासह राज्यातील अनेक भागात तापमानाचा पारा घसरला आहे. राज्यातील अनेक भागात सध्या थंडी आहे. महाराष्ट्रात आठवडाभर कोरडं वातावरण राहणार आहे. पुढील २ दिवसांत राज्यात कमाल व किमान तापमानात किंचित वाढ होणार असून त्यानंतर २ ते ३ अंशांनी तापमान घसरणार आहे. विदर्भातील सर्वच जिल्ह्यांमधील किमान तापमान १२ अंशाखाली गेलं आहे. त्यामुळं हुडहुडी वाढली आहे. यवतमाळ जिल्ह्यात आज ९.६ अंश तापमानाची नोंद झाली.तर अकोला, नागपूर १० अंशांवर होते.

## मुलीचे लग्न होत नसेल, गाय दूध देत नसेल तर श्री राम जय राम म्हणा

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** भारत रोजगार आणि उपजीविका हमी अभियान (ग्रामीण) विधेयक म्हणजेच 'VB-जी राम जी' विधेयकावर लोकसभेत बुधवार आणि गुरुवारी १४ तास चर्चा झाली. ५० हून अधिक खासदारांनी यावर आपले मत मांडले.नवीन विधेयकातून महात्मा गांधींचे नाव वगळल्याने, शिवराज यांनी नेहरू, इंदिरा आणि राजीव गांधी यांच्या नावावर असलेल्या ४१५ योजनांची नावे एकेक करून मोजून दाखवली. 'VB- जी राम जी बिल' वर चर्चा करताना भाजपचे नैनीताल-उधम सिंह नगरचे खासदार अजय भट्ट म्हणाले- 'मुलीचे लग्न होत नसेल, नोकरी लागत नसेल. घरात कुठेही वाद-विवाद होत असतील. पती-पत्नीमध्ये पटत नसेल. मुलगा बिघडला असेल. आणि गाय दूध देत नसेल. तर तुम्ही श्री राम जय राम म्हणा, काम होउन जाईल. तर यात चुकीचा हेतू कुठे आहे? भाजपचे खासदार देवेंद्र चंदौलिया यांनी गुरुवारी VB-G-RAM-क्रबिलावर विधान करताना म्हटले- राम नाव ठेवणार नाही तर काय अल्लाह तर बोलणार नाही. खासदारांनी पुढे म्हटले - महात्मा गांधींचे नाव अजूनही वापरत आहेत.



इंदिरा गांधींचे लग्न फिरोज गांधींशी झाले होते, त्यामुळे त्यांचे नाव इंदिरा खान व्हायला हवे होते. राजीव गांधींनी गांधी नावाचा गैरवापर केला. लोकसभेत बुधवारी रात्री भाजप खासदार निशिकांत दुबे म्हणाले- गांधींना मारण्याची गोष्ट करत आहात. गांधींना तुम्ही किती वेळा मारले याचा तुम्हाला कधी अंदाज आहे का? भारत आणि पाकिस्तानची फाळणी झाली. गांधी त्या दिवशी नाही का मेले? तिबेट तुम्ही चीनला दिले, त्या दिवशी तुम्ही गांधींना नाही का मारले? ते म्हणाले- 'तुम्ही काश्मीरचे दोन तुकडे केले. तुम्ही गांधींना नाही का मारले, हिंदू विवाह कायदा बनवला. त्या दिवशी तुम्ही गांधींना नाही का मारले... शाहबानो प्रकरणात तुम्ही मुस्लिम महिलांचे हक्क संपवले, तेव्हा तुम्ही गांधींना नाही का मारले?'

## दरवर्षी 5 लाख रस्ते अपघातांमध्ये 1.8 लाख मृत्यू

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी बुधवारी राज्यसभेत सांगितले की, भारतात दरवर्षी सुमारे ५ लाख रस्ते अपघात होतात, ज्यात सरासरी १.८ लाख लोकांचा जीव जातो. यापैकी ६६% मृत्यू तरुणांचे (१८ ते ३४ वर्षे) होतात.काँग्रेस खासदार प्रमोद तिवारी यांच्या प्रश्नावर गडकरींनी कबूल केले की, रस्ते पायाभूत सुविधा सुधारून आणि कायदे कठोर करूनही सरकार मृत्यूंची संख्या कमी करण्यात पूर्णपणे यशस्वी झालेली नाही. गडकरींनी सांगितले की, केंद्र सरकार राज्यांना आधुनिक रुग्णवाहिका देण्याची योजना आखत आहे. या अंतर्गत, रुग्णवाहिका अपघाताच्या ठिकाणी १० मिनिटांच्या आत पोहोचेल. त्यांनी क्ष्क्ष च्या एका अभ्यासाचा हवाला देत सांगितले की, जर जखमींना वेळेवर उपचार मिळाले तर ५० हजार जीव वाचू शकतात. राज्यसभेत मंत्र्यांनी सांगितले की, गेल्या पाच वर्षांत मंजूर झालेले ५७४ राष्ट्रीय महामार्ग प्रकल्प निश्चित वेळेपेक्षा मागे पडले आहेत. यांची एकूण किंमत सुमारे ३.६० लाख कोटी रुपये आहे.



यापैकी ३०० प्रकल्प एका वर्षापेक्षा कमी, २५३ एक ते तीन वर्षे आणि २१ प्रकल्प तीन वर्षांपेक्षा जास्त काळापासून विलंबित आहेत. तर, १३३ नवीन रस्ते प्रकल्प (एकूण किंमत १ लाख कोटी रु.) भूसंपादन आणि वन मंजुरीमध्ये अडकले आहेत.रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी सांगितले की, २०२६ पर्यंत देशभरात उपग्रह-आधारित टोल प्रणाली लागू होईल. हे तंत्रज्ञान उपग्रह आणि कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित असेल.वाहनांमधून फास्टॅग आणि नंबर प्लेट ओळख तंत्रज्ञानाद्वारे न थांबता टोल कापला जाईल. यामुळे १,५०० कोटी रुपयांच्या इंधनाची बचत होईल आणि ६,००० कोटी रुपयांच्या अतिरिक्त महसुलात वाढ होईल. पूर्वी जिथे टोल पार करण्यासाठी ३-१० मिनिटे लागत होती, आता हा वेळ कमी करून शून्य करण्याचे लक्ष्य ठेवले आहे.

## चार न्यायालयांना बॉम्बने उडवण्याची धमकी, यंत्रणा सतर्क

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबई उच्च न्यायालयासह वांद्रे न्यायालय बॉम्बने उडवण्याची धमकी देण्यात आली आहे. महत्वाचे म्हणजे या आधी आजचं सकाळी नागपूर जिल्हा आणि सत्र न्यायालयांना बॉम्बने उडवण्याची धमकी ईमेलद्वारे मिळाली. या पार्श्वभूमीवर तपास यंत्रणा सतर्क झाल्या आणि परिसरात सुरक्षा व्यवस्था वाढवत शोध मोहीम राबविण्यात आली. मिळालेल्या माहितीनुसार, आज, गुरुवारी वांद्रे न्यायालयाला एका ईमेलद्वारे बॉम्बने उडवून देण्याची धमकी मिळाली. या धमकीचा मेल आल्यानंतर स्थानिक पोलिस पथके आणि बॉम्ब शोधक आणि नाशक पथके घटनास्थळी दाखल झाली. खबरदारीचा उपाय म्हणून, न्यायालयीन कामकाज स्थगित करण्यात आले आणि वकील, कर्मचारी आणि अभ्यागतांच्या सुरक्षिततेसाठी प्रभावित न्यायालय परिसर रिकामा करण्यात आला. शिवाय, पोलिस अधिका-यांनी (पान २ वर)



## हॉटेल तेजयश उपमुख्यमंत्री शिंदेंचे भाऊ प्रकाश शिंदेंचेच

**मुंबई :** सातारा जिल्ह्यातील सावरी येथील ड्रग्ज रॅकेट प्रकरणात ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी आज खळबळजनक गौप्यस्फोट करत थेट उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे बंधू प्रकाश शिंदे यांना आरोपीच्या पिंज-यात उभे केले आहे.सुषमा अंधारे यांनी पत्रकार परिषदेत हाटेल तेजयशचे गुगल लोकेशन ओपन केले. यावेळी त्यांनी दाखवून दिले की, हाटेलच्या ऑनलाइन बुकिंगसाठी दिलेल्या व्हाट्सअॅप लिंकवर क्लिक करताच थेट प्रकाश शिंदे यांचा मोबाईल नंबर आणि त्यांचे नाव समोर येते. एवढेच नव्हे, तर त्या व्हाट्सअॅप नंबरचा डीपी ओपन केल्यास तिथे हाटेल तेजयशचा फोटो दिसतो. जर हाटेल दुस-याला चालवायला दिले आहे, तर बुकिंगसाठी प्रकाश शिंदेंचा नंबर का? आताही प्रकाश शिंदे यांना खोटे बोलायचे आहे का? असा थेट सवाल अंधारे यांनी उपस्थित केला. या पुराव्यामुळे प्रकाश शिंदे यांची चांगलीच कोंडी झाली आहे. पाचगणीत ४५ किलो कोकेन सापडल्याचा संदर्भ देत अंधारे यांनी पालकमंत्री शंभूराज देसाईंवरही निशाणा साधला. मुंबईचे पोलिस येउन कारवाई करतात आणि पालकमंत्र्यांना पत्ताही नसतो. पाचगणीसारख्या मिनी स्वित्झर्लंडला कोकेनचा विळखा पडला असताना पालकमंत्री काय करत आहेत? कुणी बाम्बब्लास्ट करून गेले तरी (पान २ वर)



## व्हिट्स हॉटेल प्रकरणाची 'हाय पॉवर कमिटी' मार्फत होणार चौकशी

**छत्रपती संभाजीनगर :** येथील विट्स हाटेल (धनदा कार्पोरेशन) गैरव्यवहार प्रकरणाच्या चौकशीसाठी सरकारने एक हाय पावर समिती नियुक्त केली आहे. ही समिती या संपूर्ण प्रकरणाचा ८ दिवसांच्या आत तपास करून आपला अहवाल सादर करणार आहे. मंत्री संजय शिरसाट यांच्यावर छत्रपती संभाजीनगर येथील ११० कोटींचे सुप्रसिद्ध हाटेल व्हिट्स अवघ्या ६८ कोटींत खरेदी करण्याचा कथित प्रयत्न केल्याचा आरोप आहे. या प्रकरणी टीकेची झोड उठल्यानंतर शिरसाट यांनी या सौद्यातून काढता पाय घेतला. पण आता या प्रकरणाच्या चौकशीसाठी उच्चस्तरीय समिती नेमल्यामुळे मंत्री शिरसाट यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे. सरकारच्या (पान २ वर)

## ठाकरेंची ही शेवटची निवडणूक, त्यांच्याकडे कार्यकर्ते राहणार नाहीत

## रावसाहेब दानवेंचा दावा

**मुंबई/प्रतिनिधी :** भाजपचे नेते आणि माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे यांनी उद्धव ठाकरेंवर जोरदार टीका केली आहे. ठाकरे बंधू एकत्र येण्याच्या मुद्यावर त्यांना प्रश्न विचारण्यात आला होता. यावेळी ते म्हणाले की, मागच्या निवडणुकीचा मी साक्षीदार आहे, तेव्हा मी अध्यक्ष होतो. मागच्यावेळी एकत्र सरकार चालवत असल्यामुळं आम्ही त्यांना पालिका दिली होती. नाहीतर आम्ही आमचा महापौर बसवला असता असे दानवे म्हणाले. ठाकरेंची ही निवडणूक शेवटची आहे, निवडणुकीनंतर त्यांच्याकडे कार्यकर्ते राहणार नाहीत. कार्यकर्ते आपलं आपलं भविष्य स्वीकारतील असे दानवे म्हणाले. माणिकराव कोकाटे



यांच्याबाबतही त्यांना विचारण्यात आले. यावेळी दानवे म्हणाले की, त्यांनी राजीनामा दिला आहे. अजित पवार यांच्याकडे त्यांनी राजीनामा दिला होता. मुख्यमंत्र्यांनी तो स्वीकारला आहे. कायद्यापेक्षा कोणी मोठं नाही हे आमच्या सरकारने दाखवून दिल्याचे दानवे म्हणाले. नवाब मलिक यांनी जेलमध्ये गेले तरी राजीनामा दिला नव्हता, पण माणिकराव यांनी राजीनामा दिल्याचे दानवे म्हणाले. काल त्यांचा निकाल झाला आणि ते ॲडमिट झाले होते. जे झालं ते नियमाने झाल्याचे दानवे म्हणाले.

धनंजय मुंडे यांची मंत्रीमंडळात वर्णी लागणार का? याबाबत देखील विचारण्यात आले. यावेळी ते म्हणाले की, या सगळ्या बातम्या आहेत. अजित पवार आणि देवेंद्र फडणवीस याबाबत निर्णय घेतील. हा निर्णय मी घेउ शकत नाही असे दानवे म्हणाले. (पान २ वर)

## भारत-ओमानमध्ये मुक्तव्यापार करार; श्रमप्रधान क्षेत्राला चालना

**मस्कत/ वृत्तसंस्था-**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी गुरुवारी ओमानचे सुलतान हैथम बिन तारिक अल सईद यांची भेट घेत द्विपक्षीय संबंधांवर सविस्तर चर्चा केली. या भेटीदरम्यान भारत आणि ओमान यांच्यात मुक्तव्यापार करार करण्यात आला. या ऐतिहासिक प्रसंगी, द्विपक्षीय संबंध दृढ करण्यात दिलेल्या योगदानाबद्दल ओमान सरकारकडून पंतप्रधान मोदींना ऑर्डर ऑफ ओमान या सर्वोच्च नागरी सन्मानाने गौरवण्यात आले. या करारामुळे भारताच्या श्रमप्रधान क्षेत्रांना मोठी चालना मिळणार आहे. विशेषतः वस्त्रोद्योग, चर्मोद्योग, रत्न व दागिने, अभियांत्रिकी उत्पादने, प्लास्टिक व फर्निचर, कृषी उत्पादने, औषधे व वैद्यकीय उपकरणे,



ऑटोमोबाइल क्षेत्र या क्षेत्रातील निर्यातीला प्रोत्साहन मिळेल. भारताचा खाडी सहयोग परिषद (जीसीसी) सदस्य असलेल्या संयुक्त अरब अमिरातीसोबत आधीच असा करार आहे, जो मे २०२२ पासून लागू आहे. जीसीसी मध्ये बहारीन, कुवेत, सौदी अरेबिया, कतार आणि ओमान यांचा समावेश आहे. भारत आणि कतार यांच्यातही लवकरच व्यापार करारासाठी चर्चा सुरू होणार आहे. केंद्रीय (पान २ वर)

## शिल्पा शेट्टीच्या घरावर आयकर विभागाचा छापा

**मुंबई/प्रतिनिधी :**बालिवूड अभिनेत्री शिल्पा शेट्टीच्या अडचणीत वाढ झाली आहे. गुरुवारी १८ डिसेंबरला आयकर विभागाच्या पथकाने शिल्पाच्या मुंबईतील जुहू येथील घरावर छापा टाकला. ही कारवाई बंगळुरू मधील तिच्या प्रसिद्ध हाटेल बॅस्टियन गार्डन सिटीशी संबंधित एका प्रकरणासंदर्भात करण्यात आली आहे. मिळालेल्या वृत्तानुसार, आयकर विभागाचे पथके केवळ मुंबईतीलच नव्हे तर बंगळुरूमधील हाटेलच्या ठिकाणीही छापा टाकून शोध मोहीम राबवत असल्याचे सांगण्यात आले आहे. हाटेलच्या आर्थिक व्यवहारांमध्ये आर्थिक अनियमितता आणि करबुडवेगिरीच्या तक्रारींनंतर हे छापे टाकण्यात आले.






### अंजनगाव सुर्जी नगरपरिषदेच्या निवडणूकीत चौका-चौकात एकच चर्चा

# प्रभाग क्रमांक १२ मध्ये मनिष तंवरच निवडून येणार





**अंजनगाव सुर्जी / प्रतिनिधीः-** अंजनगाव सुर्जी नगरपरिषदेच्या निवडणूकीत प्रचारात चांगलाच वेग आला असून राजकीय पक्षाचे उमेदवार एकमेकांवर आरोप प्रत्यारोप करताना दिसून येते आहे. मात्र शहरातील प्रभाग क्रमांक १२ चे अपक्ष उमेदवार मनिष तंवर कोणावरही आरोप न करता शांत प्रामाणिक प्रमाणे मतदारांत आपला ठसा निर्माण करुन प्रत्येक नागरिकाच्या मनात घर करून बसले आहे. प्रभाग क्रमांक १२ मध्ये प्रत्येक मतदारांच्या तोंडातून एकच नारा निघत आहे, जहाँ हो जनता की पुकार वहाँ है मनिष तंवर तैय्यार ईसलीये चुनकर लांना है मनिष को निशाणी है बॅट अब दबाव बटन क्रमांक तीन. या वातावरणामुळे प्रभागात राजकीय चर्चेत अपक्ष उमेदवार मनिष तंवर यांच्या नावाची चांगलीच चर्चा रंगत आहे.

मनिष तंवर शहरातच नव्हे तर संपूर्ण तालुक्यात ते सामाजिक कार्यकर्ते व गरजू लोकांना मदत करणारे असल्याने ते परिचित आहेत. शहरातील सर्वच जाती धर्मातील त्यांना मानणारा मोठा वर्ग आहे. सार्वजनिक मंडळांच्या माध्यमातून ते सामाजिक उपक्रमात नेहमीच सहभागी असतात. अनेक गरजू रुग्णांना उपचारासाठी आर्थिक मदत करुन ते आधार देतात. त्यामुळे त्यांची जनसामान्यांच्या मनात एकच नारा जहाँ हो जनता की पुकार वहाँ है मनिष तंवर तैय्यार असा प्रत्येक नागरिकाच्या तोंडातून नारा निघत आहे. मनिष तंवर यांचा स्वभाव मनमिळाऊ व शांत प्रामाणिक मनमोकळेपणाने सर्वसाधारण नागरिकांसोबत गप्पा करुन नागरिकांच्या अडीअडचणी समजून घेऊन ते मार्ग काढण्यासाठी प्रयत्न करीत असतात. त्यामुळे सर्वसामान्य माणूस म्हणून त्यांची ओळख आहे. मनिष तंवर यांचा राजकारणापेक्षा सामाजिक कार्यात जास्त सहभाग असतो.

राजकारण नव्हे समाजकारण हाच माझा मुलमंत्र आहे असे ते सातत्याने सांगतात. त्यामुळे प्रभाग क्रमांक १२ मध्ये अपक्ष उमेदवार म्हणून उभे असलेले मनिष तंवर यांना उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.शिक्षित अनुभवी आणि समाजाभिमुख नेतृत्व म्हणून त्यांच्या कडे पाहिल्या जात असून प्रचाराला परिसरातील नागरिकांकडून मोठ्या प्रमाणात सकारात्मक प्रतिसाद मिळत असून संपूर्ण शहरात अपक्ष उमेदवार मनिष तंवर निवडून येणार अशी चौका चौकात चांगलीच चर्चा रंगत आहे.

# जेवड नगरात तरुण चायना चाकूसह ताब्यात

### इंस्टाग्रामवर शस्त्रासह फोटो टाकून दहशत

**अमरावती/ प्रतिनिधीः-** सोशल मीडियावर शस्त्रासह फोटो व्हायरल करून परिसरात दहशत निर्माण करणाऱ्या एका तरुणावर अमरावती शहर गुन्हे शाखेने प्रभावी कारवाई करत त्याला घातक शस्त्रासह ताब्यात घेतले आहे. या कारवाईमुळे सोशल मीडियाचा गैरवापर करणाऱ्यांना पोलिसांनी कडक इशारा दिला आहे.

गुन्हे शाखेला मिळालेल्या गुप्त माहितीनुसार, एक तरुण काही दिवसांपासून हातात शस्त्र घेऊन इंस्टाग्रामवर फोटो व व्हिडिओ अपलोड करून ते मोठ्या प्रमाणात प्रसारित करत होता. सदर तरुण १७ डिसेंबर रोजी जवेड नगर परिसरात शस्त्रासह उभा असल्याची खात्रीलायक माहिती पोलिसांना मिळाली. माहितीच्या आधारे गुन्हे शाखेच्या पथकाने तत्काळ सापळा रचून जेवड नगर येथे छापा टाकला. कारवाईदरम्यान अभिषेक उद्धव मेश्राम (वय २४, रा. जवेड नगर, अमरावती) याला ताब्यात घेण्यात आले. त्याच्या अंगझडतीत एक घातक 'चायना चाकू' आढळून आला असून, तो जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी आरोपीविरुद्ध पोलीस स्टेशन राजापेठ येथे भारतीय शस्त्र कायदा कलम ४/२५ तसेच महाराष्ट्र पोलीस कायदा कलम १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा पोलिसांनी दिला आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. तसेच पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, श्याम घुगे, पोलीस उपायुक्त (मुख्यालय व गुन्हे) रमेश धुमाळ आणि सहायक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे यांच्या मार्गदर्शनात, गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली ही कारवाई पार पडली. या पथकात सहाय्यक पोलीस निरीक्षक महेश इंगोले, पोलीस अंमलदार गजानन ढेवले, मनोज ठोसर, मंगेश परिमल, संदीप खंडारे, नईम बेग, विकास गुडदे, सागर ठाकरे आणि योगेश पवार यांचा समावेश होता. सोशल मीडियावर बेकायदेशीर शस्त्रांचे प्रदर्शन करणे, दहशत पसरविणे किंवा कायदा हातात घेण्याचा प्रयत्न केल्यास कठोर कारवाई केली जाईल, असा स्पष्ट संदेश या कारवाईतून अमरावती पोलिसांनी दिला आहे.

## १ व १० वरिल उर्वरित

### वाळू तस्करांचा पोलिसांवर हल्ला

धनराज निळे यांनी दुजोरा दिला असून ते घटनास्थळी तात्काळ पोहचले. ट्रॅक्टर चालक गुरुवारी सकाळी नऊ वाजता नदीपात्रात उतरले होते. काहींनी ट्रॅक्टर भरले तर काहीचे रिकामेच होते. याच वेळी महागाव येथील सहाय्यक निरीक्षक सुनील अंभोरे त्यांच्या पथकासह नदीपात्रात अवैध रेती वाहतुकीवर धाड मारण्या करिता गेले होते. उपस्थित ट्रॅक्टर चालकांनी पोलिसांसोबत वाद घातला तर यात काहींनी थेट अंभोरे यांच्यावर हल्ला चढविला. त्याच वेळी अंभोरे यांनी दोन राऊंड फायर केले. गोळीबाराचा आवाज ऐकताच एकच धांदल उडाली उपस्थित असलेले नागरिक सैरावैरा पळाले, असे प्रत्यक्षदर्शीयांनी सांगितले.

### जिल्हाधिकारी कार्यालयाला बॉम्बने

माहिती देण्यात आली. त्यानंतर स्थानिक पोलीस दल, बॉम्बनिरोधक पथक, एटीसी, आरसीपी तसेच अन्य विशेष पथकांना घटनास्थळी तैनात करण्यात आले. अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांनी जिल्हाधिकारी कार्यालयाचा परिसर ताब्यात घेत चारही बाजूंनी कडेकोट बंदोबस्त उभारला.

संभाव्य धोका लक्षात घेऊन जिल्हाधिकारी कार्यालयाची इमारत तातडीने रिकामी करण्यात आली. अधिकारी, कर्मचारी तसेच उपस्थित नागरिकांना सुरक्षित अंतरावर हलवण्यात आले. त्यानंतर बॉम्बनिरोधक पथकाने अत्यंत बारकाईने तपास मोहीम राबवली. इमारतीतील सर्व कक्ष, दालने, जिने, तळघर तसेच परिसरातील प्रत्येक भागाची आधुनिक उपकरणांच्या साहाय्याने सखोल तपासणी करण्यात आली. काही तास चाललेल्या या तपासात कोणतीही स्फोटक सामग्री किंवा संशयास्पद वस्तू आढळून आली नाही. त्यामुळे प्रशासनाने काहीसा दिलासा घेतला. पोलिस तपास प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर दुपारी तीन वाजल्यानंतर इमारत पुन्हा प्रशासनाच्या ताब्यात देण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी कार्यालयाकडून देण्यात आली. तोपर्यंत खबरदारी म्हणून कार्यालयीन कामकाज स्थगित ठेवण्यात आले होते.

दरम्यान, धमकीचा ई-मेल पाठवणाऱ्या अज्ञात व्यक्तीचा शोध घेण्यासाठी सायबर पोलीस विभागाकडून तपास वेगाने सुरू करण्यात आला आहे. ई-मेलची तांत्रिक तपासणी, आयपी अ‍ॅड्रेस ट्रेसिंग व इतर डिजिटल पुराव्यांच्या आधारे आरोपीपर्यंत पोहोचण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले. या बॉम्ब धमकीमुळे शहरात काही काळ दहशतीचे वातावरण निर्माण झाले होते. नागरिकांनी शांतता राखावी व कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन प्रशासन व पोलिसांनी केले आहे.

### जबरी चोरी प्रकरणातील दोन

२ लाख ५७ हजार रुपयांहून अधिक किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. बादल नारायणराव बागवाले (वय २२), रोहीत तुसलीदास रामटेके (वय १९) असे अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहे.

माहितीनुसार सुनिल सहदेवराव पवार (वय ४४) यांनी बुधवारी तक्रार दिली की,ते आपल्या लहान बहिणीच्या भेटीसाठी चारचाकी वाहनाने भातकुली रोडने जात होते. निळकंठ शाळेजवळ पाण्याची बाटली घेण्यासाठी थांबले असता दोन अज्ञात इसमांनी त्यांना अडवले. दारूची बाटली फोडून भीती निर्माण करत आरोपींनी जबरदस्तीने सोन्याची चैन, दोन सोन्याच्या अंगठ्या ,२४,००० रोख रक्कम असा एकूण १ लाख ४९ हजाराचा मुद्देमाल हिसकावून फरार झाले. या प्रकरणात खोलापुरी गेट पोलिसांनी गुन्हा दाखल केला. प्रकरणाची गंभीरता पाहून पोलीस आयुक्तांच्या आदेशानुसार गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली पथकाने गुप्त बातमीदारांच्या मदतीने तपास सुरू केला. पथकाने मिळालेल्या माहितीवरून अवघ्या काही तासांत आरोपी बादल नारायणराव बागवाले (वय २२), रोहीत तुसलीदास रामटेके (वय १९) या दोघांना ताब्यात घेतले . चौकशीत त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. त्यांच्या कडून सोन्याची चैन १३.५० ग्रॅम १ लाख ८० हजार, सोन्याची अंगठी ५.८५ ग्रॅम– किंमत ७७ हजार, रोख रक्कम २ हजार असा एकूण २ लाख ५७ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, उपायुक्त गणेश शिंदे, श्याम घुगे, रमेश धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वात पोउपनि गजानन सोनुने, पोलीस अंमलदार दिपक सुंदरकर, जहीर शेख, अतुल संभे, सुरज चव्हाण, राजीक रायलीवाले, निखिल गेडाम, चेतन कराडे, संदीप खंडारे यांनी केली.

### भूभागाचा अभ्यास करून तातडीने

स्थानिक नागरीकांमध्ये भीतीचे वातावरण असल्याची माहिती दिली. शिवाय, स्थानिक नागरिकांकडून तातडीने भूकंप मापक यंत्र बसवण्याच्या मागणीला वेग आल्याचीही माहिती जिल्हाधिकाऱ्यांना दिली. यादरम्यान तहसीलदार कळसे आणि प्रशांत कांबळे यांच्यात फोनद्वारे चर्चा झाल्यानंतर लेखी आश्वासन दिल्याशिवाय ठिय्या आंदोलनातून माघार घेणार नसल्याचा इशारा दिला होता.

त्यामुळे तहसीलदार कळसे यांनी लेखी आश्वासन दिले आहे. ज्यामध्ये २६ नोव्हेंबर रोजी जीएसआय पथकाने शिवणगाव येथील भूभागाची पाहणी केली असून, त्यासबंधित अहवाल जिल्हाधिकारी यांना सादर करण्यात आला आहे. त्यानंतर आता पुन्हा नव्याने जीएसआय पथकाकडून शिवणगाव येथील जमिनीत खोदकाम करून जमिनीतील मातीचे नमुने आणि परीक्षण करण्यात येणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले आहे. शिवाय, यंत्र बसवण्यासंदर्भात केंद्र सरकारची परवानगी लागत असल्याने परवानगी मागण्यात आली असून, परवानगी मिळताच यंत्र बसवण्यात येईल असे लेखी आश्वासन दिल्याने अखेर प्रशांत कांबळे यांनी ठिय्या आंदोलनातून माघार घेतली आहे. यावेळी शिवणगाव सरपंच धर्मराज खडसे, महादेव अंबूलकर, कैलास कठाळे, चंद्रवदन खोब्रागडे, नरेश साबळे, रमेश डेहनकर, जसबीर ठाकूर, प्रशांत प्रधान, शरद धसकट, स्वप्नील निस्ताने, एड. विकास तुरकाने, प्रकाश चिचखेडे, राहुल येरणे, सुधाकर तुरकाने यासह अनेक नागरिकांची उपस्थिती होती.

भूकंप धक्का येऊन शिवणगाव किंवा आजूबाजूच्या कोणत्याही गावात जीवित हानी झाल्यास याला सर्वस्वी जबाबदार स्थानिक प्रशासन आणि केंद्र सरकार राहणार आहे. त्यामुळे केंद्र सरकारने भूकंप मापक यंत्र बसवण्यासाठी तातडीने मान्यता द्यावी. अन्यथा यापेक्षाही तीव्र आंदोलन केंद्र सरकारच्या विरोधात छेडण्यात येईल.

**- प्रशांत कांबळे, सामाजिक कार्यकर्ते**

### प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांना दिले

विश्वासात न घेता अत्यंत निकृष्ट व बोगस दर्जाचे मैदानी साहित्य देण्यात आले. दोन महिन्याचा कालावधी होऊन सुद्धा आतापर्यंत शैक्षणिक मैदानी साहित्यामधील एक शर्ट, एक शॉर्ट आणि सॉक्स अत्यंत निकृष्ट दर्जाचे घेण्यात आले आहे. या संपूर्ण प्रकाराची तक्रार नोंदवली असून त्यावर अद्याप पर्यंत कोणतेही समाधानकारक उपाय झाले नाही. यामुळे लवकरच सकारात्मक निर्णय घेण्याची अपेक्षा विद्यार्थ्यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे केलेली आहे. निवेदन देताना बी.आर. खेडकर, ए. जी. भटकरे, विक्की खंडारे, पी. पी. मोहन सह प्रशिक्षणार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### इच्छुक उमेदवारांचे काँग्रेस

भवनात मुलाखती दिल्या. यादरम्यान इच्छुकांनी जोरदार शक्तिप्रदर्शन केले. वारे पंजा आला पंजा च्या घोषणाने परिसर दणाणला. काँग्रेस पक्षाचे ध्वज हातात घेऊन इच्छुकांनी जोरदार घोषणाबाजी केली. शहरातील २२ प्रभागातून इच्छुक उमेदवारांसाठी मुलाखत सत्र सुरू झाले. आज पहिल्या दिवशी प्रभाग क्रमांक ३ नवसारी, ४ जमीन कॉलनी लालखडी ,प्रभाग ५ महेंद्र कॉलनी, प्रभाग ६ विलासनगर मोरबाग, प्रभाग ८ जोग सोडियम चपरासी पुरा, प्रभाग ११ फ्रेजरपुरा रुक्मिणी नगर, प्रभाग १४ जवाहर रोड बुधवार प्रभाग, १५ छाया नगर गवलीपुरा, प्रभाग १६ अलीम नगर रहमतनगर, प्रभाग २१ जुनी वस्ती बडनेरा, प्रभाग २२ नवी वस्ती बनडेरा येथील उमेदवारांनी मुलाखती दिल्या. यावेळी खासदार बळवंत वानखडे, माजी मंत्री यशोमती ठाकूर, डॉ.सुनील देशमुख ,माजी महापौर विलास इंगोले, मिलिंद चिमोटे, प्रदेश उपाध्यक्ष भैय्या पवार, प्रदेश प्रवक्ता एड. दिलीप एडतकर, उपाध्यक्ष किशोर बोरकर, अशोक डोंगरे, नजीर खान बिके, महिला अध्यक्ष जयश्री वानखडे, गोपीचंद भामोरे, निलेश गुहे, वैभव देशमुख, दीपक हुंडीकर, अभिनंदन पेंडारी, संकेत साहू आदी उपस्थित होते. पार्टी मधून निवडणूक लढण्यासाठी शेकडो इच्छुक दिसले. उरलेल्या प्रभागांच्या मुलाकाती शुक्रवारी घेतल्या जाणार आहे.

### साडेसात फुटाच्या अजगराला

पकडून जीवनदान दिले. घटनेची माहिती मोर्शी वनपरिक्षेत्र कार्यालयातील कर्मचारी यांना देण्यात आली. त्यांना सोबत घेऊन त्या साडेसात फुटाच्या अजगराला जंगलाच्या अधिवासात सोडून देण्यात आले.मोर्शी व वरुड तालुक्यातील जंगलात घरात कोठेही साप किंवा अजगर आढळून आल्यास त्यांनी वरील सर्पमित्र यांचेशी संपर्क साधावा असे आवाहन त्यांनी केले आहे.या आधी पंधरा दिवसांपूर्वी मोर्शी ते चांदूरबाजार रोडवर असलेल्या एका ढाब्यावर साडेपाच फुटाचा अजगर आढळून आला होता. त्याला सुद्धा स्नेक टीमने रेस्क्यू करून जीवनदान दिले होते.

### शेतीसाठी दिवसा आठ तास

तुमच्या ऑफिसचा कर्मचारी सुद्धा रात्रीच्या वेळेस विद्युत पुरवठा सुरळीत देण्यासाठी कामावर असणे गरजेचे आहे. शेतकऱ्याला सौर पंप हे ऐच्छिक असावे. ज्यांना विद्युत पुरवठा हवा असल्यास तशी व्यवस्था करण्यात यावी. सोलर पंपाची सक्ती आपल्या ऑफिस द्वारे करू नये.अशा मागण्यांचे निवेदन उपकार्यकारी अभियंता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी नांदगाव खंडेश्वर यांना देण्यात आले.

वरील शेतकऱ्यांच्या मागण्यांची पूर्तता दहा दिवसाच्या आत न झाल्यास महाराष्ट्र राज्य किसान सभे द्वारे मोठ्या संख्येने आपल्या कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन करण्यात येईल असे सुद्धा यावेळी निवेदनात सांगण्यात आले. यावेळी उमेश बनसोड जिल्हाउपाध्यक्ष AIKS, विनोद तऱ्हेकर तालुका सचिव , राहुल चोपकर शाखा सचिव ,पंकज जावळकर सेवा सहकारी सोसायटी सदस्य,नितीन कडू सेवा सहकारी सोसायटी सदस्य शिवणी रसूलापूर, मंगेश गावंडे, रवी आगळे,राजेंद्र रघुते, दत्तात्रय उके,निलेश गावंडे इ. शेतकरी उपस्थित होते.

### राज्यस्तरीय शालेय आर्चरी

धनुर्विद्या संघटनेचे अध्यक्ष ॲड. प्रशांत देशपांडे, सचिव प्रमोद चांदूरकर, जिल्हा क्रीडा अधिकारी गणेश जाधव, अनिल इंगळे, आदी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी येरेकर यांनी, प्रतिभा असलेल्या खेळाडूंना आंतरराष्ट्रीय आणि ऑलिंपिक स्पर्धेकरीता आवश्यक असलेले साहित्य उपलबध झाल्यास जिल्ह्यातील खेळाडूंना यात सहभागी होण्यास मदत होईल. खेळाडूंनी सकारात्मक विचार करुन जीवनामध्ये यशाचे शिखर गाठावे, असे आवाहन केले. तसेच स्पर्धेचे रितसर उद्घाटन केले.

राज्यस्तरीय शालेय आर्चरी क्रीडा सन २०२५-२६ स्पर्धेत १७ व १९ वर्ष वयोगटातील मुले आणि मुली राज्यातील ८ ही विभाग आणि एका क्रीडा प्रबोधिनीतील ४८५ मुले व मुली खेळाडू, पंच, सामनाधिकारी, निवड समिती सदस्य व संघ व्यवस्थापक स्पर्धेत सहभागी झाले आहेत. या राज्यस्तरीय शालेय आर्चरी स्पर्धेचे मुले व मुली या वयोगटातील सर्व सामने जिल्हा क्रीडा संकुलातील खेलो इंडिया आंतरराष्ट्रीय आर्चरी रेंजवर सुरु झाले आहे. दि. १८ डिसेंबर २०२५ रोजी धनुर्विद्या प्रकारामधील इंडियन राऊंडची स्पर्धा झाली. दि. १९ डिसेंबर २०२५ रोजी कंपाऊंड राऊंड, दि. २० डिसेंबर २०२५ रोजी रिकर्व्ह राऊंडचे सामने होणार आहेत. उद्घाटन कार्यक्रमात सुरवातीला जिल्हाधिकारी येरेकर यांच्या हस्ते ध्वजारोहन व क्रीडा ज्योत प्रज्वलन करण्यात आले. जिल्हा क्रीडा अधिकारी गणेश जाधव यांनी प्रास्ताविक केले. सेवानिवृत्त जिल्हा क्रीडा अधिकारी प्रदिप शेटीये यांनी सूत्रसंचालन केले. क्रीडा अधिकारी अनिल इंगळे यांनी आभार मानले.

### लिव्ह इनमध्ये राहणारी

पिडितेच्या वडिलाला याची माहिती लागली आणि त्यांनी आरोपी सोबत वाद घातला. यानंतर यावरून नेहमी वाद व्हायचे. यामुळे पिडिता मार्च महिन्या मध्ये आरोपी शेख सलमान याच्या सोबत राहायला गेली. दोघानी भाड्याने एक रूम घेतली. तिथे ते लिव्ह ईन मध्ये राहू लागले. आरोपी शेख सलमानने पिडितेला लग्नाचे आमिष दिले आणि तिच्याशी वारंवार शारीरिक संबंध ठेवले. या संबंधामुळे ती गरोदर झाली. ती सध्या ८ महिन्याची गरोदर आहे. अशात तिला वेदना होत असल्याने आरोपीने तिला डफरीन मध्ये दाखल केले. जिथे उपचारा दरम्यान ती अल्पवयीन असल्याची माहिती समोर आली. आरोपी शेख सलमानने लग्नाचे आमिष दाखवून तिचे शोषण केले. तिच्या बयानावरून खोलापुरी गेट पोलिसांनी आरोपी शेख सलमान विरुद्ध गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे.

### आनंदवाडी कॅनलमध्ये तरुण

समोर घडल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. मुलाला वाहते पाहून वडिलांनी आरडाओरडा केला. आणि त्याला वाचवण्यासाठी प्रयत्न केले पण त्यांचे प्रयत्न अयशस्वी ठरले. त्यांच्या आवाजाने परिसरातील नागरिक तेथे जमा झाले. त्यांनी तात्काळ घटनेची माहिती तिवसाचे तहसीलदार, ठाणेदार,अप्परवर्धा प्रशासन व रेस्क्यू टीमला दिली. माहिती मिळताच रेस्क्यू पथक घटनास्थळी दाखल झाले. पथकाने शोधकार्य सुरू केले. घटनेनंतर परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. कॅनन परिसरात सुरक्षिततेचा प्रश्न उपस्थित झाला आहे.

### आम आदमी पक्षाकडून उमेदवार

निवडणूक लढणाऱ्या १० उमेदवारांची नावे आज गुरुवार १८ डिसेंबर रोजी झालेल्या एका पत्रकार परिषदमध्ये घोषित केले आहे. पार्टीच्या वतीने संदीप रवींद्र मेश्राम, प्रा. सतीश दुबे, अमृता लक्ष्मण गौर, आदेश नामदेवराव लोणारे, राहुल राजेंद्र उघडे, राजेंद्र देविदास वानखडे, किशोर वानखडे, मंगेश बाबाराव अर्डक, एड. किरण, अमोल हरिदास बोपचे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. शहराच्या विकासासाठी पार्टी कार्य करणार आहे. आम आदमी पार्टीने भ्रष्टाचार देशातून आणि राजकारणातून संपवण्यासाठी झाडू चालवून राजकीय व्यवस्थेला स्वच्छ करून पारदर्शक राजकारण प्रस्तावित करण्याचा संकल्प घेतला आहे. त्याचबरोबर शहरातील स्थानिक समस्या ज्यामध्ये हॉकर्स ला येणाऱ्या अडचणीवर तोडगा काढण्यासाठी विशेष प्रयत्न केले जाणार आहे. शहरातील रहदारीची मोठी कोंडी काढण्यासाठी पार्टी प्रयत्न करणार आहे. शहरातील अस्वच्छतेचे निवारण करून स्वच्छ अमरावती शहर निर्माण करणे त्याचप्रमाणे शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रात महानगरपालिकेची भागीदारी वाढवणे. दिल्ली व पंजाब मॉडल वर आधारित अत्याधुनिक सुविधा निर्माण करण्यावर पार्टीचा जोर राहणार असल्याची माहिती देण्यात आली. पत्रकार परिषदेमध्ये महेश देशमुख, सुभाष गोहत्रे, एड. वसंतराव ढोके आदि उपस्थित होते.

### गुरुकुल आश्रम शाळेतून दोन

तर ते आश्रमशाळेमध्ये कुठेही नव्हते. शिक्षकांनी त्या दोघांचा आजूबाजूला शोध घेतला, तिथेही ते नाही मिळाले. त्यांच्या पालकांना सुद्धा फोन करून विचारपूस करण्यात आली पण ते घरीही गेले नसल्याचे स्पष्ट झाले. शिक्षकांनी मोझरी, अमरावती, नागपूर बस डेपो आणि अमरावती रेल्वे स्थानक परिसरातही त्यांचा शोध घेतला पण ते दोघे विद्यार्थी कुठेही मिळून आले नाही. या घटनेमुळे आश्रम शाळेमध्ये खळबळ उडाली आहे. दोघे विद्यार्थी कुठेही न मिळाल्याने शेवटी व्यवस्थापकाने त्यांच्या बेपत्ता होण्याची तक्रार तिवसा पोलीस ठाण्यात दिली. पोलिसांनी गुन्हा दाखल करून त्यांचा शोध सुरू केला आहे.

### चार न्यायालयांना बॉम्बने

या परिसरांना वेढा घातला होता आणि सुरक्षा व्यवस्था कडक केली आहे, तर सायबर पथके धमकी देणा-या ई-मेलचा स्त्रोत शोधण्यासाठी कामी लागले.आतून कोणालाही बाहेर जाण्याची परवानगी नाही आणि बाहेरून कोणालाही आत येण्याची परवानगी नाही, तरीही परिसरातील परिस्थिती चिंताजनक असल्याचे समोर आले आहे.

दुसरीकडे नागपूर जिल्हा आणि सत्र न्यायालयाला इमारतीच्या आत 'ब?म्ब' असल्याचा दावा करणारा ईमेल मिळाला. या धमकीमुळे स्थानिक पोलीस तातडीने घटनास्थळी पोहचले आणि परिसराची पाहणी सुरु केली मात्र अद्याप कोणतीही संशयास्पद वस्तू आढळलेली नाही असं पोलिसांनी म्हटलं आहे.

जिल्हा बार असोसिएशनचे अध्यक्ष रोशन बागडे यांनी सांगितले की, सकाळी न्यायालयाच्या ईमेल आयडीवरून ईमेल पाठवण्यात आला होता, ज्यामध्ये दावा करण्यात आला होता की सिव्हिल लाईन्स परिसरात असलेल्या इमारतीत लवकरच दोन आरडीएक्स आधारित स्फोटक उपकरणे स्फोट होतील. दरम्यान एका अधिका-याने सांगितले की, जिल्हा न्यायालयात सुरक्षा वाढवण्यात आली आहे आणि ब?म्ब शोधक आणि निकामी पथकाचे कर्मचारी परिसराची तपासणी करत आहेत.

# आयशरमधून गोवंश तस्करी, २० गोवंशांची सुटका

### १८.५३ लाखांचा मुद्देमाल ताब्यात

**अमरावती/ प्रतिनिधीः-** मोर्शी–अमरावती मार्गावर गोवंश तस्करी करणाऱ्यांविरोधात ग्रामीण गुन्हे शाखेने कारवाई करत आयशर ट्रकमधून सुरू असलेली अवैध वाहतूक उधळून लावली. शिरखेड फाटा येथे लावलेल्या नाकाबंदीत ट्रक अडवून पोलिसांनी २० गोवंशांची सुटका केली, तर वाहनासह एकूण १८ लाख ५३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. गोवंशीय जनावरांची कत्तल करण्याच्या उद्देशाने होत असलेल्या अवैध वाहतुकीला आळा घालण्यासाठी पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांनी ग्रामीण गुन्हे शाखेला विशेष सूचना दिल्या होत्या. त्यानुसार गोवंश पथकाचे पोलीस उपनिरीक्षक विशाल रोकडे हे आपल्या पथकासह शिरखेड पोलीस ठाणे हद्दीत गस्त घालत असताना गोपनीय माहिती मिळाली. मोर्शीहून अमरावतीकडे जाणाऱ्या आयशर ट्रकमध्ये गोवंशांचे पाय व तोंड बांधून अत्यंत क्रूरतेने कोंबून कत्तलीसाठी वाहतूक केली जात असल्याची माहिती मिळताच तत्काळ कारवाईची आखणी करण्यात आली. मिळालेल्या माहितीनुसार मोर्शी–अमरावती रस्त्यावर शिरखेड फाटा येथे नाकाबंदी करण्यात आली. पोलिसांना पाहताच ट्रक चालकाने वाहन पळवण्याचा प्रयत्न केला; मात्र पोलिसांनी पाठलाग करून शिरखेड फाट्यावरून शिरखेड रस्त्यावर ट्रक अडवला. आरोपी पळून जाण्याचा प्रयत्न करत असताना पोलिसांनी धाव घेऊन त्यांना ताब्यात घेतले. या कारवाईत शेख साबीर शेख कदीर (वय ३५, रा. आर्वी, जि. वर्धा) व शेख आयान शेख नसीर (वय २०, रा. लालखडी, अमरावती) या दोघांना अटक करण्यात आली. पोलिसांनी २० गोवंश (अंदाजे किंमत ३ लाख ३३ हजार रुपये), आयशर ट्रक (१५ लाख रुपये) व दोन मोबाईल फोन असा एकूण १८ लाख ५३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. जप्त केलेले गोवंश, वाहन, मोबाईल फोन तसेच आरोपींना पुढील कायदेशीर कारवाईसाठी शिरखेड पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले आहे. ही यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत, उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खाडेकर, पोलीस निरीक्षक किरण वानखडे यांच्या मार्गदर्शनाखाली शिरखेडचे ठाणेदार ईश्वर वर्गे यांच्यासह विशाल रोकडे, संतोष तेलंग, दीपक पाल, मनोज कलसकर, अमित राऊत, गजानन तिजारे, नितेश आसोलकर, दीपक पाटील, मारोती वैद्य व चालक किशोर सुने यांनी केली.

### हॉटेल तेजयश उपमुख्यमंत्री

यांना कळणार नाही असा घणाघात त्यांनी केला. आज घेतलेल्या पत्रकार परिषदेत अंधारे यांनी पोलिसांच्या कार्यपद्धतीचे वाभाडे काढले. त्या म्हणाल्या, ओंकार डिघे हा स्पाटवर असताना त्याला अटक का झाली नाही? तो नंतर रात्री उशिरा स्वतःहून मुंबईच्या युनिट नंबर ७ कडे हजर होतो, हे संशयास्पद आहे. याचा अर्थ, सत्ताधा-यांशी संबंधित लोकांना पोलीस अटक करत नाहीत, तर ते स्वतःच्या सोयीने हजर होतात. वाल्मीक कराड, प्रशांत कोरटकर ही याचीच उदाहरणे आहेत.

### व्हिट्स हॉटेल प्रकरणाची

परिपत्रकानुसार, प्रस्तुत समिती धनदा क?र्पोरेशन प्रायव्हेट लिमिटेडच्या मालमत्तेच्या लिलावामध्ये निविदा प्रक्रिया राबवताना त्यामधील अटी, शर्ती किंवा इतर प्रक्रियेत कुठे अनियमितता झाली आहे काय? याबाबत व सदर मालमत्तेच्या मूल्यांकनाबाबत सखोल चौकशी करणार आहे.सदर समितीला धनदा क?र्पोरेशन प्रायव्हेट लिमिटेडच्या मालमत्तेच्या लिलावात निविदा प्रक्रिया राबवताना त्यामधील अटी शर्ती किंवा इतर प्रक्रियेमध्ये कुठे अनियमितता झाली आहे काय? याबाबत व सदर मालमत्तेच्या मूल्यांकनाबाबत सखोल चौकशी अहवाल समितीच्या शिफारशी व अभिप्रायांसह तसेच आवश्यक कागदपत्रांसह ८ दिवसांच्या आत सादर करण्याचे निर्देश दिलेत. या पत्रकावर छत्रपती संभाजीनगरचे विभागीय आयुक्तजितेंद्र पापळकर यांची स्वाक्षरी आहे.

### ठाकरेंची ही शेवटची निवडणूक

धनंजय मुंडे यांच्याबाबत सुप्रिया सुळे यांची दुश्मनी असण्याचं काय कारण आहे? असा सवाल देखील दानवेंनी केला. ७५ वर्षात सुप्रिया सुळे यांनी कधीच उपोषण केलं नव्हते. उपोषण करण्याची पाळी सुप्रिया सुळे यांच्यावर अनेक वेळा येणार आहे असेही दानवे म्हणाले.

**राज्यात २९ महानगरपालिकांच्या निडणुकांचे बिगुल वाजले-**राज्यात २९ महानगरपालिकांच्या निडणुकांचे बिगुल वाजले आहे. १५ जानेवारीला यासाठी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. तर १६ जानेवारीला या निवडणुकांचे निकाल जाहीर होणार आहेत. त्यामुळं राज्यात राजकीय घडामोडींना वेग आला आहे. मोठ्या प्रमाणात सध्या भाजपमध्ये पक्ष प्रवेश होत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे.

### भारत-ओमानमध्ये मुक्त व्यापार करार;

वाणिज्य मंत्री पीयूष गोयल यांनी सांगितले की, भारत-ओमानमधील मुक्त व्यापार करारामुळे वस्त्रोद्योग, अन्नप्रक्रिया, ऑटोमोबाइल, दागिने, कृषी-रसायने, नवीकरणीय उर्जा आणि ऑटो कंपोनंट्स क्षेत्रात नवे संधी निर्माण होतील. जीसीसी, पूर्व युरोप, मध्य आशिया आणि आफ्रिकेचे प्रवेशद्वार असल्याचे सांगितले. त्यामुळे भारतीय उद्योगांना जागतिक बाजारपेठांमध्ये अधिक सुलभ प्रवेश मिळणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ शुक्रवार, १९ डिसेंबर २०२५ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# वाशीम नगरपरिषद निवडणूक : शेवटच्या टप्प्यात प्रचाराला उधाण, नगराध्यक्षपदासाठी बहुरंगी लढत

■ पप्पु घुगे ■

**वाशीम नगरपरिषदेची मागील निवडणूक अवघ्या एक दिवस आधी अचानक रद्द होऊन पुढे ढकलण्यात आल्याने उमेदवारांसह कार्यकर्त्यांमध्ये मोठी नाराजी पसरली होती. त्यानंतर बराच काळ निवडणूक प्रक्रियेबाबतची अनिश्चितता कायम राहिल्याने उमेदवारांचा प्रचारातील उत्साह काहीसा ओसरलेला दिसत होता. मात्र आता निवडणुकीच्या प्रचाराला केवळ शेवटचा आजचा दिवस शिल्लक राहिल्याने संपूर्ण शहरात पुन्हा एकदा निवडणुकीची धग जाणवू लागली आहे.**



यंदाची वाशीम नगरपरिषद निवडणूक सर्वच राजकीय पक्षांनी प्रतिष्ठेची केली असून नगराध्यक्षपदासाठी बहुरंगी लढत रंगणार आहे. महायुती व महाविकास आघाडीतील घटक पक्षांमध्येही या निवडणुकीमुळे मतभेद उफाळून आले असून अनेक पक्षांनी स्वतंत्रपणे आपले उमेदवार रिंगणात उतरवले आहेत. त्यामुळे निवडणुकीत राजकीय समीकरणे अधिकच गुंतागुंतीची बनली आहेत.

मूळतः २ डिसेंबर रोजी निवडणूक होणार असल्याने सर्व पक्षांनी जोमाने तयारी केली होती. उमेदवार घराघरांत प्रचारात व्यस्त होते. मात्र ऐन वेळी ३० नोव्हेंबरच्या रात्री निवडणूक पुढे ढकलल्याचा निर्णय जाहीर झाल्याने उमेदवारांचा हिरमोड झाला.

नव्या कार्यक्रमानुसार १२ डिसेंबरपासून पुन्हा प्रचाराला सुरुवात झाली. आता प्रचाराच्या शेवटच्या टप्प्यात उमेदवारांमध्ये नवचैतन्य संचारले असून शहरातील वातावरण पुन्हा एकदा निवडणूकमय झाले आहे.

नगराध्यक्षपदासह प्रत्येक प्रभागातील उमेदवारांकडून जोरदार प्रचार सुरू आहे. गल्लोगल्ली प्रचाराचे भोंगे वाजत असून सभा, बैठका, कार्यकर्त्यांच्या बैठकींना वेग आला आहे. उमेदवार वारंवार मतदारांच्या दारात जाऊन थेट संपर्क साधत मतांची मागणी करत आहेत. काही भागांत प्रचाराच्या शेवटच्या फेरीचे नियोजनही करण्यात आले आहे. त्यामुळे आगामी निवडणूक अत्यंत चुरशीची होणार असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे. यातील वंचित व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने मधल्या काळात चांगली तयारी करत जोमाने रिंगणात उतरले होते तर नगरसेवक पदाचे उमेदवार अजूनही संभ्रमात असल्याचे दिसून येत आहे येथे काँग्रेसची ताकद काहीच नसल्याने जिल्हाध्यक्षांचे इकडे लक्ष नसल्याचे निर्देशनास येत आहे.

**नगराध्यक्षपदासाठी बहुरंगी लढत; प्रचाराला रंगत :** वाशीम नगरपरिषद नगराध्यक्षपदासाठी एकूण आठ उमेदवार रिंगणात असून प्रमुख उमेदवारांमध्ये भाजपकडून अनिल केंदळे, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाकडून रेखा सुरेश मापारी, आम आदमी पार्टीकडून सागर कोकास, वंचित बहुजन आघाडीकडून वैभव नितीन उलेमाले, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) कडून संदीप दहात्रे यांच्यासह अन्य उमेदवारांचा समावेश आहे. या बहुरंगी लढतीमुळे नगराध्यक्षपदाच्या प्रचाराला विशेष रंगत आली आहे.

## २१ डिसेंबरचा फैसला

# मालेगावात निकालापूर्वीच सट्ट्यांचा बाजार गरम; प्रशासन गार!

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

**एकीकडे लोकशाहीचा उत्सव, तर दुसरीकडे बिनधास्त सट्टेबाजी आणि प्रशासनाची शांतता त्यामुळे २१ डिसेंबरला फक्त निकालच नाही, तर सिस्टमचीही परीक्षा होणार आहे. आता पाहायचे एवढेच, मतपेट्या उघडल्यावर फक्त उमेदवारांचेच नाही, तर सट्टेबाजांचेही अंदाज किती खरे ठरतात!**


नगरपंचायत निवडणुकीचा निकाल २१ डिसेंबरला जाहीर होणार असून शहरात चर्चांना अक्षरशः ऊधाण आले आहे. चौकाचौकात, चहाच्या टपरीवर, तरुणांच्या गप्पांमध्ये एकच सवाल — हा येणार की तो? मात्र या चर्चांना वेगळाच रंग दिला आहे तो मालेगाव तालुक्यातील सट्टा धान्यांनी. कोण जिंकणार, कोण पडणार यावर भाव ठरवत जनतेची सर्रास लूट सुरू असल्याची चर्चा उघडपणे होत आहे.

परिस्थिती इतकी गोंधळाची आहे की चांगल्या-चांगल्यांनाही नेमका कोण निवडून येणार याचा अंदाज बांधणे कठीण झाले आहे. कोणाच्या झोळीत खुशी पडणार आणि कोणाच्या झोळीत गम, हे मतपेट्या उघडल्यावरच स्पष्ट होणार आहे. यंदाच्या लढतीत नवखे बाजी मारणार की जुने राजकीय खेळाडू आपली पकड कायम ठेवणार, यावरही जोरदार चर्चा रंगली आहे.

काहींसाठी ही निवडणूक अबकी बारष्ठ आखरी बार ठरत असून, तर काहींचे राजकीय अस्तित्वच पणाला लागले आहे. मात्र याहून गंभीर प्रश्न म्हणजे इतक्या दिवसांपासून सट्टा वाल्यांवर नेमकी एकही ठोस कार्यवाही का नाही? संबंधित विभागांचे दुर्लक्ष की वरपर्यंत पोहोचलेली सट्टेबाजांची कनेक्शन? सट्टा घेणाऱ्यांचे हात वरपर्यंत असल्यामुळेच कारवाई होत नाही, अशी चर्चा उघडपणे सुरू आहे. दुसरीकडे युवा वर्ग झटपट पैशाच्या नादात सट्ट्याकडे ओढला जात असून, सट्टा खवय्ये थेट युवकांच्या जीवाशी खेळत असल्याचे गंभीर चित्र आहे.

# मंगरूळपीर रोडवर अपघात; एक जण गंभीर जखमी

■ प्रतिनिधी | कारंजा ■



मंगरूळपीर रोडवरील HRP मॉलसमोर आज दुपारी सुमारे ४ वाजताच्या सुमारास दुचाकींची समोरासमोर धडक होऊन एक जण गंभीर जखमी झाल्याची घटना घडली. प्राप्त माहिती नुसार यशवंत आसरकर (रा. पोहा) हे आपल्या दुचाकी क्रमांक MH 37 AJ 5434 ने कारंजाहून पोहाकडे जात असताना HRP मॉलसमोर दुसऱ्या दुचाकीशी जोरदार समोरासमोर धडक झाली. धडकेचा आवाज इतका भीषण होता की परिसरात काही काळ खळबळ उडाली.

अपघाताची माहिती मिळताच ऐंड्र मॉलचे संचालक श्री. रवींद्र इंगळे यांनी तात्काळ प्रसंगावधान दाखवत गुरु मंदिर रुग्णवाहिकेचे रमेश देशमुख यांना संपर्क केला. त्यांनी ही माहिती समृद्धी रुग्णवाहिकेचे अजय घोडेस्वार यांना दिली. क्षणाचाही विलंब न लावता रुग्णवाहिका घटनास्थळी दाखल झाली व जखमी यशवंत आसरकर यांना कारंजा उपजिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथील वैद्यकीय अधिकारी डॉ. खडसे यांनी प्राथमिक उपचार करून जखमीची प्रकृती गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी अकोला येथे रेफर केले. या अपघातस्थळी मदतीसाठी शिवम खोड, छोटू उके, आकाश चव्हाण, वारकरी हॉटेल टीम, पुंडलिक नितनवरे, राहुल राठोड आदींनी मोलाची मदत केली. नागरिकांनीही तत्परता दाखवत वाहतूक सुरळीत करण्यात सहकार्य केले. वारंवार होणाऱ्या अपघातांमुळे मंगरूळपीर रोडवरील सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला.

# अल्पसंख्याकांच्या हक्कांचे संरक्षण व विकासासाठी शासन कटिबद्ध - जिल्हाधिकारी

## अल्पसंख्याक हक्क दिवस उत्साहात

■ प्रतिनिधी | वाशिम ■



अल्पसंख्याक समाजाला संविधानाने दिलेले हक्क सुरक्षित ठेवणे व त्या हक्कांवर आधारित सर्वांगीण विकास घडवून आणणे ही शासनाची प्रमुख जबाबदारी आहे. शिक्षण, आरोग्य, रोजगार व सामाजिक सुरक्षा या क्षेत्रांमध्ये अल्पसंख्याक घटकांना समान संधी मिळावी यासाठी केंद्र व राज्य शासन विविध योजनांच्या माध्यमातून प्रभावी प्रयत्न करत आहे. शासन, प्रशासन व समाज यांच्यात समन्वय साधूनच अल्पसंख्याक समाजाचा शाश्वत व सर्वसमावेशक विकास साधता येईल.असे प्रतिपादन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले.

जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या अध्यक्षतेखाली अल्पसंख्याक विकास विभाग व जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वतीने अल्पसंख्याक हक्क दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी ते बोलत होते.

यावेळी कार्यक्रमास निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, जिल्हा नियोजन अधिकारी राजेश सोनखासकर, गृह विभागाचे पोलीस उपअधीक्षक धर्मा सोनवणे, सहाय्यक नियोजन अधिकारी संजय राठोड, महिला व बालविकास अधिकारी उत्तम शिंदे, जिल्हा क्रीडा अधिकारी किशोर बोंडे, मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाचे व्यवस्थापक कविता कांबळे, प्राथमिक उपशिक्षणाधिकारी गजानन डाबेराव, माध्यमिक उपशिक्षणाधिकारी विठ्ठल भुसारी यांच्यासह विविध शासकीय यंत्रणांचे प्रमुख उपस्थित होते. या कार्यक्रमातून अल्पसंख्याक समाजाच्या घटनात्मक हक्कांची जाणीव करून देत शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ अधिकाधिक नागरिकांनी घ्यावा, असा संदेश देण्यात आला.विविध विभागांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील योजनांची माहिती देत लाभार्थ्यांनी पुढाकार घेऊन योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा नियोजन अधिकारी राजेश सोनखासकर यांनी केले. अल्पसंख्याक हक्क दिन साजरा करण्यामागील उद्देश स्पष्ट करताना त्यांनी संविधानाने दिलेल्या समानता, स्वातंत्र्य व न्याय या मूल्यांचे महत्त्व अधोरेखित केले. अल्पसंख्याक समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक उन्नतीसाठी शासनस्तरावर राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची रूपरेषाही त्यांनी उपस्थितांसमोर मांडली.

यावेळी पुढे बोलतांना जिल्हाधिकारी कुंभेजकर म्हणाले, अल्पसंख्याक समाजाचा सर्वांगीण विकास हा शासनाचा प्रमुख उद्देश आहे. विस्तारित महात्मा फुले जन आरोग्य योजना व प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेअंतर्गत मोफत व गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा उपलब्ध असून पात्र लाभार्थ्यांनी या योजनांचा लाभ घ्यावा, असे त्यांनी आवाहन केले.

# विकसित वाशिमसाठी भाजपाची भव्य संवाद सभा

## महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची उपस्थिती

■ प्रतिनिधी | वाशिम ■



वाशिम नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पार्टीच्या वतीने नगराध्यक्ष पदाचे अधिकृत उमेदवार अनिल माधवराव केंदळे तसेच सर्व १६ प्रभागांतील नगरसेवक पदाचे उमेदवार यांच्या प्रचारार्थ भव्य संवाद सभेचे आयोजन करण्यात आले आहे. या संवाद सभेसाठी भाजपाचे माजी प्रदेशाध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखरजी बावनकुळे आणि आ. संजय कुटे (माजी मंत्री, महाराष्ट्र शासन) यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. 'विकसित वाशिम नगरी' या संकल्पनेतून शहराच्या सर्वांगीण विकासाबाबत नागरिकांशी थेट संवाद साधण्यात येणार आहे. या प्रसंगी वाशिम शहरातील सुज्ञ व जागृत मतदार बंधू-भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन यावेळी आयोजकाच्या वतीने करण्यात आले आहे.

# श्री संताजी जगनाडे महाराज पुण्यतिथी पंधरवडा निमित्त दिनदर्शिकेचे विमोचन



■ प्रतिनिधी | अकोला ■

श्री संताजी जगनाडे महाराज यांच्या पुण्यतिथी पंधरवड्यानिमित्त श्री संताजी सेना, अकोला यांच्या वतीने संताजीभक्त दिनदर्शिकेचा भव्य विमोचन सोहळा श्री संताजी नगर येथे उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विष्णुपंत मेहेरे हे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून संताजी सेना अध्यक्ष प्रमोद देंडवे यांच्यासह दीपक हिचे, दिलीप नायसे, मदन भिरड, ठाकूरदास चौधरी, बालमुकुंद भिरड, माणिक नालट, रामेश्वर वानखडे, दिलीप क्षीरसागर, प्रवीण झापर्डे, देवाशिष काकड, मंगेश वानखडे, संजय जयसनपुरे, कैलास दळवी आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमात संताजी सेनेच्या विविध सामाजिक व संघटनात्मक कार्याचा सविस्तर आढावा जिल्हाध्यक्ष मनोज जुमळे यांनी मांडला. तसेच समाजकार्य व विविध उपक्रमांची माहिती योगेश गोतमारे यांनी उपस्थितांना दिली. संताजीभक्त दिनदर्शिकेचे विमोचन मनीष थोटांगे यांनी केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन सागर नालट यांनी मानले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राहुल धनभर, अभी धनभर, अभी देंडवे, वैभव धनभर, ऋषी गोतमारे, शुभम धनभर, गौरव जुमडे, बाळूभाऊ भागवत, पंजाब भागवत, प्रकाश धनभर, प्रवीण जामोदे आदी कार्यकर्त्यांनी विशेष परिश्रम घेतले. या प्रसंगी मोठ्या संख्येने संताजीभक्त व नागरिक उपस्थित होते.

# कबड्डी फेडरेशन रेफरी बोर्ड चे सदस्य पदी विजय मोटघरे यांची निवड



■ प्रतिनिधी | कारंजा ■

एमयुचर कबड्डी फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या रेफरी बोर्डाच्या सदस्य पदी विजय रामहरी मोटघरे सेवानिवृत्त शिक्षक यांची निवड करण्यात आली.

महाराष्ट्रातील हौशी कबड्डी फाउंडेशन च्या पाचव्या राष्ट्रीय फेडरेशन कप चे आयोजन करीत आहे याचे आयोजन सर्वोच्च न्यायालयाचे वकील जागतिक कबड्डी फेडरेशनचे मुख्य कायदेशीर सल्लागार आणि भारतीय हौशी कबड्डी फेडरेशनचे सरचिटणीस श्री ए उशी रेड्डी यांच्या शुभहस्ते करण्यात आले आहे त्याकरिता त्यांनी खालील व्यक्तीची नियुक्ती केली आहे हरीश कुमार झारखंड रामानाधाम तेलंगणा रमेश धारावत तेलंगणा विजयकुमार रामहरी मोटघरे कारंजा लाड वाशिम जिल्हा महाराष्ट्र यांचा सुद्धा समावेश आहे विजयकुमार मोटघरे यांचे कबड्डीचे रेप्री म्हणून चांगले नाव आहे विजयकुमार मोट घरे यांची महाराष्ट्रातून फक्त एकाच व्यक्तीची निवड करण्यात आली मोटघरे यांचे रूपाने एमीचर कबडी फेडरेशनऑफ इंडिया म्हणजेच ऑल इंडियाच्या लेव्हलवर विजयकुमार मोटघरे यांचे रूपाने महाराष्ट्रला हा बहुमान मिळाला त्यांना हा बहुमान श्री ए उशी सर्वोच्च न्यायालयाचे वकील यांचे पत्राने मिळाला आहे त्यांना हा मिळालेल्या बहुमाना बद्दल व त्यांच्या या निवडी बद्दल सर्वत्र कौतुक केले जात आहे.

# कृषी विज्ञान केंद्रामार्फत आदिवासी महिलांच्या उत्पन्न व पोषण सुरक्षेसाठी कुक्कुटपालन प्रशिक्षण कार्यक्रम

■ प्रतिनिधी | वाशिम ■




भारतीय कृषी अनुसंधान परिषद, नवी दिल्ली यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी विज्ञान केंद्र, वाशिम यांच्यावतीने Tribal Sub Plan (TSP) कार्यक्रमांतर्गत १५ डिसेंबर रोजी कृषी विज्ञान केंद्र, करडा प्रक्षेत्र येथे आदिवासी घटकातील महिलांसाठी प्रशिक्षण व निविष्ठा वितरण कार्यक्रमाचे आयोजन कृषी विज्ञान केंद्राचे वरिष्ठ शास्त्रज्ञ व प्रमुख डॉ. आर एल. काळे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

कार्यक्रमामध्ये पशुसंवर्धन विभागाचे विषय विशेषज्ञ मयूर संजय देशमुख यांनी कुक्कुटपालन व्यवसायाच्या माध्यमातून आदिवासी महिलांचे आर्थिक सक्षमीकरण कसे साध्य करता येईल, याबाबत सखोल मार्गदर्शन करण्यात आले. प्रशिक्षण सत्रामध्ये सोनाली जातीच्या कुक्कुट पक्षांचे शास्त्रीय संगोपन, संतुलित व पोषणयुक्त खाद्य व्यवस्थापन, पाणी व्यवस्थापन, लसीकरणाचे वेळापत्रक, रोग प्रतिबंधक उपाययोजना, तसेच स्वच्छता व जैव-सुरक्षा (Bio-security) व्यवस्थापन या विषयांवर सविस्तर माहिती देण्यात आली. पुढे मार्गदर्शन करताना त्यांनी सांगितले की, कुक्कुटपालन हा कमी भांडवलातील, कमी जोखमीचा व फायदेशीर व्यवसाय असून तो घरच्या घरी सहजपणे राबविता येतो. योग्य व्यवस्थापन केल्यास या व्यवसायातून मांस व अंडी उत्पादनात लक्षणीय वाढ होऊ शकते. तसेच उत्पादन वाढ व आर्थिक शाश्वततेसाठी शासकीय योजना, बाजारपेठ व्यवस्थापन, तसेच नोंद ठेवण्याचे (Record keeping) महत्त्व त्यांनी स्पष्ट केले. या कार्यक्रमामध्ये मौजे कुऱ्हा, तालुका रिसोड, जिल्हा वाशिम येथील आदिवासी घटकातील महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

कार्यक्रमाच्या शेवटी सहभागी आदिवासी महिलांना सोनाली जातीच्या कुक्कुट पक्षांचे निविष्ठा स्वरूपात वितरण करण्यात आले.

# वाटर शेड महोत्सव कार्यक्रम



**मालेगाव :** ग्राम ढोरखेडा येथे प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना घटक २.० अंतर्गत वॉटरशेड महोत्सव कार्यक्रम चे आयोजिन करण्यात आले असुन मा.सौ.सुनिता दत्तात्रेय मिटकरी अध्यक्ष तथा संरपच पाणलोट विकास समिती, दत्तात्रेय मिटकरी मामा ढोरखेडा , कैलास देवकर तालुका कृषी अधिकारी तथा प्रकल्प कार्यान्वयीन यंत्रणा मालेगाव, धनंजय शितोळे उपकृषी अधिकारी शिरपुर , विकास आरू साहाय्य कृषी अधिकारी ,जि.प .शाळेचे मुख्याध्यापक जाधव ,जि.प.शाळा शिक्षीका सौ देशमुख ,पाणलोट पथक सदस्य गणेश अढाव, निलेश इंगळे, युसुफ चौधरी ,सौ.अंजली सावळे इतर उपस्थित मान्यवर मंडळीनी वॉटर शेड महोत्सव कार्यक्रम प्रसंगी पाणलोट विषयी सविस्तर मार्गदर्शन केले वॉटर शेड महोत्सवा निमित्त इयत्तां १ ते ७ वी तील विद्यार्थ्यानी सहभागी होऊन जलसंधारणाच्या बाबतीत विविध प्रकारच्या रांगोळी काढली व विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले. इतर पाणलोट कार्यक्रम विषयी घेण्यात आले.

# सचिवांनी ग्रामपंचायत निधीचा अपहार केल्याचा आरोप

## पिंपळखुटा येथील प्रकार; बीडीओकडे तक्रार, चौकशीचे आदेश

■ प्रतिनिधी | खेट्री ■

पातुर पंचायत समिती अंतर्गत पिंपळखुटा ग्रामपंचायतीचे सचिव सागर रोठे यांनी १५ व्या वित्त आयोगातील लाखो रुपयांचा अपहार केल्याचा गंभीर आरोप राष्ट्रवादी काँग्रेस किसान सभेचे जिल्हाध्यक्ष अरविंद पाटील यांनी केला आहे. याबाबत त्यांनी दि. १८ डिसेंबर रोजी पातुरचे गटविकास अधिकारी (बीडीओ) यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे.

तक्रारीनुसार, विविध योजनांअंतर्गत कोणतीही ई-निविदा प्रक्रिया किंवा दरपत्रक न मागविता साहित्य खरेदी दाखविण्यात आली.





खरेदी केलेल्या साहित्याच्या नोंदी साठा पुस्तकी करण्यात आलेल्या नाहीत. तसेच बांधकाम कामांचे मोजमाप पुस्तकीत रॉयल्टी, टेस्ट रिपोर्ट व जीएसटी रकमेसह मूल्यांकन करण्यात आलेले नाही. रॉयल्टीच्या पावत्यांबाबत गौण खनिज अधिकाऱ्यांकडून तपासणी अहवाल घेण्यात आलेला नाही. कोणत्याही कामासाठी शासकीय प्रयोगशाळेतील साहित्य तपासणीचे टेस्ट रिपोर्टही उपलब्ध नाहीत. याशिवाय जीएसटीची रक्कम शासन खात्यात भरणा न केल्याचा आरोपही तक्रारीत नमूद करण्यात आला आहे. या प्रकरणी सखोल चौकशी करून शासनाच्या निधीची वसुली करावी, तसेच संबंधित सचिवाला निलंबित करून फौजदारी कारवाई करावी, अशी मागणी तक्रारीद्वारे करण्यात आली आहे.

**विस्तार अधिकाऱ्यांना चौकशीचे आदेश :** पिंपळखुटा ग्रामपंचायतीतील निधी अपहाराच्या तक्रारीची दखल घेत गटविकास अधिकाऱ्यांनी विस्तार अधिकारी अनंत लव्हाळे यांना चौकशी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

'ग्रामपंचायतीच्या सर्व कामांचे एमबीसीसी (श्ँण्ण) केलेले आहे. ग्रामपंचायतीच्या निधीचा कोणताही अपहार झालेला नाही. तक्रारीत तथ्य नाही. तरीही मी गटविकास अधिकाऱ्यांच्या चौकशीला सामोरे जाण्यास तयार आहे.'

- **सागर रोठे,** सचिव, पिंपळखुटा

.........................

'पातुर पंचायत समिती अंतर्गत पिंपळखुटा ग्रामपंचायतीत ५० लाखांपेक्षा जास्त भ्रष्टाचार झाल्याची बाब सर्वसामान्य नागरिकांना माहीत होती. मग विस्तार अधिकारी झोपी गेले होते का? जर संबंधित विस्तार अधिकारी ग्रामसेवकांना पाठीशी घालत असतील, तर त्यांनाही सहआरोपी करण्यात यावे.'

**अरविंद पाटील,**
जिल्हाध्यक्ष, किसान सभा, राष्ट्रवादी काँग्रेस, अकोला

# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २४ ■ शुक्रवार, १९ डिसेंबर २०२५ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


२१ डिसेंबरला 'निकाल युद्ध'

## ५९ टेबलवर सहा नगरपालिकांची मतमोजणी

### -३१५ कर्मचारी सेवेत; मतमोजणी केंद्रांवर पोलिसांचा कडक पहारा

**वर्धा जनमाध्यम :** जिल्ह्यातील सहा नगरपालिकांच्या निवडणूक रणसंग्रामाचा अंतिम टप्पा आता अवघ्या काही तासांवर येऊन ठेपला असून रविवार, २१ डिसेंबर रोजी सहा ठिकाणी मतमोजणी होणार आहे. निकालासाठी संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले असताना प्रशासनाने मतमोजणीची तयारी युद्धपातळीवर पूर्ण केली आहे. ५९ टेबलवरून मतमोजणी होणार असून यासाठी ३१५ अधिकारी व कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून मतमोजणी केंद्र परिसरात तगडा पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे.

जिल्ह्यातील पाच नगरपालिकांतील अध्यक्ष पदांसह १३९ नगरसेवकांच्या निवडीसाठी २ डिसेंबर रोजी मतदान पार पडले होते. यामध्ये ६०.५० टक्के मतदान झाले. २ लाख ५९ हजार ८०० मतदारांपैकी १ लाख ५७ हजार १६८ मतदारांनी आपला हक्क बजावला. यात ८०,९६६ पुरुष, ७६,४६५ महिला आणि ४ तृतीयपंथी मतदारांचा समावेश आहे. ही मतदान प्रक्रिया जिल्ह्यातील २८८ मतदान केंद्रांवर पार पडली. मतदानाच्या टक्केवारीत सिंदी (रेल्वे) नगरपालिकेत ७१.२२ टक्के मतदान झाले असून सर्वाधिक मतदानाची नोंद येथे झाली. हिंगणघाटमध्ये ६२.२०, आर्वीत ६१.२७, पुलगावमध्ये ५९.१९ तर वर्ध्यात ५७.३३ टक्के मतदान झाले आहे. या मतदानातून कोणाला जनतेने कौल दिला, हे २१ डिसेंबरला स्पष्ट होणार आहे. दरम्यान, निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार देवळी नगरपालिकेतील नगराध्यक्ष व २० सदस्य, तसेच हिंगणघाटमधील ३, वर्धा व पुलगावमधील प्रत्येकी २ सदस्यांच्या जागांसाठी २० डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी सहाही नगरपालिकांची मतमोजणी होणार असल्याने निकालाचा थरार शिगेला पोहोचणार आहे.

**पोस्टल बॅलेटसाठी स्वतंत्र व्यवस्था-** मतमोजणी प्रक्रिया सकाळी ८ वाजतापासून सुरू होणार आहे. पोस्टल बॅलेटसाठी स्वतंत्र टेबलांची व्यवस्था करण्यात आली आहे. सर्व टेबलांवर राजकीय पक्षांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार असून त्यांच्या उपस्थितीतच मतमोजणीची प्रक्रिया पार पडणार असल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी गणेश खताळे यांनी दिली.

**ऑन-कॅमेरा मतमोजणी; २०० मीटर परिसरात निर्बंध**

मतमोजणी पूर्णपणे पारदर्शक व्हावी यासाठी ही प्रक्रिया ऑन-कॅमेरा केली जाणार आहे. मतमोजणी स्थळी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले असून केंद्राच्या २०० मीटर परिसरात कडक निर्बंध लागू राहणार आहेत. कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये यासाठी पोलिसांचा चोख बंदोबस्त तैनात राहणार आहे.

**वर्धा नगर पालिका**
टेबल : १६ । फेऱ्या:०७ । कर्मचारी : ८६

**हिंगणघाट नगर पालिका**
टेबल : १४ । फेऱ्या:११ । कर्मचारी : ११६

**आर्वी नगर पालिका**
टेबल : १३ । फेऱ्या:०४ । कर्मचारी : ४२

**पुलगाव नगर पालिका**
टेबल : ०६ । फेऱ्या:०६ । कर्मचारी : ३२

**देवळी नगर पालिका**
टेबल : ०४ । फेऱ्या:०४ । कर्मचारी : १४

**सिंदी (रेल्वे) नगर पालिका**
टेबल : ०६ । फेऱ्या:०४ । कर्मचारी : २५

## मनरेगातून गांधींचे नाव हटवण्याचा डाव उघड - काँग्रेसचा जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा

### -महात्मा गांधीच्या नावाचा अपमान खपवून घेतला जाणार नाही : काँग्रेसचा एल्गार



**वर्धा जनमाध्यम :** महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) या देशातील कोट्यवधी ग्रामीण कुटुंबांचा आधार असलेल्या योजनेतून महात्मा गांधी यांचे नाव हटवण्याच्या हालचालींविरोधात वर्ध्यात काँग्रेस आक्रमक झाली आहे. महिला काँग्रेस कमिटीच्या वतीने मंगळवारी १८ डिसेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जोरदार आंदोलन छेडण्यात आले. काँग्रेसच्या महिला राष्ट्रीय अध्यक्षा अल्का लांबा यांच्या निर्देशानुसार संध्या सव्वालाखे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि महिला जिल्हाध्यक्ष अरुणा धोटे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन पार पडले.

मनरेगा ही केवळ रोजगार योजना नसून ग्रामीण भारताच्या जगण्याची हमी आहे. वर्षाकाठी १०० दिवस रोजगार देणारी ही योजना शेतमजूर, कष्टकरी, महिला व गरीब कुटुंबांसाठी संजीवनी ठरली आहे. या योजनेला महात्मा गांधी यांचे नाव जोडले जाणे हा गांधीविचार, सत्य, अहिंसा व सामाजिक न्यायाचा सन्मान आहे. संपूर्ण जगाने ज्यांना 'महात्मा' म्हणून नतमस्तक व्हावे, त्या महापुरुषाचे नाव हटवण्याचा प्रयत्न म्हणजे देशाच्या इतिहासावर घाला असल्याचा संतप्त आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. आंदोलनादरम्यान भाजप सरकारविरोधात तीव्र घोषणाबाजी करण्यात आली. गांधींचे नाव हटवण्याचा डाव खपवून घेतला जाणार नाही, मनरेगा म्हणजे गांधीविचार अशा घोषणा देत काँग्रेस कार्यकर्ते जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकले. यावेळी राष्ट्रपतींच्या नावाने जिल्हा प्रशासनाला निवेदन सादर करण्यात आले. मनरेगाचे मूळ नाव कायम ठेवावे, अन्यथा राज्यभर तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही देण्यात आला.

या आंदोलनात वर्धा जिल्हा काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष मनोज चांदुरकर यांच्यासह बाळा जगताप, मनीषा फिसके, रोशना जामलेकर, राजू वानखेडे, अविनाश इंदुरकर, मनोज चौधरी, पंकज काचोळे, सतीश भावरकर, गोविंद दिघीकर, राहुल सुरकार, संगीता ठवळे, स्वरूपा हजारे, ऋतुजा भोयर, वनीता मरसकोल्हे, वंदना चिडाम, सुरजी चौधरी, विजय नरांजे, वनिता धामंदे, शालू मरसकोल्हे, मोहिनी मरसकोल्हे, अंजली धोटे आदी काँग्रेस कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. काँग्रेसने स्पष्ट शब्दांत सांगितले की, महात्मा गांधींच्या नावावर हात टाकणाऱ्यांना रस्त्यावर उतरवूनच उत्तर दिले जाईल, आणि गरज पडल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल.

### शेतकऱ्यांचा श्वास कोंडणारा विकास

## आष्टी-कारंजा (घा.) सिमेंट रस्त्याने शेत रस्तेच गाडले; शेतमाल शेतातच अडकल्याने संतापाचा उद्रेक



**आष्टी (शहीद) जनमाध्यम :** आष्टी ते कारंजा (घा.) मार्गावरील सिमेंट रस्त्याच्या कामाने विकासाचा बागुलबुवा उभा करत थेट शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळले आहे. रस्त्याचे काम सुरू असतानाच शेतात जाणाऱ्या पायवाटा, बैलगाडीचे मार्ग आणि जोडरस्ते पूर्णतः बंद झाल्याने शेतमाल शेतातच अडकून पडला आहे. परिणामी शेतकऱ्यांची पायपीट वाढली असून संताप अनावर झाला आहे.

एका बाजूचे काम सुरू असताना साईडपट्टी भरण्यासाठी नाली खोदून त्यातीलच मुरूम वापरण्यात आला. खर्च वाचविण्याच्या नादात ठेकेदाराने केलेल्या या 'अनोख्या प्रयोगा'मुळे रस्ता खोलवर गेला आणि शेतरस्ते नामशेष झाले. साईडपट्टी भरण्यासाठी बाहेरून मुरूम आणणे आवश्यक असताना नियम धाब्यावर बसवून थेट शेतकऱ्यांचा मार्ग बंद केल्याचा आरोप होत आहे.

शेतकऱ्यांनी वारंवार पाईप टाकून त्यावर मुरूम घालून तात्पुरता रस्ता सुरू करण्याची मागणी केली, मात्र ठेकेदाराने दखल घेतली नाही. अखेर संतप्त शेतकऱ्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागातील अभियंता पठाण यांची भेट घेऊन निवेदन दिले. काम पूर्ण झाल्यावर पाहू, असे उत्तर मिळाले, पण आजची तातडीची गरज दुर्लक्षित राहिल्याने शेतकऱ्यांचा संयम सुटत आहे.

तलाठी, महसूल विभागाकडे धाव घेऊनही दिलासा मिळाला नाही. तहसीलदारांनी प्रत्यक्ष पाहणी न केल्याने 'महसूल प्रशासन शेतकऱ्यांसोबत की ठेकेदारांच्या बाजूने? असा प्रश्न उपस्थित होत आहे. शेतात जाण्याचा रस्ता बंद, शेतमाल अडकलेला, नुकसान वाढत असताना प्रशासनाची शांतता शेतकऱ्यांना चिडवणारी ठरत आहे.

तात्काळ पाईप टाकून शेतरस्ते पूर्ववत न केल्यास रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे. विकास हवा, पण शेतकऱ्यांचा बळी नको, असा स्पष्ट संदेश या संतप्त आवाजातून उमटत आहे.

## १९ व २० डिसेबर रोजी मतदान केंद्र हद्दीतील शाळा व महाविद्यालयांना सुट्टी जाहिर



**वर्धा जनमाध्यम :** वर्धा जिल्ह्यात संपूर्ण देवळी नगरपरिषद, वर्धा नगर परिषदेतील प्रभाग ९ ब व १९ ब, हिंगणघाट ५ अ, ५ ब व ९ अ आणि पुलगाव येथील २ अ व ५ अ या प्रभागासाठी सुधारीत निवडणूक कार्यक्रमानुसार २० डिसेंबर रोजी मतदान होणार आहे. या मतदान केंद्रावर निवडणूकांसाठी नियुक्त अधिकारी व कर्मचारी निवडणूक साहित्य घेऊन जाणार असल्याने संपूर्ण देवळी नगर परिषद हद्दीसह वर्धा, हिंगणघाट व पुलगाव येथील मतदान होणा-या प्रभाग हद्दीतील शाळा व महाविद्यालयांना १९ व २० डिसेंबर रोजीची सुट्टी जाहिर करण्यात आली असून असे जिल्हाधिकारी वान्मथी सी यांनी काढलेल्या आदेशात नमुद केले आहे.

## हिंगणघाटमध्ये श्री साई कथा सप्ताहाची भक्तिमय सुरुवात



**हिंगणघाट जनमाध्यम :** हिंगणघाट येथील नंदोरी रोडवरील श्री साई प्रतिष्ठानच्या वतीने श्री संत साईबाबा मूर्ती प्राणप्रतिष्ठा दिन व प.पू. श्री संत लक्ष्मीमाताजी पुण्यतिथी महोत्सवानिमित्त १८ डिसेंबरपासून श्री साई कथा सप्ताहाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. दररोज दुपारी २ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत होणाऱ्या या कथा सप्ताहामुळे परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे.

या सप्ताहात झी टीव्ही फेम प्रसिद्ध साई कथाकार ह.भ.प. बाळकृष्ण महाराज सुरासे (शिर्डी) आपल्या ओजस्वी आणि भावस्पर्शी वाणीमधून श्री साईबाबांच्या जीवनकार्याचा, श्रद्धा, सबुरी आणि सबका मालिक या तत्त्वांचा सखोल उलगडा करीत आहेत. त्यांच्या प्रभावी कथाकथनातून भाविकांना अध्यात्मिक समाधान, मानसिक शांती व जीवनाला नवी दिशा मिळत असल्याची भावना उपस्थित भाविकांतून व्यक्त होत आहे.

कथा सप्ताहासोबतच समाजोपयोगी उपक्रमांचाही समावेश करण्यात आला आहे. मंगळवार, २३ डिसेंबर रोजी सर्वसामान्य नागरिकांसाठी निशुल्क आरोग्य तपासणी व औषधोपचार महाशिबिराचे आयोजन करण्यात आले असून, गरजू रुग्णांना मोफत वैद्यकीय सेवा उपलब्ध करून दिली जाणार आहे. तसेच बुधवार, २४ डिसेंबर रोजी श्री साईबाबांच्या कृपेने भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

या धार्मिक व सामाजिक उपक्रमाचा लाभ हिंगणघाट व परिसरातील अधिकाधिक भाविकांनी घ्यावा, असे आवाहन श्री साई प्रतिष्ठानचे अध्यक्ष योगेश्वर महाराज व सचिव अतुल वांदिले यांनी केले आहे. श्री साई कथा सप्ताहामुळे परिसरात भक्ती, सेवा आणि सद्भावनेचा संगम अनुभवायला मिळत आहे.

## तांड्यांना महसुली दर्जा; यवतमाळ जिल्ह्यात ३१ नवीन ग्रामपंचायतींची निर्मिती

### -राज्य शासनाचा ऐतिहासिक निर्णय; बंजारा-लमाण समाजाच्या विकासाला नवी दिशा

**यवतमाळ जनमाध्यम :** जिल्ह्यातील बंजारा व लमाण समाजाच्या तांड्यांना स्वतंत्र ग्रामपंचायतीचा दर्जा देण्याचा ऐतिहासिक निर्णय राज्य शासनाने घेतला असून, त्यामुळे जिल्ह्यातील ग्रामीण स्वराज्य व्यवस्थेत मोठा परिवर्तनाचा टप्पा सुरू झाला आहे. आतापर्यंत जिल्ह्यात १ हजार २०३ ग्रामपंचायती अस्तित्वात होत्या. आता ३१ नवीन ग्रामपंचायतींना मंजुरी मिळाल्याने हा आकडा १ हजार २३४ वर पोहोचला आहे. या निर्णयामुळे तांड्यांच्या सर्वांगीण विकासाचा मार्ग मोकळा झाला आहे.

राज्यातील बंजारा व लमाण समाज पारंपरिकरीत्या तांडा पद्धतीने, मुख्य गावांपासून दूर व अनेकदा डोंगराळ भागात वास्तव्यास आहे. महसूल गावाचा दर्जा नसल्याने या तांड्यांना ग्रामपंचायत स्थापन करता येत नव्हती. परिणामी शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा, रस्ते, वीज, घरकुल यांसारख्या मूलभूत सुविधांपासून हा समाज वर्षानुवर्षे वंचित राहिला होता. या पार्श्वभूमीवर शासनाने घेतलेला हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे.

संत सेवालाल महाराज बंजारा तांडा समृद्धी योजनेअंतर्गत या तांड्यांना स्वतंत्र ग्रामपंचायतीचा दर्जा देण्यात आला आहे. योजनेसाठी ५०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून, स्वतंत्र लेखाशीर्षालाही मान्यता देण्यात आली आहे. तसेच दोन गावांतील ३ किलोमीटर अंतराची अट शिथिल केल्याने दूरवरच्या तांड्यांनाही ग्रामपंचायतीचा लाभ मिळणे शक्य झाले आहे.

पुसद, उमरखेड, महागाव, दिग्रस, नेर, दारव्हा आदी तालुक्यांतील लोहार, पारवा, रामनगर, शिवानगर, बजरंगनगर, धनसिंगनगर, सेवादासनगर, रामपूर, वाघजळी, आरेगाव खुर्द, साधूनगर, मनोहरनगर, कातरवाडी, शिवाजीनगर, इसापूर, धमापूर, मथुरा नगर, सेवादासनगर तांडा आदी तांड्यांना स्वतंत्र ओळख व स्वायत्त कारभाराचा अधिकार मिळाला आहे.

या निर्णयामुळे तांड्यांना थेट निधी व शासकीय योजनांचा लाभ मिळणार असून, विकास आराखड्यांची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे होणार आहे. आतापर्यंत मोठ्या ग्रामपंचायतींवर अवलंबून असलेले तांडे आता स्वतःचे निर्णय स्वतः घेऊ शकणार आहेत. त्यामुळे बंजारा व लमाण समाजाच्या सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक विकासाला निश्चितच वेग मिळेल, अशी आशा व्यक्त होत आहे.

## कंत्राटदाराला श्रद्धांजली वाहून नागरिकांचा संताप; अपूर्ण रस्त्याने घेतला एकाचा बळी



**वर्धा जनमाध्यम :** गोपुरी चौक ते साटोडा या पंतप्रधान ग्राम सडक योजनेतील रस्त्याचे काम दोन वर्षांपासून रखडले असून, या रस्त्यावरून प्रवास करणे म्हणजे मृत्यूला आमंत्रण ठरत आहे. कंत्राटदार आणि बांधकाम विभागाच्या कुंभकर्णी झोपेचा निषेध करत साटोडा, आलोडी व नालवाडी येथील संतप्त नागरिकांनी थेट कंत्राटदारालाच प्रतिकात्मक श्रद्धांजली वाहत प्रशासनाच्या संवेदनशून्यतेवर जोरदार आसूड ओढला.

२०२४ च्या विधानसभा निवडणुकीपूर्वी मंजूर झालेला सुमारे ३ किलोमीटर लांबीचा हा रस्ता आजही अर्धवट अवस्थेत आहे. दोन वर्षांत केवळ २०० मीटर रस्त्याचे काम झाले असून, तेही निकृष्ट दर्जाचे आहे. काही ठिकाणी टाकलेला सिमेंट काँक्रिटचा पहिला थर पाणी न मारल्यामुळे उखडून गिट्टी उघडी पडली आहे. परिणामी रस्त्यावर धुळीचे लोट उडत असून, नागरिकांचे श्वसनाचे आजार वाढत आहेत. जागोजागी पडलेले खड्डे आणि उघडी गिट्टी दुचाकीस्वारांसाठी जीवघेणी ठरत आहे.

या मार्गावरून महाकाळ, साटोडा, आलोडी व नालवाडी येथील शेकडो नागरिकांची रोजची ये-जा असते. शालेय विद्यार्थी जीव मुठीत घेऊन सायकलने शाळेत जात आहेत. रस्त्यावर संध्याकाळी फिरायला गेलेल्या एका ज्येष्ठ नागरिकाचा अपघातात मृत्यू झाल्याची घटना घडूनही प्रशासन ढवळून निघालेले नाही. कोणीतरी मेल्याशिवाय काम होत नाही का? असा संतप्त सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत.

या रस्त्याच्या दुरवस्थेबाबत नागरिकांनी जिल्हाधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच लोकप्रतिनिधींना वेळोवेळी निवेदने दिली. मात्र, आश्वासनांपलीकडे काहीच झाले नसल्याने प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचा आरोप करण्यात येत आहे. अखेर संतप्त नागरिकांनी वेगळ्या मार्गाने निषेध नोंदविण्याचा निर्णय घेतला.

साटोडाचे सरपंच गौरव गावंडे, वर्धा कृषी बाजार समितीचे अध्यक्ष अमित गावंडे, ग्रामपंचायत सदस्य नरेश होणाडे, संदीप मारवाडी, प्रवीण नागोसे, गणेश ढवळे, ज्ञानेश्वर जवादे, नितीन पचारे, बिपीन कठाणे, सूरज तेलरांधे, रमेश लाडेकर, बिरजू डोंगरे, विनोद सायरे यांच्यासह नागरिकांनी कंत्राटदाराच्या नावाचा भावपूर्ण श्रद्धांजली फलक लावून त्यासमोर मेणबत्त्या पेटवत प्रशासनाला जागे करण्याचा प्रयत्न केला. हा रस्ता तातडीने पूर्ण न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही नागरिकांनी दिला असून, आता तरी प्रशासन जागे होणार का, असा प्रश्न संपूर्ण परिसरात चर्चेचा विषय ठरत आहे.

## खंडवा दर्शन सुलभ होणार:थेट रेल्वेसाठी खासदारांचा रेल्वेमंत्र्यांकडे दबाव

### -नागपूर–वर्धा–भुसावळ–खंडवा थेट रेल्वेसाठी पाठपुरावा

**वर्धा जनमाध्यम :** वर्धा व परिसरातील प.पु. दादाजी धुनिवाले यांच्या भक्तांसाठी खंडवा दर्शनाचा प्रवास सुलभ व्हावा, यासाठी नागपूर-वर्धा-भुसावळ-खंडवा थेट रेल्वेगाडी सुरू करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे. भक्तांच्या विनंतीची दखल घेत खासदार अमर काळे यांनी केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांच्याकडे प्रत्यक्ष भेट घेऊन ठाम भूमिका मांडली.

वर्धा येथे प.पु. दादाजी धुनिवाले यांचा मठ असून, वर्धा व आजूबाजूच्या भागात मोठ्या प्रमाणात भक्तगण आहेत. ही भक्तमंडळी नियमितपणे खंडवा येथे दर्शनासाठी जातात. मात्र सध्या थेट रेल्वे नसल्याने नागपूर मार्गे प्रवास करावा लागतो. एकाच प्रवासात दोन वेळा गाड्या बदलण्याची गैरसोय, वेळेचा अपव्यय व त्रास सहन करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर खासदार अमर काळे यांनी ४ एप्रिल २०२५ रोजी रेल्वे मंत्र्यांना पत्र देत वर्धा–भुसावळ–खंडवा थेट रेल्वे सुरू करण्याची मागणी केली होती. त्याच पत्राचा पाठपुरावा करण्यासाठी संसदेच्या हिवाळी सत्रात त्यांनी पुन्हा भेट घेऊन चर्चा केली. खासदारांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याची दखल घेत रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी या मागणीवर सकारात्मक विचार करण्याचे आश्वासन दिले आहे. ही गाडी सुरू झाल्यास भक्तांसह सामान्य प्रवाशांनाही मोठा दिलासा मिळणार असून, दळणवळणाला नवे बळ मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## निवडणूक खर्चाच्या हिशेबावर प्रशासनाची करडी नजर

### -उमेदवारांना खर्चाची सखोल पडताळणी अनिवार्य

**वर्धा जनमाध्यम :** वर्धा नगरपालिकेच्या अध्यक्ष व ३८ सदस्य पदांसाठी झालेल्या निवडणुकीनंतर आता उमेदवारांच्या निवडणूक खर्चावर प्रशासनाने करडी नजर टाकली आहे. निवडणूक लढविलेल्या सर्व उमेदवारांना त्यांच्या निवडणूक खर्चाचा तपशील सादर करून त्याची पडताळणी करून घेणे बंधनकारक करण्यात आले आहे. यासंदर्भात निवडणूक निर्णय अधिकारी गणेश खताळे यांनी स्पष्ट सूचना दिल्या आहेत.

वर्धा नगरपालिकेतील प्रभाग क्रमांक ९ 'ब' व प्रभाग क्रमांक १९ 'ब' या दोन प्रभागांव्यतिरिक्त अध्यक्ष व इतर सदस्य पदांसाठी २ डिसेंबर रोजी मतदान पार पडले आहे. उर्वरित दोन प्रभागांसाठी २० डिसेंबर रोजी मतदान होणार असून २१ डिसेंबर रोजी मतमोजणी केली जाणार आहे. या संपूर्ण निवडणूक प्रक्रियेच्या पार्श्वभूमीवर खर्चाच्या नियमांचे काटेकोर पालन होावे, यासाठी खर्च तपासणी पथक सक्रिय करण्यात आले आहे.

अध्यक्ष व सदस्य पदासाठी निवडणूक लढविलेल्या उमेदवारांनी २ डिसेंबरपर्यंत केलेल्या खर्चाची प्रथम पडताळणी १९ डिसेंबरपर्यंत करण्यात येणार आहे. ही पडताळणी वर्धा नगरपालिकेच्या अटल बिहारी वाजपेयी सभागृहात खर्च तपासणी पथकाच्या माध्यमातून होणार आहे. उमेदवारांनी सादर केलेले खर्चाचे हिशेब, बिले, पावत्या व अन्य कागदपत्रांची सखोल तपासणी केली जाणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

दरम्यान, प्रथम टप्प्यातील पडताळणीनंतर उर्वरित कालावधीत झालेल्या खर्चाची अंतिम तपासणी करण्यात येणार असून त्याचा सविस्तर अहवाल निवडणूक आयोगाकडे पाठविला जाणार आहे. नियमबाह्य किंवा मर्यादेपेक्षा जास्त खर्च आढळल्यास संबंधित उमेदवारांवर कारवाई होण्याची शक्यताही नाकारता येत नाही.

वर्धा नगरपालिकेची निवडणूक लढविलेल्या उमेदवारांनी २ डिसेंबरपर्यंत केलेल्या खर्चाची पडताळणी १९ डिसेंबरपर्यंत खर्च तपासणी पथकाकडून केली जाणार आहे. त्यानंतरच्या खर्चाची अंतिम पडताळणी करून संपूर्ण माहिती निवडणूक आयोगाकडे पाठविली जाईल.

भैय्यालाल बमनोटे, नोडल अधिकारी, खर्च तपासणी पथक

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय



# महाराष्ट्र भूषण राम सुतार यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** जगप्रसिद्ध शिल्पकार महाराष्ट्रभूषण राम सुतार यांच्या पार्थिवावर नोएडा येथील वैकुंठ स्मशानभूमीत शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. महाराष्ट्र शासनाच्या वतीने राजशिष्टाचार व पणन मंत्री जयकुमार रावल यांनी पुष्पचक्र अर्पण करून आदरांजली वाहिली. तसेच केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनीही आदरांजली वाहिली. जगातील सर्वात उंच पुतळा असलेल्या 'स्टॅच्यू ऑफ युनिटी'चे शिल्पकार राम वंजी सुतार यांचे वृद्धापकाळाने नोएडा येथील निवासस्थानी वयाच्या १०१ व्या वर्षी निधन झाले होते. दुपारी नोएडा येथील वैकुंठ भूमीत संपूर्ण शासकीय इतमामात दिवंगत सुतार यांच्या पार्थिवावर अंतिम संस्कार करण्यात आले. महाराष्ट्र शासनाच्या वतीने यावेळी पणन मंत्री जयकुमार रावल यांनी आदरांजली वाहिली. रावल म्हणाले, जागतिक कीर्तीचे महान शिल्पकार पद्मविभूषण राम सुतार यांनी स्टॅच्यू ऑफ युनिटीसह अनेक ऐतिहासिक शिल्पांच्या माध्यमातून भारताची ओळख जागतिक पातळीवर नेली. त्यांच्या निधनाने कला क्षेत्राची मोठी हानी झाली आहे. हुबेहूब आणि जिवंतपणा हे त्यांच्या कलेचे वैशिष्ट्य होते. त्यांची शिल्पे ही त्यांच्या महान कार्याची नेहमी साक्ष देतील.यावेळी केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले म्हणाले महाराष्ट्राचे सुपुत्र राम सुतार यांचे शिल्पकला क्षेत्रात मोठे योगदान आहे. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांसह अनेक मान्यवरांचे पुतळे त्यांनी बनवले. त्यांनी दिल्लीमध्ये राहून महाराष्ट्राचा नावलौकिक वाढविला. त्यांच्या कलाकृती अजरामर राहतील. त्यांचे पुत्र त्यांचा वारसा चालवतील असेही आठवले यांनी



सांगितले. अंत्यसंस्कारापूर्वी दिवंगत सुतार यांचे पार्थिव त्यांच्या निवासस्थानी दर्शनासाठी ठेवण्यात आले होते. यावेळी महाराष्ट्र शासनाच्या निवासी आयुक्त व सचिव आर विमला, माहिती संचालक हेमराज बागुल, सहायक निवासी आयुक्त नितीन शेंडे यांनी महाराष्ट्र शासन सांस्कृतिक विभागाच्या वतीने श्रद्धांजली अर्पण केली. तसेच गौतम बुद्ध नगरच्या जिल्हाधिकारी मेधा रुपम यांनी उत्तर प्रदेश सरकारच्या वतीने श्रद्धांजली अर्पण केली. कला, सामाजिक, राजकीय क्षेत्रातील मान्यवरांसह दिवंगत सुतार यांच्या चाहत्यांनी त्यांच्या पार्थिवाचे दर्शन घेतले. यावेळी त्यांचे पुत्र अनिल सुतार यांच्यासह त्यांच्या कुटुंबातील सदस्य उपस्थित होते. गेल्याच महिन्यात सुतार यांना 'महाराष्ट्र भूषण २०२४' पुरस्कार प्रदान करण्यात आला होता. हा पुरस्कार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार आणि सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी नोएडा येथे जाउन त्यांच्या निवासस्थानी प्रदान केला होता.

## तपस्वी शिल्पकार काळाच्या पडद्याआड - मुख्यमंत्री फडणवीस


**मुंबई :** शिल्पकला क्षेत्रावर आपले आणि महाराष्ट्राचे नाव कोरणारा तपस्वी शिल्पकार काळाच्या पडद्याआड गेला आहे, अशी शोकभावना व्यक्त करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पद्मश्री, महाराष्ट्रभूषण ज्येष्ठ शिल्पकार डॉ. राम सुतार यांना निधनाबद्दल भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.दरम्यान, मुख्यमंत्री



श्री फडणवीस यांनी सुतार यांचे सुपुत्र अनिल सुतार यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून त्यांना सांत्वना दिली. मुख्यमंत्री शोकसंदेशात म्हणतात, रामभाउंच्या निधनाने जागतिक कीर्तीचा कलाकार आपल्यातून निघून गेला. प्रमाणबद्धता आणि त्यातील जिवंतपणा हे त्यांच्या कलेचे वैशिष्ट्य होते. काही दिवसांपूर्वी त्यांना महाराष्ट्र शासनाचा 'महाराष्ट्र भूषण' पुरस्कार प्रदान करण्यासाठी आम्ही त्यांच्या नवी दिल्लीतील निवासस्थानी गेलो होतो, पुरस्कार स्वीकारताना त्यांनी 'महाराष्ट्र माझा' या गीताच्या ओळी उच्चारल्या तेव्हा भारावून गेलो होतो. अनेक शिल्पांना त्यांनी आकार दिला. स्टॅच्यु ऑफ यूनिटीमधील सरदार वल्लभभाई पटेल यांचा पुतळा किंवा अंदमानमधील वीर सावरकर यांचा पुतळा. शंभराव्या वर्षी सुद्धा ते इंदू मिल येथील भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाच्या कामात गुंतले होते. त्यांनी तयार केलेले अनेक पुतळे संसद भवन परिसरात उभे आहेत. आपले आराध्यदैवत छत्रपती शिवाजी महाराज, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा ज्योतिबा आणि सावित्रीबाई फुले, आपले संत अशा मोठ्या मांदियाळीच्या शिल्पांना आकार देण्याचे काम त्यांनी केले. या शिल्पांच्या माध्यमातून त्यांची कला शतकानुशतके आपल्या स्मरणात राहील आणि प्रत्येक शिल्प पाहताना त्यांचेच स्मरण होईल, त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. आम्ही त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहोत, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी म्हटले आहे.

## प्रतिभावान शिल्पकार गमावला- अजित पवार

**मुंबई :** ज्येष्ठ शिल्पकार राम सुतार यांच्या निधनामुळे शिल्पकलेच्या क्षेत्रातील एका सुवर्णयुगाचा अंत झाला असून या क्षेत्रातील भीष्माचार्य काळाच्या पडद्याआड गेला आहे, अशा शब्दात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपल्या शोकभावना व्यक्तकेल्या आहेत.उपमुख्यमंत्री अजित पवार आपल्या शोकसंदेशात म्हणतात की,राम सुतार यांनी जगाच्या कानाकोप-यात शेकडो शिल्प साकारली. त्यांचे प्रत्येक शिल्प



अप्रतिम सौंदर्याचा अद्भुत नमुना आहे. छत्रपती शिवाजी महाराज,महात्मा गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर,सरदार वल्लभभाई पटेल या महामानवांच्या शिल्पातून त्यांनी देशाचा इतिहास जिवंत केला.या महामानवांचे कार्य, विचार सर्वांपर्यंत पोहोचवले.गेल्याच महिन्यात त्यांची तब्येत बरी नसल्यामुळे मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत नोएडा येथील त्यांच्या निवासस्थानी जाउन राज्य शासनाच्या वतीने त्यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कार सन्मानाने प्रदान करण्यात आला होता.आणि अभिजात भाषा दिनाचे औचित्य साधून राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षातर्फे त्यांच्या कार्याची दखल घेउन त्यांच्या शंभराव्या वाढदिवसानिमित्त विशेष सत्कार करण्यात आला होता.त्यावेळी त्यांच्याशी मनमोकळा संवाद साधला होता. राम सुतार यांनी महाराष्ट्राच्या धुळे जिल्ह्यातील ग्रामीण भागातून येउन दिल्लीत आपलं अढळ स्थान निर्माण केलं. ते प्रत्येकाशी आत्मीयतेने, आपुलकीने बोलत.साधेपणा आणि नम्रपणा हा त्यांचा स्थायीभाव होता. देशभरातील अनेक मूर्तिकारांना घडवण्यात त्यांचे मोलाचे योगदान होते.दगडातून जिवंत भावना साकारणारा जादूगार आज शांत झाला असला तरी त्यांनी घडवलेली शिल्पे युगानुयुगे त्यांची आठवण करून देत राहतील. राम सुतार यांचे निधनाने भारतीय स्मारक शिल्पांना जागतिक पातळीवर ओळख मिळवून देणारा उत्तुंग प्रतिभेचा शिल्पकार आपण गमावला आहे.त्यांच्या कुटूंबियांना हे दुःख सहन करण्याची शक्ती मिळो, अशी प्रार्थना करत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राम सुतार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली आहे.

## शिल्पकलेचा 'कोहिनूर' काळाच्या पडद्याआड -एकनाथ शिंदे

**मुंबई :** आंतरराष्ट्रीय कीर्तीचे ज्येष्ठ शिल्पकार महाराष्ट्र भूषण राम सुतार यांच्या निधनाने शिल्पकलेच्या क्षेत्रातील एक महान पर्व आणि 'शिल्पकलेचा कोहिनूर' काळाच्या पडद्याआड



गेला आहे, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आपल्या शोक भावना व्यक्तकेल्या. शिल्पकलेतील उत्तुंग व्यक्तिमत्व असलेल्या राम सुतार यांनी आपल्या कलेच्या जोरावर भारतीय संस्कृती आणि महापुरुषांचे विचार जगभर पोहोचवले. त्यांच्या प्रदीर्घ योगदानासाठी त्यांना केंद्र सरकारतर्फे 'पद्मभूषण' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. राम सुतार यांनी महाराष्ट्राच्या मातीतून आपल्या कलेला सुरुवात केली आणि जागतिक स्तरावर स्थान मिळवले. महाराष्ट्र राज्याचा सर्वोच्च नागरी सन्मान 'महाराष्ट्र भूषण' पुरस्कार त्यांना प्रदान करण्यासाठी काही महिन्यांपूर्वीच आम्ही त्यांच्या दिल्ली येथील निवासस्थानी गेलो होतो. त्यावेळी झालेली त्यांची भेट शेवटची ठरली, असे उपमुख्यमंत्र्यांनी शोक संदेशात म्हटले आहे.नर्मदा तीरावरील सरदार वल्लभभाई पटेल यांचा 'स्टॅच्यू ऑफ युनिटी', संसदेतील महात्मा गांधींचा पुतळा अशा अनेक अजरामर कलाकृतींच्या माध्यमातून ते सदैव आपल्यात जिवंत राहतील. वयाच्या १०१ व्या वर्षापर्यंत कलेची साधना करणा-या श्री. सुतार यांनी नवीन पिढीतील हजारो कलाकारांना मार्गदर्शन केले. त्यांच्या जाण्याने शिल्पकलेचे विद्यापीठच हरपल्याची भावना उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी व्यक्त केली आहे.

# लोकसभेत विरोधकांना फाडल्या जी राम जी विधेयकाच्या प्रती

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा (मनरेगा) यांच्या जागी आणण्यात आलेले जी राम जी विधेयक लोकसभेत आज विरोधकांच्या तीव्र गोंधळात मंजूर झाले. विधेयक स्थायी समितीकडे पाठवावे, या मागणीसाठी विरोधी पक्षांनी सभागृहाच्या वेलमध्ये उतरून जोरदार आंदोलन केले, तर काही खासदारांनी विधेयकाच्या प्रती फाडल्याने वातावरण तापले.



केंद्रीय कृषिमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी विधेयकाचे समर्थन करताना सांगितले की, नव्या कायद्यामुळे मनरेगामधील भ्रष्टाचाराला आळा बसेल. सरकारने सर्व संबंधित घटकांशी चर्चा करूनच हे विधेयक आणले असून, एनडीए सरकार कामावर लक्ष केंद्रित करत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. विरोधक मात्र या विधेयकाला गरीबविरोधी ठरवत आहेत. विरोधकांचा आक्षेप असा आहे की, या कायद्यातून महात्मा गांधींचे नाव काढून टाकणे म्हणजे राष्ट्रपित्याचा अपमान आहे. तसेच या विधेयकामुळे राज्यांवर आर्थिक भार वाढेल, असा आरोप कॉंग्रेस नेत्या प्रियंका वाड्रा, डीएमकेचे टी. आर. बालू आणि समाजवादी पक्षाचे धर्मेंद्र यादव यांनी केला.गोंधळादरम्यान लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी सदस्यांना शांततेचे आवाहन करत सांगितले की, या विधेयकावर सविस्तर चर्चा झाली असून आता ते राज्यसभेत मांडले जाईल. लोकांनी तुम्हाला येथे कागद फाडण्यासाठी पाठवलेले नाही. संपूर्ण देश तुम्हाला पाहत आहे, असे कठोर शब्दांत त्यांनी सुनावले.सभागृहाचे कामकाज तहकूब झाल्यानंतर प्रियंका गांधी वाड्रा यांनी सांगितले की, या विधेयकामुळे ग्रामीण रोजगार हमी योजना संपवली जाईल. मनरेगा ही सर्वात गरीब लोकांसाठी आधार आहे. राज्यांकडे पुरेसा निधी नसताना हा भार टाकला जात आहे, असा आरोप त्यांनी केला. दरम्यान, केंद्रीय मंत्री एस. पी. सिंह बघेल आणि चिराग पासवान यांनी सभागृहात कागद फाडण्याच्या प्रकाराचा तीव्र निषेध केला. लोकशाहीत अशा कृतींना स्थान नसल्याचे सांगत, विरोध करण्याचा अधिकार आहे; मात्र संसदीय शिस्त पाळली पाहिजे, असे त्यांनी स्पष्ट केले.

# लोकसभेत गदारोळात व्हीबी-जी रामजी विधेयक मंजूर

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** लोकसभेने गुरुवारी गदारोळात 'विकसित भारत - रोजगार आणि उपजीविकेची हमी अभियान (ग्रामीण)' किंवा व्हीबी-जी रामजी विधेयक, २०२५ आवाजी मतदानाने मंजूर केले. ग्रामीण भागात रोजगार आणि उत्पादन सुरक्षितता सुनिश्चित करणे हे त्याचे उद्दिष्ट आहे. विधेयक मंजूर झाल्यानंतर, लोकसभा दिवसभरासाठी तहकूब करण्यात आली.

हे विधेयक विद्यमान महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा (मनरेगा), २००५ ची जागा घेण्यासाठी आणण्यात आले आहे. हा नवीन प्रस्तावित ग्रामीण रोजगार कायदा गावांमध्ये प्रत्येक कुटुंबाला १२५ दिवसांचा रोजगार प्रदान करेल. तो विकासाभिमुख कामावर भर देतो आणि केंद्र आणि राज्यांच्या सहभागाची तरतूद करतो. केंद्र सरकार खर्चाच्या ६० टक्के योगदान देईल, तर राज्ये ४० टक्के योगदान देतील. डोंगराळ राज्यांमध्ये, हे प्रमाण ९०:१० असेल. काल रात्री सुमारे १:३० वाजेपर्यंत लोकसभेत या विधेयकावर




चर्चा सुरू होती आणि केंद्रीय मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी आज चर्चेला उत्तर दिले. तथापि, विरोधी सदस्यांनी सभागृहाच्या मध्यभागी घोषणाबाजी सुरूच ठेवली.

चर्चेला उत्तर देताना, केंद्रीय मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी मनरेगाच्या उणीवा दाखवल्या आणि सांगितले की, राज्यांनी कामगारांवर जास्त आणि साहित्य खरेदीवर कमी खर्च केला आहे. त्यांनी सांगितले की नवीन योजनेअंतर्गत मोठ्या प्रमाणात निधीची तरतूद करण्यात आली आहे. 'या मोठ्या वाटपाद्वारे, आम्ही केवळ चांगल्या रोजगाराच्या संधी निर्माण करू आणि अधिक नोक-या निर्माण करू असे नाही तर विकसित भारत माडेलमध्ये गावांच्या विकासासाठी या संसाधनांचा प्रभावीपणे वापर केला जाईल याची खात्री देखील करू,' असे ते म्हणाले.त्यांनी सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कल्पना केलेल्या विकसित भारत माडेलमध्ये, गावे स्वावलंबी, रोजगार समृद्ध, दारिद्र्यमुक्त आणि आधुनिक सुविधांनी सुसज्ज असतील. ही गावे दर्जेदार शिक्षण, कौशल्य विकास केंद्रे, डिजिटल वर्गखोल्या, ग्रंथालये, प्रशिक्षण केंद्रे, संगणक प्रयोगशाळा आणि इतर प्रयोगशाळा प्रदान करतील. यामुळे एकही मूल शिक्षणापासून मागे राहणार नाही याची खात्री होईल. या नावाभोवतीच्या वादाबद्दल चौहान म्हणाले की, गावांच्या विकासाच्या योजना अनेक वर्षांपासून सुरू आहेत. नरेगापूर्वीही, सलग सरकारांनी रोजगार हमी योजना सुरू केल्या आहेत. २००९ च्या निवडणुकीपूर्वी महात्मा गांधींचे नाव नरेगा कार्यक्रमात जोडले गेले. प्रियंका गांधींच्या आरोपांना उत्तर देताना, चौहान यांनी नेहरू आणि गांधींची नावे असलेल्या योजनांची यादी केली. कॉंग्रेस पक्षावर गांधींच्या आदर्शांचा अनादर केल्याचा आरोप चौहान यांनी केला. कॉंग्रेस पक्षाने भारताची फाळणी स्वीकारली आणि गांधींनी पक्ष विसर्जित करण्याचे आवाहन नाकारले होते असे चौहान म्हणाले.

# प्रज्ञा सातव, दिलीप माने यांचा समर्थकांसह भाजपात प्रवेश



**मुंबई/प्रतिनिधी :** हिंगोली जिल्ह्यातील कॉंग्रेसच्या माजी आमदार प्रज्ञा सातव आणि सोलापूर दक्षिणचे कॉंग्रेसचे माजी आमदार दिलीप माने यांनी आपल्या शेकडो समर्थकांसह गुरुवारी भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला. भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सर्वांचे पक्षात स्वागत केले. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पक्षप्रवेश कार्यक्रमावेळी आ. सचिन कल्याणशेट्टी, ज्येष्ठ नेते कृपाशंकर सिंह, मुख्यालय प्रभारी रविंद्र अनासपुरे, भाजपा माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन आदी उपस्थित होते. यावेळी श्री. चव्हाण म्हणाले की, प्रज्ञा सातव आणि दिलीप माने यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात देशात आणि महाराष्ट्रात चालू असलेल्या विकासाला हातभार लावण्याच्या हेतूने भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश करण्याचा निर्णय घेतला आहे. या दोघांनी ज्या विश्वासाने भारतीय जनता पार्टीमध्ये प्रवेश केला आहे, त्या विश्वासाची बूज राखली जाईल. समस्यांची जाण असलेले उमदे व्यक्तिमत्व स्व. राजीव सातव आज आपल्यात नाहीत याबद्दल दु:ख व्यक्त करत राजीव सातव यांचा समाजकार्याचा वारसा त्यांच्या पत्नी प्रज्ञा सातव पुढे नेत आहेत याचा सार्थ अभिमान असल्याचे श्री. चव्हाण म्हणाले. यावेळी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, राजकारणातील अतिशय सज्जन व्यक्तिमत्व असलेल्या स्व.राजीव सातव यांच्यासोबत वीस हून अधिक वर्षे प्रज्ञा यांनी समाजकार्य केले आहे. विकसीत हिंगोली साठी त्या भाजपामध्ये प्रवेश करत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे देशाच्या सर्वांगीण विकासासाठी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हिंगोली विकासासाठी सदैव प्रयत्नशील असतात. स्व.राजीव सातव यांच्या स्वप्नपूर्तीसाठी भाजपा तुमच्या पाठीशी सदैव खंबीरपणे उभा राहील असा विश्वास श्री. बावनकुळे यांनी दिला.

यावेळी प्रज्ञा सातव म्हणाल्या की, स्व.राजीव सातव यांनी हिंगोली जिल्ह्याच्या विकासासाठी अथक प्रयत्न केले. राजीव यांच्या विकासाचे अपूर्ण राहीलेले स्वप्न पूर्ण करण्यासाठी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या विकासाच्या कार्यात साथ देण्यासाठी मी भाजपा मध्ये प्रवेश करत आहे. यावेळी दिलीप माने म्हणाले की, पंतप्रदान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली होत असलेला विकास आणि भाजपाची विचारसरणी यांनी प्रेरित होउन माझ्या समर्थकांसह भाजपामध्ये प्रवेश करत आहे. निष्ठेने काम करून भाजपाची विचारधारा तळागाळात पोहोचवण्याचा प्रयत्न करेन असेही ते म्हणाले.श्रीमती प्रज्ञा सातव यांच्यासह पक्षप्रवेश केलेल्यांमध्ये हिंगोली येथील कॉंग्रेसचे जिल्हा परिषद माजी सदस्य शिवाजीराव मस्के, जिल्हा प्रवक्ता तथा उपाध्यक्ष विलास गोरे, कळमनुरीचे तालुकाध्यक्ष भागवत चव्हाण, माजी जिल्हा परिषद सदस्य तथा औंढा नागनाथ चे तालुकाध्यक्ष पंकज जाधव, खेर्डा गावचे सरपंच पंजाबराव गडदे, कॉंग्रेस चे जिल्हा उपाध्यक्ष नामदेवराव चव्हाण आदींचा समावेश आहे.श्री. दिलीप माने यांच्याबरोबर भाजपात पक्ष प्रवेश केलेल्यांमध्ये सोलापूरचे माजी नगरसेवक जयकुमार माने, नागेश ताकमोगे, दादाराव ताकमोगे, बाजार समितीचे संचालक प्रथमेश पाटील, माने बँकेचे संचालक आनंद देटे, कॉंग्रेसचे युवा अध्यक्ष पृथ्वीराज माने आदींचा समावेश आहे.

## सलग तिस-या वर्षी डोपिंग उल्लंघनांमध्ये भारताचा जगात पहिला क्रमांक

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** जागतिक उत्तेजक द्रव्याविरोधी संस्थेच्या (वाडा) ताज्या अहवालानुसार, २०२४ मध्ये डोपिंगच्या प्रकरणांमध्ये भारताने सलग तिस-यांदा जगात पहिला क्रमांक पटकावला आहे. अहवालात म्हटले आहे की, २०२४ मध्ये भारतीय



खेळाडूंचे २६० नमुने डोपिंग चाचणीत पाझिटिव्ह आले, जी कोणत्याही देशाच्या तुलनेत सर्वाधिक संख्या आहे. हा अहवाल अशा वेळी आला आहे, जेव्हा भारत २०३० च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्याची तयारी करत आहे आणि भारताने २०३६ च्या ऑलिम्पिकचे यजमानपद मिळवण्यासाठी बोलीही लावली आहे. या जुलैमध्ये, जेव्हा भारतीय शिष्टमंडळाने ल?झेनला भेट दिली, तेव्हा आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितीने (आयओसी) भारतातील डोपिंगच्या वाढत्या समस्येबद्दल चिंता व्यक्त केली होती.राष्ट्रीय उत्तेजक द्रव्यविरोधी संस्थेने (नाडा) २०२४ मध्ये एकूण ७,११३ डोपिंग चाचण्या केल्या. यामध्ये ६,५७६ मूत्र आणि ५३७ रक्ताच्या नमुन्यांचा समावेश होता. या चाचण्यांपैकी २६० प्रकरणे पॉझिटिव्ह आढळली, म्हणजेच डोपिंगचा दर ३.६ टक्के होता.नाडाचे म्हणणे आहे की, डोपिंगच्या प्रकरणांमध्ये झालेली वाढ ही खेळाडूंमध्ये डोपिंग वाढल्यामुळे नाही, तर अधिक कठोर तपास आणि चांगल्या चाचणी प्रणालीमुळे झाली आहे. नाडानुसार, हे आकडे पहिल्या दृष्टीक्षेपात चिंताजनक वाटू शकतात, परंतु प्रत्यक्षात ते भारताच्या मजबूत डोपिंगविरोधी प्रयत्नांचे आणि वाढलेल्या चाचण्यांचे परिणाम आहेत.नाडाने अहवाल दिला की, २०२३ मध्ये एकूण ५,६०६ नमुन्यांची चाचणी करण्यात आली होती, त्यापैकी २१३ प्रकरणे पॉझिटिव्ह आढळली होती.

## भारताने आपल्या धोरणासोबत आर्थिक डीएनएही बदलले आहेत - पंतप्रधान

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ओमान दौ-याचा आज दुसरा दिवस आहे. आज पंतप्रधान मोदी यांच्या उपस्थितीत भारत आणि ओमान यांच्यात व्यापक आर्थिक भागीदारी करारावर स्वाक्ष-या होण्याची शक्यता आहे. याबाबत बोलताना पंतप्रधान मोदी म्हणाले की, या करारामुळे २१व्या शतकात भारत-ओमान भागीदारीत नव्या विश्वासाचा आणि नव्या उत्साहाचा संचार होईल.



भारत-ओमान बिझनेस फोरमच्या कार्यक्रमात भाषण करताना पंतप्रधान मोदी म्हणाले, हा मंच भारत-ओमान भागीदारीला नवी दिशा आणि नवी गती देईल, तसेच दोन्ही देशांमधील संबंध नव्या उंचीवर पोहोचतील. त्यांनी सांगितले की, सभ्यतेच्या प्रारंभापासूनच आमचे पूर्वज समुद्रमार्गे एकमेकांशी व्यापार करत आले आहेत. मांडवी आणि मस्कट यांच्यातील अरबी समुद्र एक मजबूत दुवा ठरला. या दुव्याने आमचे संबंध दृढ झाले आणि संस्कृती व अर्थव्यवस्थेला बळ मिळाले. आज आपण नक्कीच म्हणू शकतो की समुद्राच्या लाटा बदलतात, ऋतू बदलतात; मात्र भारत आणि ओमान यांची मैत्री प्रत्येक ऋतूत मजबूतच राहिली आहे.पंतप्रधानांनी सांगितले की, आमचे नाते विश्वासाच्या पायावर उभे आहे आणि काळानुसार ते अधिकच दृढ होत गेले आहे. भारत आणि ओमान यांचे कूटनीतिक संबंधांना ७० वर्षे पूर्ण झाली आहेत. आज आपण असा ऐतिहासिक निर्णय घेत आहोत, ज्याचा प्रतिध्वनी पुढील अनेक दशकांपर्यंत ऐकू येईल.

## दिव्यांग व्यक्तींच्या विवाहास शासनाचे प्रोत्साहन-तुकाराम मुंढे

**मुंबई/प्रतिनिधी :** दिव्यांग अव्यंग विवाह प्रोत्साहन योजनेत महत्त्वपूर्ण सुधारणा करण्यात आल्या असून, अनुदानाच्या रकमेत वाढ करून योजना अधिक प्रभावी करण्यात आली असल्याचे दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांनी सांगितले. समाजात दिव्यांग व्यक्तींच्या विवाहाबाबत असलेले सामाजिक व सांस्कृतिक पूर्वग्रह त्यांच्या आयुष्यावर दीर्घकालीन परिणाम करणारे ठरतात. दिव्यांगत्वाकडे अनेकदा असमर्थता किंवा अधिकारहीनता म्हणून पाहिले जाते. या पार्श्वभूमीवर हा दृष्टिकोन बदलणे आवश्यक असल्याचे अधोरेखित करत, दिव्यांग व्यक्तींच्या विवाहाला प्रोत्साहन देण्यासाठी हा महत्त्वाचा निर्णय शासनाने घेतला आहे. सचिव मुंढे म्हणाले, दिव्यांग व्यक्तीचा विवाह ही पालकांच्या दृष्टीने जिकिरीची जबाबदारी बनते. अनेकदा विवाह टाळला जातो किंवा विजोड जोडीदार दिला जातो. विशेषतः दिव्यांग महिलांना महिला आणि दिव्यांग अशा दुहेरी भेदभावाला सामोरे जावे लागते. या पार्श्वभूमीवर शासन, सामाजिक व स्वयंसेवी संस्था दिव्यांग व्यक्तींना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी प्रयत्नशील आहेत. दिव्यांग-अव्यंग विवाह प्रोत्साहन अनुदान योजनेत वाढ करण्यासह दिव्यांग-दिव्यांग विवाह हा नवा घटक समाविष्ट करण्यात आला आहे. नव्या सुधारित योजनेनुसार दिव्यांग-अव्यंग विवाहासाठी रुपये १,५०,००० तर दिव्यांग-दिव्यांग विवाहासाठी रुपये २,५०,००० इतके अनुदान मिळणार आहे. ही रक्कम पती-पत्नीच्या संयुक्त बँक खात्यात थेट लाभहस्तांतरण प्रणालीद्वारे जमा केली जाणार असून, त्यापैकी ५० टक्के रक्कम दाम्पत्याने पाच वर्षांकरिता मुदतठेवीत ठेवणे अनिवार्य असल्याचे सचिव मुंढे यांनी सांगितले.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## लोकायुक्त कायदा

राज्यात नवीन लोकायुक्त कायदा लागू होण्याचा मार्ग अखेर दोन वर्षांनी मोकळा झाला असून, त्यामुळे सर्वसामान्य जनतेच्या दृष्टीने न्याय मिळवण्याची आणखी एक वाट खुली होणे अपेक्षित आहे. विधानसभेने नागपूर हिवाळी अधिवेशनात या संदर्भातील सुधारणा विधेयक मंजूर केले. सामाजिक कार्यकर्ते अण्णा हजारे यांनी या कायद्याच्या अंमलबजावणीसाठी दि. ३१ जानेवारी २०२६ पासून उपोषण सुरू करण्याचा इशारा दिला होता. आता राष्ट्रपतींनी या विधेयकास मंजुरी दिली. त्यात तीन सुधारणा करण्याची सूचना केंद्र सरकारने केली होती. या सुधारणांबाबतचे विधेयक विधानसभेत मंजूर झाले. विधान परिषदेच्या मंजुरीनंतर नवीन लोकायुक्त कायदा राज्यात अमलात येणार आहे. केंद्र सरकार स्तरावर लोकपाल असतो, तर राज्यांमध्ये लोकायुक्त ही संस्था असते. महाराष्ट्रात १९७१ पासून लोकायुक्त आहेच. त्यावेळी प्रशासकीय सुधारणा आयोगाच्या शिफारसींवर आधारित असा हा कायदा आणला होता. कर्नाटकमध्ये १९८४ पासून लोकायुक्त आहे. ओडिशा, राजस्थान, बिहार, उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, आंध्र, हिमाचल प्रदेश, आसाम, गुजरात आदी अनेक राज्यांत भ्रष्टाचार आरोपांची चौकशी करण्यासाठी लोकायुक्त कायदा अस्तित्वात आहे. दोन वर्षांपूर्वी हे विधेयक प्रथम सादर करताना केंद्राच्या लोकपाल कायद्याच्या धर्तीवर लोकायुक्त कायदा मंजूर करणारे महाराष्ट्र देशातील पहिले राज्य असल्याचा उल्लेख करण्यात आला होता.या विधेयकात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याचा समावेश केल्याने सरकारच्या कारभारात पारदर्शकता येईल, असे सांगण्यात आले होते. सुधारित कायद्यात मुख्यमंत्री, कॅबिनेट मंत्री, राज्यमंत्री, आमदार, भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी, पोलीस आणि वनसेवेतील अधिकारी यांना लोकायुक्तांच्या चौकशीच्या कक्षात आणण्यात आले. अण्णा हजारे यांच्या पाठपुराव्यानंतर राज्य सरकारने नवीन लोकायुक्त कायद्याबाबतचे विधेयक विधिमंडळात सादर केले. ते विधानसभेत दि. २८ डिसेंबर २०२२ आणि विधान परिषदेत दि. १५ डिसेंबर २०२३ रोजी मंजूर झाले. त्यानंतर ते राष्ट्रपतींकडे मंजुरीसाठी पाठवले होते.केंद्रीय कायद्यानुसार अस्तित्वात आलेल्या प्राधिकरणांवरील अधिकारी लोकायुक्त कायद्याच्या कक्षेत येणार की नाहीत, याबद्दल संदिग्धता होती; मात्र केंद्रीय कायद्यातील तरतुदीसार अस्तित्वात आलेल्या प्राधिकरणावर राज्य सरकारने अधिकारी नेमले असल्यास, ते राज्याच्या लोकायुक्तांच्या कार्यकक्षेत येतील. रेरा कायदा हा मुळात केंद्र सरकारचा असला, तरी त्यावर नियुक्त केलेले अधिकारीही राज्याच्या लोकायुक्त कायद्याच्या कक्षेत येतील. थोडक्यात, नवा कायदा अधिक व्यापक असून, तो कोणालाही मोकळे सोडणारा नाही. केंद्र सरकारने भारतीय दंड संहिता आणि फौजदारी दंड संहिता प्रक्रिया या जुन्या कायद्यांच्या बदल्यात नवीन कायदे अमलात आणल्याने त्यांची नवीन नावे लोकायुक्त कायद्यात समाविष्ट केली आहेत. २०१० मध्ये उघडकीस आलेल्या आर्थिक महाघोटाळ्यांच्या पार्श्वभूमीवर भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी केंद्र सरकारने सशक्त असे लोकपाल विधेयक संसदेत मंजूर करून घ्यावे, या मागणीसाठी 'टीम अण्णा'ने दिल्लीत आंदोलन छेडले. अण्णांच्या उपोषणानंतर केंद्राने विधेयकात काही सुधारणा केल्या, तरी त्या व्यापक व कडक असाव्यात, ही मागणी रेटून धरण्यासाठी त्यांनी दि. १६ ऑगस्ट २०११ रोजी दिल्लीच्या जंतरमंतर मैदानावर दीर्घ उपोषणाला सुरुवात केली. पुनश्च हजारोंच्या संख्येने देशभरातील सामाजिक कार्यकर्ते व मध्यमवर्गीय तरुण या आंदोलनात सहभागी झाले. अखेर केंद्र सरकार नमले.तत्कालीन पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी जनरेट्याची दखल घेऊन संसदेचा 'सेन्स ऑफ द हाऊस' ठराव 'टीम अण्णा'कडे पाठवला आणि मग उपोषण समाप्त झाले. कायदेतज्ज्ञ अभिषेक मनू सिंघवी यांच्या अध्यक्षतेखालील स्थायी समितीने लोकपाल विधेयकाचा सुधारित मसुदा तयार केला. या मसुद्यात सर्वांनी मिळून १८७ सुधारणा सुचवल्या होत्या. त्यापासून प्रेरणा घेत राज्य सरकारने सुधारणा केल्या. आता लोकायुक्त या संस्थेत अध्यक्षपदासाठी उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश किंवा सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश असलेली किंवा राहिलेली व्यक्ती नियुक्त होईल. कायदा, वित्त, बँकिंग अशा क्षेत्रांतील अनुभवी व्यक्ती न्यायिक सदस्यांव्यतिरिक्त अन्य सदस्य म्हणून नेमणुकीस पात्र असतील. त्यामुळे प्रत्येक प्रकरणाचा खोलात जाऊन अभ्यास करणे शक्य होईल. कोणत्याही लोकसेवकाविरुद्ध तक्रार प्राप्त झाल्यावर प्रकरणाची कार्यवाही करावी की ते बंद करावे, हे अर्थातच लोकायुक्त ठरवतील. संबंधित लोकसेवकाला त्याचे म्हणणे ९० दिवसांत लोकायुक्तांकडे पाठवावे लागेल. तक्रारीत तथ्य आढळल्यास संबंधित सेवा नियमानुसार लोकसेवकाविरुद्ध विभागीय चौकशी किंवा इतर कोणतीही उचित कारवाई करण्याची शिफारस केली जाईल. थोडक्यात, लोकायुक्ताचा कायदा प्रभावी आहे. कोणालाही व्यक्तिशः समन्स पाठवणे आणि उपस्थित राहण्यास भाग पाडणे, कोणत्याही दस्तावेजाचा शोध घेण्याचे फर्मान देणे व शपथपत्रावर साक्षी पुरावा घेणे, याचे अधिकार लोकायुक्ताला असतील. तसेच लोकायुक्तासमोरील कोणतीही कार्यवाही न्यायिक असल्याचे मानले जाणार आहे, हे महत्त्वाचे. देशातील भ्रष्टाचार कमी करण्यासाठी केंद्र व राज्य सरकार अनेक उपाययोजना करत असले, तरीदेखील भ्रष्टाचाराचे प्रमाण कमी झालेले नाही.महाराष्ट्रात ते वाढल्याचे केंद्र सरकारच्या 'एनसीआरबी' अहवालातून समोर आले आहे. उत्तर प्रदेश, हरियाणा व आसामचा क्रमांक यात लागतो. केवळ शहरांचा विचार केल्यास लाचखोरीत कोईमतूर अग्रस्थानी असून, त्यानंतर चेन्नई, पुणे, नागपूर आणि मुंबईचा क्रमांक लागतो. महाराष्ट्रात महसूल आणि पोलीस खात्यात गैरव्यवहारांचे प्रमाण प्रचंड आहे. नवीन लोकायुक्त कायद्यामुळे कायद्याचा धाक निर्माण होईल, हे खरे; परंतु वेगळ्या स्वरूपात राज्यात हा कायदा कित्येक वर्षे लागू असूनही फरक पडला नव्हता, हे लक्षात घेतले पाहिजे.लोकायुक्तांचे स्वातंत्र्य आणि अधिकार हा चर्चेचा मुद्दा ठरला आहे, त्याचा अभाव असल्यानेच हे पद प्रभावी ठरलेले नाही. म्हणूनच लोकायुक्तांना कामकाजाचे संपूर्ण स्वातंत्र्य मिळणे आवश्यक असून, या पदावर त्यांची नेमणूक होताना राजकीय हस्तक्षेप होता कामा नये. नव्या सुधारणांसह हा कायदा लागू होण्याचा मार्ग मोकळा झाल्याने व्यवस्थेतील त्रुटी कमी होतील आणि सर्वसामान्य माणसाचा विश्वास वाढीस लागेल, ही आशा!

# रुपयाची घसरण; अर्थव्यवस्थेचा कोंडला श्वास

अलीकडील काळात रुपयावरील वाढत्या दबावामागे अनेक कारणे आहेत, ज्यात डॉलरची मजबुती, जागतिक अनिश्चितता वाढणे आणि मजबूत परदेशी मागणी यांचा समावेश आहे. यापूर्वी अशी लक्षणीय घसरण २०२२ मध्ये दिसून आली होती. गेल्या काही दिवसांपासून बाजारातील अनिश्चितता वाढत आहे. डॉलर मजबूत होत आहे. परिणामी, गुंतवणूकदार सुरक्षित गुंतवणूक पर्याय शोधत असून डॉलरकडे वळत आहेत. याव्यतिरिक्त परदेशी गुंतवणूकदारांनी भारतीय बाजारपेठेतून पैसे काढण्याचा वेग वाढवला आहे. परिणामी, रुपया कमकुवत होत असून डॉलरची मागणी वाढत आहे. रुपया ९० च्या पुढे जाणे हे देखील बाजारातील बदल दर्शवते. अमेरिकन धोरणांचाही रुपयावर परिणाम होत आहे. अमेरिकेने भारतावर ५० टक्के कर लादला आहे. शिवाय, भारत आणि अमेरिका यांच्यातील व्यापार करारात होणारा विलंब, अमेरिकेची आर्थिक धोरणे आणि अमेरिकन 'फेडरल रिझर्व्ह'च्या व्याजदराबद्दल वाढत्या अटकळींमुळे रुपयावर दबाव वाढत आहे. रुपयाच्या कमकुवतपणामुळे केवळ आयात किमती वाढत नाहीत, तर पेट्रोल आणि डिझेल, यंत्रसामग्री, मोबाईल फोन, इलेक्ट्रॉनिक्स आणि अगदी परदेशी प्रवासाच्या किमतीही वाढतात. रुपया ऐतिहासिक नीचांकी पातळीवर पोहोचला असताना दबाव कमी करण्यासाठी रिझर्व्ह बँक डॉलर्सची विक्री करू शकते. तथापि, रिझर्व्ह बँकेच्या हस्तक्षेपाचा मर्यादित परिणाम होईल, कारण सध्या रुपयावर मोठा दबाव आहे. बाजार अजूनही रिझर्व्ह बँकेच्या पुढील पावलांवर बारकाईने लक्ष ठेवून आहे. अमेरिकेसोबतच्या एका मोठ्या व्यापार कराराला अंतिम स्वरूप देण्यास झालेल्या विलंबामुळे भारतीय रुपयात मोठी घसरण झाली आहे.

'ब्लूमबर्ग'च्या अहवालानुसार गेल्या काही आठवड्यांमध्ये रुपया वाचवण्यासाठी रिझर्व्ह बँकेने फारसा हस्तक्षेप केलेला नाही आणि परदेशी गुंतवणूकदार शेअर बाजारातून पैसे काढत आहेत. या दोन्ही घटकांमुळे रुपयावरही दबाव येत आहे. आयात महाग होत असल्याने सामान्य माणसाच्या खिशावर महागाईचा भार आणखी वाढू शकतो. मोठ्या कंपन्या, आयातदार आणि परदेशी गुंतवणूकदार मोठ्या प्रमाणात डॉलर खरेदी करत आहेत. म्हणूनच रुपया सतत कमकुवत होत आहे. या व्यतिरिक्त, कच्च्या तेलाच्या किमती गगनाला भिडत आहेत. त्यामुळे गुंतवणूकदारांचा मूड आणखी बिघडत आहे. याचा अर्थ डॉलरची मागणी खूप जास्त आहे आणि पुरवठा कमी आहे. परिणामी, सतत घसरण होत आहे. पेट्रोल आणि डिझेलच्या किमती वाढण्याची भीतीदेखील आहे. त्याचा थेट परिणाम आपल्या खिशावर होईल. एरव्ही बाजारात डॉलर्स विकून रिझर्व्ह बँक रुपयाला घसरण्यापासून वाचवत असते; परंतु या वेळी रुपया थोडा मजबूत झाला, तेव्हा रिझर्व्ह बँकने स्वतः डॉलर्स खरेदी केले. भारताची अर्थव्यवस्था खूप मजबूत आहे. जीडीपीची वाढ ८.२ टक्के आहे. तथापि, डॉलरची मागणी वाढल्यामुळे, हे सकारात्मक पैलू झाकोळले गेले असून रुपया कमकुवत दिसत आहे. याचा अर्थ, प्रत्यक्षात परिस्थिती चांगली आहे; परंतु डॉलर्सची भूक जास्त आहे. चलनातील घसरणीचे कारण परदेशी पोर्टफोलिओ गुंतवणूकदारां(एफपीआय) कडून दररोज होणारी विक्री हे आहे. गेल्या आठ महिन्यांपासून रुपया घसरत आहे आणि आता तो एका नवीन नीचांकावर पोहोचला आहे. बराच काळ स्थिर असलेल्या रुपयाने गेल्या वर्षीच ८५-९० चा टप्पा ओलांडला आहे. अलीकडे डॉलरच्या तुलनेत रुपया २५ पैशांनी घसरून ९०.२१ च्या नवीन नीचांकावर बंद झाला. १५ ऑगस्ट १९४७ रोजी एक डॉलर एका रुपयाच्या बरोबरीचा होता असे अनेकदा ऐकायला मिळते. ही कल्पना चांगली वाटते; परंतु आर्थिक तथ्ये आणि ऐतिहासिक नोंदी वेगळेच सांगतात. रिझर्व्ह बँकेच्या आकडेवारीचा विचार केल्यास भारताच्या स्वातंत्र्याच्या वेळी एक रुपया एक डॉलरच्या बरोबरीचा होता, हा दावा खरा नाही. केंद्रीय बँकेच्या 'आरबीआय, द १९९१ प्रोजेक्ट डेटा' या दस्तावेजानुसार स्वातंत्र्याच्या वेळी, भारतीय रुपया अमेरिकन डॉलरशी नव्हे, तर ब्रिटिश पौंड स्टर्लिंगशी जोडलेला होता. रुपयाचा विनिमय दर पौंड या चलनाद्वारे निश्चित केला जात असे. त्या वेळी एक पौंड १३.३३ रुपयांच्या बरोबरीचा होता. त्या वेळी अमेरिकन डॉलरच्या तुलनेत ब्रिटिश पौंडचे मूल्य ४.०३ डॉलर होते. १९६६ मध्ये भारतीय चलनाची पहिली मोठी घसरण झाली. या काळात डॉलरच्या तुलनेत रुपया ४.७६ वरून ७.५० वर आला. हे त्या काळातील अशांत काळामुळे

**देशाच्या निर्यातभिमूख सुविधांमध्ये सुधारणा करणे आणि मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार रोखणेदेखील रुपया स्थिर करण्यास मदत करू शकते.**



झाले. चीन (१९६२) आणि पाकिस्तान (१९६५) सोबतच्या युद्धांमुळे देश समस्यांशी झुंजत होता. या युद्धांमुळे अर्थव्यवस्था बिघडली. १९६५-६६ मध्ये देशात तीव्र दुष्काळ पडून अन्नधान्य उत्पादनात घट झाली आणि महागाई गगनाला भिडली. या कठीण काळात भारताला परकीय मदतीची नितांत आवश्यकता होती. जागतिक बँक आणि इतर आंतरराष्ट्रीय संस्थांनी निर्यात वाढवण्यासाठी भारताने आपल्या चलनाचे अवमूल्यन करावे असा आदेश दिला. त्यानंतर डॉलरच्या तुलनेत रुपया ७.५० वर घसरला.

१९९१ हे वर्ष रुपयाच्या घसरणीच्या दृष्टीने देशासाठी महत्त्वाचे ठरले. आर्थिक आव्हानांना तोंड देत देशाने आर्थिक उदारीकरणाला सुरुवात केली. या वेळी रुपया २१ वरून २६ च्या आसपास घसरला. हा भारताच्या आर्थिक इतिहासातील सर्वात महत्त्वाचा टप्पा होता. देयकांच्या संतुलनाच्या संकटामुळे भारताकडे आयात (तेल, आवश्यक वस्तू) खरेदी करण्यासाठी फक्त तीन आठवड्यांचा परकीय चलन साठा होता. दुसरीकडे, आखाती युद्ध किंवा इराक-कुवेत युद्धामुळे कच्च्या तेलाच्या किमती वाढल्या. त्यामुळे भारताचे आयात बिल लक्षणीयरीत्या वाढले. यामुळे रुपया आणखी कमकुवत झाला. राजकीय अस्थिरतेने देशाला वेढले आणि गुंतवणूकदारांचा विश्वास कमी होत गेला. या संकटावर मात करण्यासाठी तत्कालीन अर्थमंत्री डॉ. मनमोहन सिंग आणि पंतप्रधान पी. व्ही. नरसिंह राव यांनी अर्थव्यवस्था उदार करण्याचा आणि निर्यात स्वस्त करण्यासाठी आणि परकीय चलन आणण्यासाठी दोन टप्प्यात रुपयाचे अवमूल्यन करण्याचा निर्णय घेतला. १९९१ नंतर देशात आघाडी सरकारांचा काळ आला. १९९१ ते २००८ दरम्यान रुपया ३९ रुपयांपर्यंत कमकुवत झाला. २००८ च्या मंदीनंतर रुपया घसरून डॉलरच्या तुलनेत ५१ रुपये झाला. तथापि, ही घसरण जागतिक घटकांमुळे होती. अमेरिकेतील लेहमन ब्रदर्स बँकेच्या पतनामुळे जागतिक मंदी आली. जोखीम टाळण्याचा प्रयत्न करणाऱ्या परदेशी गुंतवणूकदारांनी भारतासारख्या उदयोन्मुख बाजारपेठांमधून पैसे काढून घेण्यास सुरुवात केली. डॉलरची मागणी वाढल्याने रुपया आणखी कमकुवत झाला. रुपयात शेवटची मोठी घसरण २०१३ मध्ये झाली. पंतप्रधान नरेंद्र मोदी सत्तेवर येण्यापूर्वी डॉलरच्या तुलनेत रुपया ५५ वरून ६८.८० वर आला. या वर्षी, अमेरिकन 'फेडरल रिझर्व्ह'ने त्याचा प्रवाह कमी करण्याची घोषणा केली. या भीतीने गुंतवणूकदारांनी भारतातून लक्षणीय रक्कम काढून घेतली. या काळात 'मॉर्गन स्टॅनली'ने उच्च चालू खात्यातील तूट (कॅड) आणि महागाईमुळे भारताला 'नाजूक पाच' अर्थव्यवस्थांमध्ये समाविष्ट केले. गेल्या दोन ते तीन वर्षांपासून, डॉलरच्या तुलनेत रुपया ८४-८५ वर व्यवहार करत होता. २०२५ मध्ये डोनाल्ड ट्रम्प दुसऱ्यांदा अमेरिकेचे अध्यक्ष झाले आणि प्रत्युत्तरात्मक शुल्काचा खेळ सुरू झाला. अमेरिकेने जगभरातील देशांना शुल्काची धमकी देऊन व्यापार करार करण्यासाठी दबाव आणला. काही देशांनी माघार घेतली आणि शुल्क कमी केले किंवा काढून टाकले गेले. भारताने मात्र आपल्या व्यापार हितसंबंधांशी तडजोड करण्यास नकार दिला. त्यामुळे ट्रम्प प्रशासन नाराज झाले. ऑगस्टमध्ये अमेरिकेने भारतावर ५० टक्के शुल्क जाहीर केले. याचा अमेरिकेला होणाऱ्या भारतीय उत्पादनांच्या निर्यातीवर विपरीत परिणाम झाला. परदेशी गुंतवणूकदारांनीही मोठ्या प्रमाणात विक्री केली. त्यामुळे रुपया कमकुवत झाला. अलीकडच्या काळात रुपयाच्या घसरणीने देशाच्या अर्थव्यवस्थेला मोठ्या प्रमाणात मदत केली आहे, असा सरकारचा विश्वास असला तरी काही तज्ज्ञांचा विश्वास आहे, की रुपयाची घसरण नेहमीच कमकुवतपणाचे लक्षण नसते. १९९१ पासून बाजार रुपयाचे मूल्य ठरवतो. कधी कधी, रुपयाचे घसरण निर्यातदारांसाठी (जसे की आयटी कंपन्या आणि औषध कंपन्या) फायदेशीर असते, कारण ते डॉलरमध्ये कमावतात आणि रुपयात रूपांतरित केल्यावर जास्त पैसे मिळवतात. रुपया स्थिर करण्यासाठी सरकार आणि रिझर्व्ह बँकेने अमेरिकेसोबत व्यापार करार करण्याव्यतिरिक्त इतर मार्गांनी रुपया स्थिर करण्यासाठी एक मजबूत धोरण विकसित केले पाहिजे. देशाच्या निर्यातभिमूख सुविधांमध्ये सुधारणा करणे आणि मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार रोखणेदेखील रुपया स्थिर करण्यास मदत करू शकते.

**कैलास ठोळे**

# इंडिया आघाडीचे भवितव्य काय ?



मध्यंतरी पार पडलेल्या बिहार विधानसभा निवडणुकीत राजदच्या नेतृत्वाखालील महाआघाडीला दारूण पराभव पत्करावा लागला. महाआघाडीतील काँग्रेसची कामगिरी तर अतिशय निराशाजनक झाली. काँग्रेसने लढविलेल्या ६१ जागांपैकी पक्षाला फक्त ६ जागाच जिंकता आल्याने,इंडिया आघाडीतील घटक पक्षांमधील काँग्रेसचे वजन कमी झाले.बिहार विधानसभा निवडणुकीपूर्वी,काँग्रेसचे बडे नेते राहुल गांधी यांनी बिहारमध्ये व्होटर अधिकार यात्रा काढली होती.त्या यात्रेला बिहार मधील जनतेने चांगला प्रतिसाद दिला होता.त्यामुळे बिहार मधील काँग्रेसच्या नेत्यांची अशी समजूत झाली की, बिहार मध्ये पक्षाची ताकद मोठ्या प्रमाणात वाढली आहे.म्हणून जागा वाटपाच्या वेळी काँग्रेसने जास्तीत जास्त जागांची मागणी केली होती.काँग्रेसच्या आडमुठेपणामुळे जागा वाटपाच्या चर्चेचे गुऱ्हाळ शेवटच्या दिवसापर्यंत सुरू होते.काही जागांवर तर महाआघाडीमध्ये मैत्रीपूर्ण लढतीचा निर्णय घेण्यात आला होता.या सर्व गोंधळाचा फटका नंतर महाआघाडीला निवडणुकीत बसला होता.

जम्मू काश्मीरचे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी काँग्रेसच्या या चुकांवर नेमके बोट ठेवले आहे.बिहार विधानसभा निवडणुकीत जागा वाटपाच्या बाबतीत काँग्रेसने एवढे ताणून धरायला नको होते,असा सल्ला ओमर अब्दुल्ला यांनी काँग्रेसला दिला आहे.इंडिया आघाडीतील झारखंड मुक्ती मोर्चा या घटक पक्षाला बिहार विधानसभा निवडणुकीत काही जागा सोडायला हव्या होत्या,असे वक्तव्य ओमर अब्दुल्ला यांनी केले आहे.तसेच संयुक्त जनता दलाचे सर्वेसर्वा आणि बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार यांच्याबरोबर योग्य तो समन्वय राखण्यात, इंडिया आघाडीला अपयश आल्यानेच ते भाजपाच्या नेतृत्वाखालील रालोआमध्ये परतले असा आरोपही ओमर अब्दुल्ला यांनी केला आहे.नितीशकुमार हे इंडिया आघाडी, सोडून गेल्याने इंडिया आघाडीचे खूप नुकसान झाले,असा ओमर अब्दुल्ला यांच्या म्हणण्याचा मतितार्थ होता. अरविंद केजरीवाल यांच्या नेतृत्वाखालील आम आदमी पक्ष या अगोदरच इंडिया आघाडीतून बाहेर पडला आहे.त्यातच ओमर अब्दुल्ला यांची नाराजी, हेच दर्शवते की इंडिया आघाडीत कोणताही ताळमेळ नाही.महत्वाची गोष्ट म्हणजे जम्मू काश्मीरमध्ये, नॅशनल कॉन्फरन्सच्या नेतृत्वाखाली जे सरकार सत्तेवर आहे,त्या सरकारमध्ये काँग्रेसचा समावेश आहे.सध्या काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी व्होट चोरीचा मुद्दा उचलून धरला आहे.काँग्रेसने नुकतीच दिल्लीमध्ये 'व्होट चोर,गद्दी छोड' रॅली आयोजित केली होती.त्यामध्ये काँग्रेसच्या नेत्यांनी भाजपा आणि निवडणुक आयोग यांच्यावर सडकून टीका केली.मात्र ओमर अब्दुल्ला यांची भूमिका वेगळी असल्याचे, त्यांनी केलेल्या एका वक्तव्यातून दिसून आले आहे.ओमर अब्दुल्ला यांनी असे विधान केले की काँग्रेसने व्होट चोरीचा जो मुद्दा उचलून धरला आहे, त्याच्याशी इंडिया आघाडीला काहीही देणेघेणे नाही.काँग्रेसला आपला अजेंडा ठरवण्याचे स्वातंत्र्य आहे.परंतु त्या बाबतीत आमचे मत वेगळे असू शकते.

ओमर अब्दुल्ला एवढ्यावरच थांबले नाहीत.ते म्हणाले की इंडिया आघाडी सध्या लाईफ सपोर्टवर (व्हेंटिलेटरवर) आहे.याचा अर्थ असा होतो की इंडिया आघाडीचे भवितव्य अंध:कारमय आहे.निरनिराळ्या निवडणुकांत काँग्रेसचा सातत्याने पराभव होत असल्याने, काँग्रेसच्या नेतृत्व क्षमतेबाबत इंडिया आघाडीतील घटक पक्षांना विश्वास राहिलेला नाही,ही वस्तुस्थिती आहे.बिहारमध्ये आपल्या व्होटर अधिकार यात्रेत काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी व्होट चोरीचा मुद्दा हिरीरीने मांडला.परंतु बिहार मधील जनतेला तो मुद्दा महत्त्वाचा वाटला नाही,ही गोष्ट बिहार विधानसभा निवडणुकीतील काँग्रेसच्या दारुण पराभवानंतर पुरेशी सिध्द झाली.खरी गोष्ट अशी आहे की व्होट चोरीचा मुद्दा, काँग्रेसकडून सोयीनुसार मांडला जातो.नुकत्याच पार पडलेल्या केरळमधील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत काँग्रेसला भव्य यश मिळाले.त्या ठिकाणी व्होट चोरीचा मुद्दा गायब झाला.याचा अर्थ ज्याठिकाणी काँग्रेसचा पराभव होतो, त्याठिकाणी व्होट चोरीचा मुद्दा काँग्रेसकडून हिरीरीने मांडला जातो आणि जेथे काँग्रेसचा विजय होतो तेथे त्याबाबत काँग्रेसकडून मौन बाळगले जाते,हा काँग्रेसचा दुटप्पीपणा, जनतेला समजत नाही,या भ्रमात काँग्रेसने न राहिलेले बरे.व्होट चोरीचा मुद्दा काँग्रेसकडून सातत्याने मांडला जात असल्याने त्याचे गांभीर्य नाहीसे झाले आहे.चाणाक्ष अशा ओमर अब्दुल्ला यांनी ते वास्तव बरोबर ओळखले आहे.काँग्रेसने त्याबाबत आत्मचिंतन करण्याची गरज आहे.

इंडिया आघाडीच्या भवितव्याबाबत बोलायचे झाल्यास,ती आता फक्त कागदावरच राहिली आहे.पुढील वर्षी काही राज्यांत विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत.त्यापैकी केरळ विधानसभेच्या निवडणुकीत इंडिया आघाडीतील काँग्रेस आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट हे घटक पक्ष एकमेकांविरुद्ध लढणार आहेत.पश्चिम बंगाल मधील विधानसभा निवडणुकीत इंडिया आघाडीतील तृणमूल काँग्रेस आणि काँग्रेस हे घटक पक्ष एकमेकांविरुद्ध लढणार आहेत.अशा परिस्थितीत इंडिया आघाडीच्या भवितव्याबाबत न बोललेलेच बरे.

**अभय गोखले**

## इतिहास,संरक्षण आणि राष्ट्र जागृतीचा शंखनाद

संवाद

सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सव दिल्ली येथे नुकताच उत्साहात पार पडला. या महोत्सवाच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या शिवकाळातील शस्त्रास्त्रांच्या भव्य प्रदर्शनाला तसेच स्वसंरक्षण प्रात्यक्षिकांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला, ही अत्यंत समाधानकारक बाब आहे. विशेषतः हिंदू जनजागृती समिती आणि सव्यसाची गुरुकुलम्, कोल्हापूर यांच्या माध्यमातून सादर करण्यात आलेल्या स्वसंरक्षण प्रात्यक्षिकांनी उपस्थितांवर सखोल प्रभाव टाकला.

आजच्या बदलत्या सामाजिक परिस्थितीत स्वसंरक्षण ही केवळ कला न राहता ती काळाची गरज बनली आहे. महिला, युवती तसेच तरुण मुलगे यांना आत्मविश्वासाने उभे राहण्यासाठी शारीरिक, मानसिक आणि नैतिक बळ देणारे असे उपक्रम अधिक व्यापक स्वरूपात राबवले जाणे आवश्यक आहे. या महोत्सवात दाखवलेली शिस्तबद्ध प्रात्यक्षिके, ऐतिहासिक शस्त्रास्त्रांची माहिती आणि त्यामागील शौर्यगाथा यांमुळे शिवरायांचा खरा, तेजस्वी आणि प्रेरणादायी इतिहास नव्या पिढीपर्यंत पोहोचला.

शिवछत्रपती हे केवळ युद्धकौशल्याचे प्रतीक नव्हते, तर त्यांनी स्वराज्य, स्वाभिमान आणि स्वसंरक्षणाचा विचार समाजमनात खोलवर रुजवला. आज त्यांच्या या विचारांची देशभर पुन्हा एकदा उजळणी होणे गरजेचे आहे. दिल्लीसारख्या महानगरात या उपक्रमाला मिळालेला प्रतिसाद पाहता, असे कार्यक्रम देशातील विविध राज्यांमध्ये, जिल्हा व तालुका स्तरावर राबवले गेले पाहिजेत. यामुळे केवळ इतिहासाचे जतन होणार नाही, तर देशातील तरुण-तरुणी स्वसंरक्षणाचे धडे घेऊन अधिक सक्षम, सजग आणि आत्मविश्वासी बनतील. राष्ट्राच्या सुरक्षिततेसाठी सजग नागरिक घडविण्याच्या दृष्टीने अशा उपक्रमांना शासन, सामाजिक संस्था आणि शिक्षणसंस्था यांनी सक्रिय पाठबळ द्यावे, हीच अपेक्षा.

**-अनिकेत शेटे**

## असंघटित गुन्हेगारी की,धर्मांतराचा सुनियोजित कट

झारखंड,बिहार,आसाम,ओरीसा,बंगाल या राज्यांतील वय ६ महिने ते १२ वर्षे मुले गायब झालीत. या बाबत केरळ उच्च न्यायालयात पी.एल.आय.दाखल झाल्यानंतर तेथील तत्कालीन मुख्य न्यायाधीश श्री अशोक भूषण महोदयांनी चौकशी गठीत करुन सी.बी.आय.मार्फत तपास केला असता, ती अपह्रुत मुले अनाथाश्रमात ( यतीम खाना) सापडली.त्यावेळेस त्यांचे धर्मांतर होउन नावही बदलल्याचे आढळून आले.धर्मांतर करण्यासाठी आखलेला सुनियोजित कट असल्याचे केरळ उच्च न्यायालयात पी.एल.आय. दाखल झाल्यामुळे कळले.नाहीतर तसेच सुरू राहिले असते.याबाबत आता सर्वोच्च न्यायालयातही खटला दाखल झाला आहे. हे सर्व टाळण्यासाठी नागरिक, पोलीस प्रशासन,व पालक यांनी जागृत होणे आवश्यक आहे. धर्मांतर टाळण्यासाठी, धर्मांतर बंदी कायदा करणे ,असंघटित गुन्हेगारी / अवैध व्यापार बंदी कायदा पारित होणे ही आजची गरज आहे.

**शशिकांत पाध्ये, वर्धा**

E-mail :-ytljanmadhyam@gmail.com
जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सखा

# पॉडकास्टमधील आरोपानंतर धमकी..!

## ॲड. सीमा तेलंगे यांचा आदिवासी मंत्र्यावर गंभीर आरोप

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ - राज्याचे आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांच्याकडून जीवे मारण्याच्या धमक्या मिळाल्याचा गंभीर आरोप ॲड.सीमा एल. तेलंगे यांनी केला आहे. यासंदर्भात त्यांनी मंगळवारी यवतमाळ येथे पत्रकार परिषद घेऊन माध्यमांसमोर सविस्तर प्रेस नोट सादर केली.

अधिवक्ता सीमा तेलंगे यांनी सांगितले की, १७ डिसेंबर २०२५ रोजी त्यांनी "बोध टॉक" या पॉडकास्ट वरील मुलाखती दरम्यान काही आदिवासी शेतकऱ्यांच्या जमिनी बळकावल्या गेल्याचे आरोप सार्वजनिकरित्या मांडले होते. हे प्रकरण न्यायप्रविष्ट असतानाही, आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांनी थेट उत्तर देण्याऐवजी दुसऱ्या व्यक्ती मार्फत जीवे मारण्याच्या धमक्या दिल्याचा दावा त्यांनी केला. या धमक्यांमुळे त्यांच्या कुटुंबात भीतीचे वातावरण निर्माण झाले असल्याचेही त्यांनी नमूद केले. प्रेस नोटमध्ये नमूद केल्याप्रमाणे, यवतमाळ जिल्ह्यातील राळेगाव तहसील अंतर्गत देवधारी गावातील आदिवासी शेतकरी भुर्भा कोवे यांची जमीन हडपण्याचा प्रयत्न करण्यात आला. पटवारी यांच्याशी संगनमत करून ही जमीन संबंधित कापूस गिरणीच्या नावावर हस्तांतरित करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. याशिवाय, उभे पीक जेसीबीच्या साहाय्याने नष्ट करण्यात आले. शेतकऱ्यावर हल्ला झाला आणि त्याच जागेवर "बिरसा कापूस गिरणी"चे उद्घाटन करण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. या प्रकरणी वडकी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्याचा प्रयत्न करण्यात आला, मात्र पोलिसांनी तक्रार नोंदवली नाही, असा आरोपही त्यांनी केला. अधिवक्ता तेलंगे यांनी आदिवासी आश्रम शाळांमधील तात्पुरत्या भरती प्रक्रियेवर ही गंभीर प्रश्न उपस्थित केले. १ मे २०२५ रोजी जारी करण्यात आलेल्या शासन निर्णयानुसार १,७९१ पदे बाह्य सोर्सिंगद्वारे भरण्यात आली. यामुळे सुमारे ४,५०० अनुभवी कंत्राटी शिक्षकांना सेवेतून काढण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला. या प्रक्रियेत एका खाजगी कंत्राटदार कंपनीमार्फत मोठ्या प्रमाणावर अनियमितता झाल्याचा दावा करण्यात आला. तसेच, एका आश्रम शाळेत कंत्राटी शिक्षिका कडून महिला विद्यार्थिनींचे शोषण झाल्याची घटना घडली असतानाही सुरुवातीला कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. सोशल मीडियावर व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतरच गुन्हा दाखल करण्यात आला, असे त्यांनी सांगितले. याशिवाय, आदिवासी विकास मंत्र्यांनी आपल्या पदाचा गैरवापर करून आपल्या मुलीला मुंबई उच्च न्यायालयात 'ब' वर्ग सल्लागार म्हणून नियुक्ती मिळवून दिल्याचा तसेच यवतमाळ नगरपरिषदेच्या अध्यक्षपदासाठी आपल्या मुलीला उमेदवारी देत इतर पात्र उमेदवारांना डावलल्याचा आरोपही अधिवक्ता तेलंगे यांनी केला. या सर्व प्रकरणांची निष्पक्ष व सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली. पत्रकार परिषदेला माधुरी मडावी आणि उत्तम खंडारकर उपस्थित होते.

### आदिवासी मंत्री वरील आरोप पूर्णपणे निराधार



दुसरीकडे, भाजपचे जिल्हाध्यक्ष ॲड.प्रफुल्ल चव्हाण यांनी स्वतंत्र पत्रकार परिषद घेऊन आदिवासी विकास मंत्री वरील सर्व आरोप फेटाळून लावले. अधिवक्ता प्रफुल्ल चव्हाण यांनी सांगितले की, काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यां पैकी असलेल्या ॲड.सीमा तेलंगे यांनी तीन दिवसांपूर्वी एका पॉडकास्ट मध्ये आदिवासी मंत्री अशोक उईके व त्यांच्या मुलीवर बनावट व निराधार आरोप केले होते. भाजपच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार ॲड. प्रियदर्शिनी उईके यांच्याविरोधात खोटे आरोप करण्यात आले असून जनतेने ते पूर्णपणे नाकारले आहेत. जनतेकडून कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने राजकीय द्वेषातून पुन्हा हे आरोप केले जात असल्याचा दावा त्यांनी केला. प्रलंबित प्रकरणावर न्यायालयाच्या निर्णयाची वाट न पाहता आरोप करणे म्हणजे न्यायालयाचा अवमान असल्याचेही ते म्हणाले. काँग्रेस पक्ष सध्या शेवटच्या टप्प्यात असून बातम्यांसाठी व राजकीय लाभासाठी असे आरोप केले जात असल्याचा आरोप त्यांनी केला. धमकी दिल्याचा कोणताही पुरावा नसून, आरोप करणाऱ्यांनी धमकी देणाऱ्या व्यक्तीचे नाव जाहीर करावे, असे आव्हान त्यांनी दिले. भाजप या सर्व आरोपांचा तीव्र निषेध करत असल्याचे त्यांनी सांगितले. या पत्रकार परिषदेला राजू पडगिलवार आणि शंतनू शेटे उपस्थित होते.

# रेती माफियांचा पोलिस अधिकाऱ्यावर हल्ला, स्वसंरक्षणार्थ गोळीबार

## महागाव तालुक्यात खळबळ सहाय्यक पोलिस निरीक्षक गंभीर जखमी, एक हल्लेखोर गोळीबारात जखमी



महागाव - पुस नदी पात्रात अवैध रेती उपशावर कारवाईसाठी गेलेल्या सहाय्यक पोलिस निरीक्षकावरच रेती माफियांनी जीवघेणा हल्ला केल्याची धक्कादायक घटना गुरुवारी (दि. १८ डिसेंबर) सकाळी साडेदहाच्या सुमारास वाडी (वाकोडी) शिवारात घडली. अचानक झालेल्या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या अधिकाऱ्याने स्वसंरक्षणासाठी सर्व्हिस रिव्हॉल्व्हरमधून दोन राऊंड फायर केले. त्यात एक हल्लेखोर जखमी झाला आहे. या घटनेने संपूर्ण तालुक्यात खळबळ उडाली आहे.

महागाव पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलिस निरीक्षक सुनिल अंबुरे यांना पुस नदी पात्रात अवैध रेती उपसा करून ट्रॅक्टरद्वारे वाहतूक होत असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली होती. त्यानुसार ते घटनास्थळी पोहोचले असता काही इसम रेती भरलेले ट्रॅक्टर घेऊन निघत असल्याचे आढळले. चौकशी व कारवाई सुरू असतानाच पाच ते सहा रेती तस्करांनी आमचे ट्रॅक्टर पकडून कारवाई का करता? असा जाब विचारत अचानक अंबुरे यांच्यावर हल्ला चढवला. धक्काबुक्की, मारहाणीने परिस्थिती चिघळताच स्वतःचा जीव वाचवण्यासाठी अंबुरे यांनी गोळीबार केला. गोळीबारात गुलाब खाजा शेख याच्या खांद्याला गोळी लागून तो जखमी झाला. हल्ल्यात सहाय्यक पोलिस निरीक्षक अंबुरेही जखमी झाले असून त्यांना तातडीने सवना येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. हल्ल्यानंतर आरोपी ट्रॅक्टरसह पळून गेले. रेती माफियांची दहशत इतकी वाढली आहे की कायदा राबवणाऱ्या अधिकाऱ्यांवरच हल्ले होत आहेत. प्रशासनाच्या नजरेआड सुरू असलेल्या अवैध रेती उपशावर आता निर्णायक कारवाई होणार की माफियांची दहशत कायम राहणारहा प्रश्न या घटनेने ऐरणीवर आणला आहे. घटनेची माहिती मिळताच महागाव पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. शोधमोहीम राबवून दोन आरोपींना अटक करण्यात आली असून तीन आरोपी फरार आहेत. या प्रकारामुळे वाडी (वाकोडी) परिसरात तणावसदृश्य स्थिती निर्माण झाली होती. परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी तहसीलदार अभय मस्के, ठाणेदार धनराज निळे, उमरखेडचे ठाणेदार शंकर पांचाळ तसेच दंगल नियंत्रण पथक घटनास्थळी दाखल झाले.

### पोलीस अधीक्षकांची घटनास्थळी भेट

रेती माफियांच्या हल्ल्याची माहिती मिळताच जिल्हा पोलीस अधीक्षक कुमार चिंता, अप्पर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, उपविभागीय पोलीस अधिकारी हर्षवर्धन बीजे आणि स्थागुशाचे पोलीस निरीक्षक सतीश चवरे यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. त्यांनी रुग्णालयात जखमी सहाय्यक पोलिस निरीक्षक सुनिल अंबुरे यांची भेट घेऊन तब्येतीची विचारपूस केली. फरार आरोपींना तात्काळ अटक करून कठोर कारवाई करण्याचे स्पष्ट निर्देश वरिष्ठांनी दिले आहेत.

## • वेचक

### त्रिमाता लढवय्या पुरस्काराने ज्योती राठोड यांचा सन्मान



यवतमाळ - तीन मातांच्या पवित्र स्मृतिप्रित्यर्थ दिला जाणारा त्रिमाता लढवय्या पुरस्कार यंदा यवतमाळ येथील संघर्षशील व कर्तृत्ववान महिला श्रीमती ज्योती राठोड यांना प्रदान करण्यात आला. यवतमाळ येथील सरकटे व मिरासे परिवाराने त्रिमाता लढवय्या पुरस्कार निवड समितीच्या सहकार्याने श्रीमती अनुसयाबाई साठे यांच्या स्मृतिदिनानिमित्त हा सन्मान सोहळा आयोजित केला होता. स्व. अनुसयाबाई साठे, स्व. कौसल्याबाई सरकटे व स्व. मंजुळाबाई मिरासे या त्रिमातांच्या स्मृतिप्रीत्यर्थ हा पुरस्कार सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला. पुरस्काराचे स्वरूप रुपये पाच हजार रोख, शाल-श्रीफळ, सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, साडी-चोळी व पुष्पगुच्छ असे होते. श्रीमती ज्योती राठोड या यवतमाळ येथे राहणाऱ्या एकल महिला असून, पतीच्या आधाराशिवाय कष्टाची कामे करून त्यांनी आपल्या चारही मुलींना शिक्षण देत सुसंस्कारित केले. स्वतःच्या संघर्षातून उभे राहत समाजासाठी जमेल तसे सामाजिक कार्य करण्याची त्यांची जीवन वृत्ती असल्याने त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. या पुरस्कार समारंभाचे अध्यक्ष म्हणून दूरदर्शनचे जिल्हा प्रतिनिधी व सामाजिक कार्यकर्ते आनंद कसंबे उपस्थित होते. प्रा. घन:श्याम दरणे व प्रा. अंकुश वाकडे हे अनुक्रमे प्रमुख वक्ते व प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. तसेच बद्दुसिंग आडे व श्रीमती शकुंतलाबाई तेलरांधे यांची प्रमुख उपस्थिती होती. सत्कारानंतर बोलताना प्रा. घन:श्याम दरणे म्हणाले की, "ज्योतीताईचा जीवनसंघर्ष अत्यंत प्रेरणादायी आहे. परित्यक्ता म्हणून अनेक अडचणींना सामोरे जात त्यांनी आपल्या चारही मुलींना शिक्षण देत समर्थपणे मोठे केले." तर प्रा. अंकुश वाकडे यांनी, "आई ही जीवनातील सर्वश्रेष्ठ शक्ती आहे. तिचे उपकार जन्मोजन्मी फिटत नाहीत. ज्योतीताई राठोड यांना पुरस्कार देऊन सरकटे व मिरासे परिवाराने कर्तृत्ववान स्त्री आणि लढाऊ आई या दोघींचा एकाच वेळी सन्मान केला आहे," असे मत व्यक्त केले.

### राष्ट्रवादी काँग्रेसच्या राळेगाव शहर अध्यक्षांचा राजीनामा



राळेगाव - राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राळेगाव शहर अध्यक्ष तथा पक्षाचे ज्येष्ठ व निष्ठावान कार्यकर्ते प्रकाश माधवराव खुडसंगे यांनी आपल्या पदाचा तसेच पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिला आहे. त्यांनी हा राजीनामा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या जिल्हाध्यक्षा सौ. वर्षाताई निकम यांच्याकडे सादर केला आहे. प्रकाश खुडसंगे हे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या स्थापनेपासून पक्षाशी एकनिष्ठ राहून कार्यरत होते. राळेगाव शहर अध्यक्ष या नात्याने त्यांनी पक्षसंघटन मजबूत करण्यासाठी, सामान्य जनतेचे प्रश्न मांडण्यासाठी तसेच विविध सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून पक्षाचा विस्तार करण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. राजीनाम्याबाबत माहिती देताना त्यांनी नमूद केले आहे की, सध्या काही वैयक्तिक कारणांमुळे पक्षाच्या कामकाजाला अपेक्षित वेळ व न्याय देता येत नसल्याने, पक्षाच्या कार्यावर कोणताही परिणाम होऊ नये या उद्देशाने त्यांनी स्वेच्छेने हा निर्णय घेतला आहे. पक्षाने दिलेल्या जबाबदाऱ्या, विश्वास व सन्मानाबद्दल त्यांनी पक्ष नेतृत्वाचे आभार मानले आहेत. दरम्यान, राजीनामा दिल्यानंतर प्रकाश खुडसंगे यांनी पुढील काळात आपली राजकीय भूमिका स्वतंत्रपणे ठरवण्याचा अधिकार राखून ठेवला असून, भविष्यात योग्य वेळी ते कोणत्याही राजकीय पक्षात सहभागी होण्याचा निर्णय घेऊ शकतात, असेही संकेत त्यांनी दिले आहेत. त्यांच्या या निर्णयामुळे राळेगाव तालुक्यातील राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे.

### बंजारा समाजाचा यवतमाळ येथे २८ डिसेंबरला वधू वर परिचय मेळावा

राळेगाव : श्री सत्य साई क्रीडा रंजन गृह येथे भारतीय बंजारा समाज कर्मचारी संस्था यवतमाळ यांच्या वतीने येत्या 28 डिसेंबरला बंजारा समाज युवक युवती परिचय मेळावा आयोजित करण्यात आला आहे.या मेळाव्यात बंजारा समाजातील सर्व उपजाती व घटस्फोटीत, विधवा व विधुर यांचा परिचय घेण्यात येणार असून हा मेळावा सत्यसाई क्रीडा रंजन गृह, श्री सत्यसाई विद्यानगरी डॉ.नंदुरकर विद्यालय परिसर लाठीवाला पेट्रोल पंपाजवळ दारव्हा रोड येथे संपन्न होणार असून या मेळाव्याचे विनित यवतमाळ जिल्हा अध्यक्ष इंजिनिअर जवाहर राठोड, जिल्हा कार्याध्यक्ष वसंत राठोड, जिल्हा सचिव यशवंत राठोड हे असून याबाबत संपर्क साधायचा असल्यास बि. सी. राठोड ,टी. टी. जाधव आणि नवलकिशोर राठोड यांच्याशी संपर्क साधावा सोबतच राळेगाव तालुक्यातील बंजारा बांधवानी या सुवर्ण संधीचा फायदा घेऊन हा कार्यक्रम यशस्वी करावा तसेच युवक युवतीची नोंदणी करायची असल्यास त्याच दिवशी सकाळी ठिक 9.00 वाजेपासून नोंदणी करण्यात येणार आहे.

# वणीच्या ठाणेदाराविरोधात आदिवासी महिलेची तक्रार

## जातीवाचक शिवीगाळ व जिवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप

**जनमाध्यम प्रतिनिधी**



वणी - वणी पोलीस ठाण्याचे ठाणेदार गोपाल उंबरकर यांच्या विरोधात एका आदिवासी महिलेने गंभीर आरोप करत तक्रार केल्याने एकच खळबळ उडाली आहे.

वणी येथील तहसील कार्यालयासमोर चहाचे दुकान चालवणाऱ्या आदिवासी समाजातील महिला रिना नंदु जुमनाके यांनी वणी पोलिस ठाण्यातील ठाणेदारावर अत्यंत गंभीर स्वरुपाचे आरोप केले आहेत. जातीवाचक शिवीगाळ, अपमानास्पद वागणूक तसेच चहाचे दुकान फेकून देण्याची व जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप करत त्यांनी थेट महाराष्ट्र राज्याचे आदिवासी विकास मंत्री मा.अशोक उईके यांच्याकडे लेखी तक्रार दाखल केली आहे.

तक्रारीनुसार,अर्जदार रिना जुमनाके यांचा मुलगा साहील जुमनाके याला काही महिन्यांपूर्वी एका पोलिस अधिकाऱ्याने मारहाण केल्याचा प्रकार घडला होता.त्या प्रकरणी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने 16 डिसेंबर 2025 रोजी रात्री वणी पोलिस ठाण्यात बयानासाठी बोलावण्यात आले होते.बयान नोंदवित असताना ठाणेदार तेथे आले व त्यांनी अर्जदारास जातीवाचक, अश्लील व अपमानास्पद शब्द वापरून शिवीगाळ केली,तसेच "तुझे चहाचे दुकान फेकून देईन, तहसील समोर दुकान टाकू देणार नाही" अशी धमकी दिल्याचा आरोप आहे.या घटनेमुळे स्वतःसह मुलाचा शारीरिक व मानसिक छळ झाल्याचे नमूद करत, सार्वजनिक ठिकाणी अपमान केल्याने आणि जीवे मारण्याची धमकी दिल्याने संबंधित ठाणेदाराविरोधात अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंध) अधिनियम 1989 तसेच भारतीय न्याय संहिता (BNS) अंतर्गत गुन्हा दाखल करण्याची मागणी करण्यात आली आहे. या प्रकरणाची प्रत मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री,पालकमंत्री,विशेष पोलीस महासंचालक (अमरावती विभाग),जिल्हा पोलीस अधीक्षक व जिल्हाधिकारी यवतमाळ यांना पाठविण्यात आली आहे.प्रकरण उघडकीस आल्यानंतर वणी शहरात खळबळ उडाली असून,संबंधित प्रकरणात वरिष्ठ पातळीवरुन तातडीची चौकशी व कारवाई होणार का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**तक्रार खोटी असल्याचा ठाणेदाराचा दावा : चहा विक्रेत्या महिलेचा मुलगा हा अवैध धंदेवाईकांचा पंटर असल्याच्या संशयावरुन पोलिसाने त्याचा मोबाईल ताब्यात घेतला होता. तक्रारदार महिलेला कुठल्याही प्रकारच्या अर्वाच्य भाषा किंवा जातीवाचक शब्द बोललो नाही. मुलाच्या बचावासाठी सदर महिलेने माझ्याविरुद्ध खोटी तक्रार केली आहे.**

**– गोपाल उंबरकर**
**ठाणेदार, पोलीस स्टेशन वणी**

# स्वहीतासाठी दुय्यम निबंधक कार्यालयात नियमबाह्य खरेदी-विक्री

## शासनाच्या महसुलला चुना ; दलाल मार्फत सुरू आहे अवैध कारभार!

**जनमाध्यम प्रतिनिधी**



पुसद - पुणे जिल्ह्यातील शासकीय जमिनीच्या खरेदी विक्रीच्या गैरव्यवहाराची प्रकरणे उघड झाल्यानंतर वर्ग २ च्या प्रकारातील तब्बल २ हजार जमिनीची तपासणी तहसीलदार मार्फत करण्यात आली असून या खरेदी विक्री झालेल्या जमिनीच्या हस्तांतरणा वेळी असलेल्या अटी व शर्तीनुसार वापर सुरु आहे की, शर्तभंग झाला आहे याची तपासणी करून पंचनामे केली जाणार आहे. असाच प्रकार पुसद येथील नोंदणी व मुद्रांक विभागाच्या दुय्यम निबंधक कार्यालयात मनमानी कारभार चालू असल्याचे तालुक्यात सर्वत्र चर्चेला उधाण आले आहे.

शासकीय जमिनीच्या विशेष म्हणजे वर्ग २ च्या जमिनीच्या खरेदी विक्रीचा व्यवहार पुसदच्या नोंदणी व मुद्रांक विभागात मोठ्या प्रमाणात चालू आहे. धक्कादायक बाब म्हणजे पुसद तालुक्यातील वर्ग २ च्या जमिनीच्या खरेदी विक्रीच्या दस्त नोंदणीला वेग आल्याची सूत्राची माहिती असून वरिष्ठ कार्यालयाने पुसदच्या जमिनीचे भाव कमी दाखवून शासनाच्या महसुलाची फसवणूक कार्यालयात होत असलेल्या शासकीय जमिनीच्या खरेदी-विक्रीचे व्यवहार शासनाच्या नियमानुसारच चालू आहे की नाही हे वरिष्ठांनी पाहणे महत्त्वाचे आहे, तसेच शासनाच्या महसुलाची लूट चालू आहे की नाही,याचीही चौकशी होणे महत्वाचे झाले आहे अशी ही जनमानसात चर्चा आहे. पुसद येथील नोंदणी व मुद्रांक विभागाच्या दुय्यम निबंधक यांच्या मनमानी कारभारामुळे तालुक्यातील वर्ग २ च्या शासनाच्या जमिनीच्या खरेदी-विक्रीच्या दस्त नोंदणी ही कार्यालयातील असलेले दलाला मार्फत मोठी आर्थिक देवाणघेवाण होत असते अशीही चर्चा सुरू आहे. गोरगरिबाच्या जमिनी कवडीमोल भावात घेऊन ईजारदार तसेच भुमाफीया, बिल्डर अँन्ड डेव्हलपर होत आहेत, या संधीचा फायदा दुय्यम निबंधक यांनी न घेतल्यास नवलच समजावे लागेल? पुसद तालुक्यातील माळरानावर बसलेल्या दलित, शोषित, पीडित, आदिवासी समाजाला इतरही समाजाला मिळालेल्या शासनाच्या वर्ग २ च्या जमिनी कवडीमोल भावाने घेऊन दुय्यम निबंधक वर्ग १ ला हाताशी धरून खरेदी व्यवहार सुरु आहे. तालुक्यातील असंख्य गोरगरीब भूमीहिन होताना दिसून येत आहेत. ह्याच संधीचा फायदा घेऊन तालुक्याच्या दुय्यम निबंधक स्वहीत साधत आहे. पुसद शहरातील करोडो रुपयाच्या प्लॉटिंग व्यवसायात गुंतलेल्या करोडपती यांनी आता आपली नजर ग्रामीण भागातील असलेल्या गोरगरिबांच्या शेत जमिनी कमी पैशात विकत घेण्यावर लक्ष केंद्रित केल्याचे दिसून येत आहे. शासनाच्या वर्ग-२ च्या जमिनीची खरेदी-विक्री करण्यासाठी जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी तसेच तहसीलदार यांची पूर्वपरवानगी घेऊनच वर्ग २ च्या जमिनी विक्री-खरेदीसाठी प्रक्रिया पूर्ण केल्या जाते, असे असतांना बऱ्याच जमिनीचे खरेदी व्यवहार परस्पर करून शासनाची दिशाभूल करण्याचा व शासनाचा महसूल बुडवण्याचा प्रकार दुय्यम निबंधक करीत आहे. यामुळे बहुतांश गोरगरीब शेतकरी भूमिहीन होण्याच्या मार्गावर आहे. वर्ग २ च्या जमिनी गोरगरिबाच्या ताब्यात राहून त्यांना त्यांच्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्यासाठी आधार राहील आणि कवडीमोल किंमतीत आपली शेतजमीन विकून भुमीहिन होणार नाही या बाबीची दखल जिल्हाधिकारी यांनी दखल घ्यावी अशी मागणी होत आहे.

# उपविभागीय अधिकारी यांच्या सभागृहात विशेष सखोल पुनरावलोकन यादीच्या माहिती करिता बैठक

**जनमाध्यम प्रतिनिधी**

पुसद - १८ डिसेंबर 2025 रोजी उपविभागीय अधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी पुसद यांनी विशेष सखोल पुनारवलोकन कार्यक्रम (Specail Intesive Revision) (SIR) या विषयाची राजकीय पक्षाची बैठक दुपारी 4:00 वाजता आयोजीत करण्यात आली.

सदर बैठक जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचे पत्र क्र.अ.का. सा. नि/कावि-36/2025 दिनांक-10/12/2025 च्या पत्रानुसार कळविण्यात आले की, विशेष पुनर्रावलोकन कार्यक्रम (Specail Intesive Revision) (SIR) अन्वये मतदार यादी तयार करण्याच्या अनुषंगाने राजकीय पक्षाची बैठक आयोजीत करून घेण्याचे अनुषंगाने मतदार नोंदणी अधिकारी यांचे स्तरावर सर्व मान्यता प्राप्त राजकीय पक्षासोबत बैठक आयोजीत करण्याबाबत उपविभागीय अधिकारी कार्यालयास निर्देशित करण्यात आले. वरिल विषयाचे अनुषंगाने दि. 18/12/2025 रोजी दुपारी 4.00 वाजता उपविभागीय अधिकारी, पुसद येथील सभागृहात सभा आयोजीत करुन एसआयआर बाबत माहिती सांगण्यात आली या एसआयआर म्हणजे शासन स्तरावर 2002 ची निवडणूक यादी व 2025 ची यादी ही तपासणी करून दोन्ही यादीमध्ये आज रोजी असलेल्या मतदान यादीतील मतदार यांची पडताळणी करून नवीन यादी पुनर्विलोकन करण्यात येणार आहे. ज्या लोकांचे नावे 2002 मधील यादीमध्ये नसेल तर त्यांनी आई-वडिलांचे 2002 यादी मधील नाव व नंबर शासनाच्या बीएलओ तसेच राजकीय पक्षाचे बीएलए यांना कळवायचे आहे, या दोघांनी एकत्रित बसून ती यादी पूर्ण करायची आहे ज्या मतदारांचे नाव 2002 मधील यादीमध्ये नसेल त्यांनी आपल्या आई-वडिलांचे नाव व यादीतील आ.क्रं. कळवावा आई-वडिलांचे नसेल तर आजी,आजोबा यांचे नाव व मतदार 2002 मधील यादीतील अ.क्रं. हा शासनाच्या बीएलओ तथा राजकीय पक्षाच्या बीएलए यांच्याकडे माहिती कळवून ही यादी पूर्ण करायची आहे अशी SIR यादीबद्दल माहिती उपविभागीय अधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी,तसेच सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी पुसद यांनी सर्व राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना बैठकीत माहिती देऊन सर्व नागरिकांना 2025 व 2002 मधील मतदार यादीचे पुनरावलोकन यादी करिता मदत करावी असे आवाहन नागरिकांना करण्यात आले आहे. यावेळी विविध राजकीय पक्षाचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

यामध्ये भारतीय राष्ट्रीय काँग्रेस भारतीय, जनता पार्टी, शिवसेना,राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले),वंचित बहुजन आघाडी, बहुजन मुक्ती पार्टी, एम आय एम, महाराष्ट्र नवनिर्माण सेना इत्यादी पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.

# आरोग्य शिबिरात १५५ मोतीबिंदूचे रुग्णांची तपासणी

## ५५ नागरिकांची शस्त्रक्रियावर उपचार. रत्नदीप पवार (सरपंच) यांचा उपक्रम

**जनमाध्यम प्रतिनिधी**



दारव्हा : तालुक्यातील पांढुर्णा आदर्श येथे श्री रत्नदीप यादवराव पवार यांच्या मार्गदर्शनात श्री.सत्य साई संजिवनी नेत्रालय,यवतमाळ यांच्या मदतीने डॉ.प्रकाश नंदुरकर सर,डॉ. कल्याणी जिरापुरे,सोना भगत व संजय बनकर यांनी मोफत मोतीबिंदू तपासणी शिबीर चे आयोजन करण्यात आले शिबारामध्ये एकूण १५५ रुग्णाची मोफत मोतीबिंदू तपासणी करण्यात आली आणि ५५ रुग्णांची शस्त्रक्रिया उपचार करण्यात आले आहे.

या आरोग्य शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यात ग्रामीण भागातील आरोग्य सेवेत सुलभता निर्माण करण्याच्या या मोतीबिंदू व शास्त्रक्रियावर शिबिरात ग्रामस्थांना मी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. या कार्यक्रमाचे अध्यक्षपद म्हणून श्री. दत्ताभाऊ राहणे, श्री.यादवराव पवार श्री.पंजाबरावजी जाधव,श्री.डॉ.अलोक कुशवाहा सर श्री.गजानन भाऊ गुल्हाणे,श्री.देवानंद भाऊ घोरदडे,श्री. राजुभाऊ चिरडे,श्री.संतोष राठोड, श्री. विनोद भाऊ भोयर,श्री.मोहन भाऊ ठाकरे,श्री.उत्तम भाऊ चव्हाण,श्री. पुंडलिक राठोड,श्री.ओमप्रकाश पवार, श्री.राजुनंदजी जाधव,श्री.अक्षय भाऊ जाधव,श्री.शुभम गोडबोले,श्री.बंटी भाऊ नागपुरे, सचिव श्री.पराते सर,कृषी सहाय्यक श्री.पवार सर,नर्स बावनगडे मॅम,रेणुका चौधरी,आरती नक्षणे,श्री. रोहित राठोड, श्री.गणेश जाधव,श्री गणेश राठोड,श्री.नरेश आडे, श्री. मंगेश राठोड,श्री.जगदीश पवार,श्री. निलेश जाधव,श्री.केवल पवार, श्री. सुमीत पवार, श्री.हरिश सावंत, नारायण आरु,अंकेश राठोड, आर्यन पवार,प्रफुल राठोड, रोशन तुळशिराम राठोड, छगन राठोड, करण राठोड,श्री. हरेष राठोड, आकाश पवार,श्री.तेजस जाधव,श्री.भाविक वारंगे,सुधाकर शिंदे,योगेश राठोड, यांच्या उपस्थितीत होते. या शिबिराने ग्रामीण भागातील आरोग्य सेवा सुलभ करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे असा उपक्रमाची पुनरावृत्ती अपेक्षित असल्याने बोलल्या जात आहे. ग्रामीण भागातील व इतर गावातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी करून शिबिराच्या लाभ घेतला आहे.

# ढाणकीच्या शंकरपटात ढाणकीचा 'हिरा व दहिवड यांचा जलवा' या जोडीचा थरार ; अवघ्या ६.५२ सेकंदात मारली बाजी !


**जनमाध्यम प्रतिनिधी**



ढाणकी- येथील श्री दत्त देवस्थान टेंभेश्वर नगरच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या भव्य बैलगाडी शर्यतीत (शंकरपट) ढाणकीचा 'हिरा आणि 'जलवा' या बैलजोडीने आपल्या चित्तथरारक वेगाने मैदान मारले. अत्यंत चुरशीच्या झालेल्या या स्पर्धेत अवघ्या 6,52 सेकंदात अंतर पार करून या जोडीने 'अ' गटामध्ये चौथा क्रमांक पटकावला ढाणकी येथील बैलजोडी मालक बालाजी दत्तात्रय फुलकोंडवार यांचा 'हिरा व कु भव्य अमोल पवार ' याचा जलवा या जोडीने या स्पर्धेत सर्वांचे लक्ष वेधून घेतले. मन्याळी येथील कैलास दुरकरी यांनी ही बैलजोडी पळवली. त्यांच्या अचूक नियोजनामुळे या जोडीने विक्रमी वेळेची नोंद करत 11111 रुपयांचे रोख पारितोषिक आणि पटकावले. तसेच 'ब' गटामध्ये कु. चैतन्या मनोज तोकलवाड यांनी प्रथम क्रमांक मिळवत १२,१११ रुपयांचे बक्षीस जिंकले. स्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळा मान्यवरांच्या मांदियाळीत उत्साहात पार पडला. यावेळी यात्रा कमीटीचे आध्यक्ष हिरासिंह चव्हाण ,किशोर ठाकूर, कृष्णा महाराज, रमन रावते पाटील, अतुल येरावार, सुभाष कुचेरिया, पुरुषोत्तम चिन्नावर, दत्तदिगंबर वानखेडे, बाळासाहेब शहापुरे, स्वप्निल चिकाटे शेख इरफान शेख गुलाब,, रामराव गायकवाड, उत्तमराव रावते, निसार पठाण, उमेश योगेवार, प्रवीण धोपटे व नागेश रातोळे इत्यादी मान्यवरांच्या हस्ते विजेत्यांना गौरविण्यात आले. शर्यतीदरम्यान कोणतीही अनुचित घटना घडू नये यासाठी पोलीस प्रशासनाने चोख बंदोबस्त ठेवला होता. पोलीस कर्मचारी मोहन चाटे, रवी गीते, जाधव व इतर पोलीस कर्मचाऱ्यांनी अत्यंत दक्षतेने आपले कर्तव्य बजावले. या शंकरपटाच्या यशस्वी सर्व सहकाऱ्यांनी मोलाचे सहकार्य केले. हा थरार पाहण्यासाठी परिसरातील हजारो बैलगाडी शौकीनांनी मोठी गर्दी केली होती.

# राजेंद्र बनसोड यांना केंद्र सरकारकडून प्रतिष्ठित पुरस्कार जाहीर

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ : भारत सरकारच्या गृह मंत्रालयांतर्गत महासंचालनालय नागरी सुरक्षा व गृहरक्षक दल (DG-FS, CD & HG) यांच्या वतीने गृहरक्षक दलाच्या ६३ व्या स्थापना दिनानिमित्त (६ डिसेंबर) जाहीर करण्यात आलेल्या पुरस्कारांमध्ये यवतमाळ जिल्ह्यातील गृहरक्षक दलाचे सेंटर कमांडर राजेंद्र बनसोड यांना DG-CD ब्रॉंझ डिस्क व प्रशंसा प्रमाणपत्र जाहीर करण्यात आले आहे.

हा प्रतिष्ठित पुरस्कार गृहरक्षक दलातील उत्कृष्ट कार्य, कर्तव्यनिष्ठा व समाजसेवेसाठी दिला जातो.बनसोड यांनी विविध जिल्ह्यांमध्ये केलेल्या सेवाकाळात आपत्ती व्यवस्थापन, समाजसेवा, जनजागृती तसेच नागरी सुरक्षेच्या कार्यात सक्रिय सहभाग नोंदवत महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यांच्या या उल्लेखनीय कार्याची दखल घेत केंद्र सरकारकडून हा सन्मान जाहीर करण्यात आला आहे. सदर पुरस्कार देशातील २८ राज्ये व ८ केंद्रशासित प्रदेशांतील उत्कृष्ट कार्य करणाऱ्या निवडक अधिकाऱ्यांना प्रदान करण्यात येणार असून, शासकीय समारंभात महासमादेशक तथा अपर पोलीस महासंचालक यांच्या हस्ते तो प्रदान केला जाणार आहे. पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल जिल्ह्याचे अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, प्रशासकीय अधिकारी मनोज गजभिये, जिवराज गुरनुले, निरंजन मलकापुरे तसेच गृहरक्षक दलातील पुरुष व महिला होमगार्ड यांनी श्री. बनसोड यांचे अभिनंदन करून त्यांच्या कार्याची प्रशंसा केली आहे. हा सन्मान यवतमाळ जिल्ह्याच्या गृहरक्षक दलासाठी अभिमानास्पद क्षण ठरला आहे.

# माझी हकालपट्टी कशासाठी ? : संतोष ढवळे

**जनमाध्यम प्रतिनिधी**



यवतमाळ - शिवसेनेतून आपली हकालपट्टी झाल्याची माहिती पक्षाकडून अधिकृतपणे न मिळता हितचिंतकांकडून मिळाल्याने नाराजी व्यक्त करत ज्येष्ठ शिवसेना नेते संतोष ढवळे यांनी पत्रकार परिषदेत आपली भूमिका मांडली. मला कोणत्या कारणाने व कुणाच्या आदेशाने पक्षातून काढले, याची अद्याप कोणतीही अधिकृत माहिती देण्यात आलेली नाही. त्यामुळे हकालपट्टीचे स्पष्ट कारण सांगणे हे पक्षाचे कर्तव्य असल्याचे त्यांनी सांगितले.

मी गेल्या ३५ वर्षांपासून शिवसेनेत सक्रिय असून २०१४ व २०१९ च्या विधानसभा निवडणुका लढवल्या आहेत. २०१९ मध्ये युतीमुळे भाजपला जागा गेल्यानंतर पक्षाच्या परवानगीनेच मी अपक्ष निवडणूक लढवली होती, असे त्यांनी स्पष्ट केले. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे मला ओळखतात, त्यामुळे कोणतीही कारवाई करण्यापूर्वी माझे म्हणणे ऐकले जाईल, अशी अपेक्षा होती, असेही ते म्हणाले. यवतमाळ नगरपरिषद निवडणूक २०२५ दरम्यान शिवसेना-काँग्रेस युतीबाबत आधी निर्णय झाला, मात्र एका रात्रीत ती तोडण्यात आली. यानंतर निष्ठावान शिवसैनिकांना डावलून इतरांना उमेदवारी देण्यात आल्याचा आरोप ढवळे यांनी केला. पक्षातून काढल्याने मी खचलेलो नाही. सर्वसामान्यांच्या न्यायासाठी, गरजू रुग्ण, गरीब विद्यार्थी व वंचित घटकां साठीचा माझा संघर्ष कुठेही असलो तरी सुरूच राहील, असे त्यांनी ठामपणे सांगितले.

# ‘उमेद’ पंख विश्वासाचे उपक्रमाचा शुभारंभ




## जयपुर फुट वाटपाच्या विक्रमी कार्यक्रमात दिव्यांगाची मोठी गर्दी

**अमरावती/का.प्र.**

शिक्षण महर्षी डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या १२७ व्या जयंती निमित्ताने उमेद पंख विश्वासाचे या उपक्रमास थाटात सुरुवात झाली असून विनामूल्य जयपुर फूट मिळवण्यासाठी दिव्यांग बांधव भगिनींनी आज मोठी गर्दी केली.

श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या विशेष पुढाकारातून डॉ.पंजाबराव देशमुख स्मृती वैद्यकीय महाविद्यालय, इंडियन रेड क्रॉस सोसायटी, आर्किटेक रामेश्वर मनियार, अंबादास खोब्रागडे आर्ट फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने १८ डिसेंबर पासून विनामूल्य जयपूर फूट कृत्रिम अवयव (अंगरोपण) वाटपाचा कार्यक्रम डॉ.पंजाबराव देशमुख स्मृति वैद्यकीय महाविद्यालय पंचवटी येथे आयोजित करण्यात आला आहे. कृत्रिम अवयव मिळविण्यासाठी व मोजमाप देण्यासाठी ८०० दिव्यांग बांधवांनी नोंदणी केली आहे. या उपक्रमाचे बापूसाहेब देशमुख नागरवाडी यांच्या हस्ते फित कापून उद्घाटन झाले. या उपक्रमाचा उद्घाटन सोहळा श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांच्या अध्यक्षखाली संपन्न झाला. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून आ.प्रवीण तायडे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र, संस्थेचे उपाध्यक्ष भैय्यासाहेब पाटील पुसदेकर, कोषाध्यक्ष दिलीप बाबू इंगोले, कार्यकारिणी सदस्य हेमंत काळमेघ, प्रा.सुभाषराव बनसोड प्राचार्य अंबादास कुलट, प्राचार्य अमोल महल्ले आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या कलाकार रजनी अंबादे, संदीपजी पुंडकर, प्रभुजितसिंह बच्छर, संत गाडगेबाबा धर्मशाळा ट्रस्ट दादरचे विश्वस्त प्रशांतराव देशमुख, भरतराव रेडे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुरेश आसोले, किशोर मालोकर रामेश्वर मनियार यांची प्रमुख उपस्थिती होती.

अध्यक्षीय भाषणातून हर्षवर्धन देशमुख यांनी अशा प्रकारचे उपक्रम सातत्याने राबविले जावे अशी इच्छा व्यक्त करून लोक कल्याणाची संधी मिळाली तर जेवढे देता येईल तेवढे देण्याचा प्रयत्न करावा चांगल्या योजनेसाठी आम्ही सदैव सहकार्य करत राहू असे आश्वासन दिले.

तसेच हेमंत काळमेघ यांनी हा कार्यक्रम घडवून आणण्यासाठी विशेष परिश्रम घेतले त्यामुळे ते देखील कौतुकास पात्र असल्याचे हर्षवर्धन देशमुख यांनी सांगितले.

यावेळी मुख्य कार्यपालन अधिकारी संजिता महापात्र, यांनी दिव्यांग बांधवांसाठी आयोजित केलेला हा उपक्रम अतिशय स्तुत्य उपक्रम असून या माध्यमातून मोठे सहकार्य लाभेल.

विविध शासकीय योजना देखील दिव्यांगासाठी आहेत, सामाजिक संघटना, शैक्षणिक संस्था यांच्या पुढाकारातून असे उपक्रम राबविण्यात मदत होते.

भविष्यात शासकीय योजना राबविण्यासाठी श्री शिवाजी शिक्षण संस्थेची गरज भासेल. भविष्यात संयुक्त विद्यमाने उपक्रम राबविण्यासाठी त्यांनी इच्छा व्यक्त केली.

यावेळी आ. प्रवीण तायडे यांनी देखील विचार व्यक्त केले. तसेच रजनी अंबादे, किशोर मालोकर, रामेश्वर मणियार यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अधिष्ठाता डॉ.ए.टी. देशमुख संचालन किशोर इंगळे व आभार प्रदर्शन संदीप पुंडकर यांनी केले. यावेळी पंजाबराव देशमुख अर्बन बँकेचे अध्यक्ष नरेश पाटील, आजीवन सभासद बबनराव चौधरी, डॉ.बोदडे, नरेंद्र लड्ढा, प्रवीण रघुवंशी, भैय्यासाहेब मेटकर, पद्माकर सोमवंशी, प्राचार्य डॉ.वर्षा देशमुख, प्राचार्य डॉ स्मिता देशमुख यांची उपस्थिती होती.

***सुशिला सुर्यवंशी मॅनेजमेंट इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी ॲडव्हान्समेंट येथील***

# कॅम्पस प्लेसमेंट ड्राइव्हला भरघोस प्रतिसाद; लर्निंग रूट्स प्रा.लि.मध्ये विद्यार्थ्यांची निवड

**अमरावती/का.प्र.**

सुशिला सुर्यवंशी मॅनेजमेंट इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी ॲडव्हान्समेंट (एस.एस.एम. आई.टी.ए.), अमरावती येथे चालू शैक्षणिक वर्षातील पहिली कॅम्पस प्लेसमेंट ड्राइव्ह यशस्वीरीत्या पार पडली. ही प्लेसमेंट ड्राइव्ह लर्निंग रूट्स प्रा. लि. या नामांकित संस्थेसाठी आयोजित करण्यात आली होती. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना मुंबई येथे कार्य करण्याची संधी मिळणार असून, पदव्युत्तर विद्यार्थ्यांसाठी ६.४२ लाख आणि पदवी विद्यार्थ्यांसाठी ६.०६ लाख वार्षिक पॅकेज निश्चित करण्यात आले आहे. ही उपलब्धी विद्यार्थ्यांसाठी अत्यंत गौरवास्पद व महत्त्वाची ठरली आहे.या कॅम्पस प्लेसमेंट ड्राइव्हला विद्यार्थ्यांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला.

अमरावती विद्यापीठ विभागातील विविध महाविद्यालयांतील १,००० हून अधिक विद्यार्थ्यांनी नोंदणी केली, तर ४०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष सहभाग घेतला. कंपनीचे प्रतिनिधी अभिजित सिन्हा यांनी प्रथम उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना कंपनीची कार्यपद्धती, कार्यक्षेत्र, अपेक्षित कौशल्ये तसेच करिअर संधींबाबत सविस्तर माहिती दिली. त्यानंतर गटचर्चा घेण्यात आली. या गटचर्चेमधून निवड झालेल्या विद्यार्थ्यांना पुढील टप्प्यासाठी वैयक्तिक मुलाखतीसाठी बोलावण्यात आले. या बहुपातळी निवड प्रक्रियेनंतर, सुशिला सुर्यवंशी मॅनेजमेंट इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी ॲडव्हान्समेंट येथील एम.बी.ए. द्वितीय वर्षात शिक्षण घेत असलेले निशांत उके आणि साहिल चुनारकर या विद्यार्थ्यांची अंतिम निवड करण्यात आली.या कॅम्पस निवड प्रक्रियेत वैदेही चौधरी, हार्दिक अग्रवाल, साक्षी वानखेड, श्रावणी कलंबे, श्रावणी वानखेडे आणि हितेन जैस्वाल या विद्यार्थ्यांचीही संबंधित कंपनीमध्ये यशस्वी निवड झाली आहे.






संस्थेच्या अध्यक्षा डॉ. स्मिता सूर्यवंशी यांनी सांगितले की, ‘पश्चिम विदर्भासारख्या भागातून एम.बी.ए. करणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता ठासून भरलेली आहे.या प्लेसमेंट ड्राईव्हच्या माध्यमातून त्यांना मोठ्या कॉर्पोरेट कंपन्यांची दारे उघडी करून देणे, हाच आमचा मुख्य हेतू आहे.

संस्थेचे सचिव प्रा. दिनेश सूर्यवंशी यांनी सांगितले की, ‘पश्चिम विदर्भातील कौशल्यसंपन्न विद्यार्थी विद्यार्थ्यांना रोजगाराची मोठी संधी उपलब्ध करून देणे, हाच या प्लेसमेंट ड्राईव्हचा मुख्य उद्देश आहे,’ या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे खजिनदार श्री. अभय सूर्यवंशी यांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

विद्यार्थ्यांच्या करिअर घडणीसाठी असे उपक्रम सातत्याने राबवले जातील, असे त्यांनी यावेळी नमूद केले.

याप्रसंगी प्रा. अमोल करमरकर यांनी विद्यार्थ्यांच्या क्षमतेवर विश्वास ठेवून त्यांना योग्य संधी उपलब्ध करून देणे हेच आमचे ध्येय आहे.

या यशस्वी कॅम्पस प्लेसमेंट ड्राइव्हमुळे सुशिला सुर्यवंशी मॅनेजमेंट इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी ॲपडव्हान्समेंट कॉलेजच्या गुणवत्तेची आणि कार्यक्षमतेची पुन्हा एकदा प्रचिती आली आहे.

ड्राईव्हच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. अमित देशमुख आणि प्रा. स्वप्नील तिजारे यांनी विशेष परिश्रम घेतले. त्यांनी विद्यार्थ्यांना गटचर्चा आणि वैयक्तिक मुलाखत या विषयांवर सखोल प्रशिक्षण दिले.

या मोहिमेचे सुयोग्य नियोजन आणि यशस्वी आयोजन सर्व प्राध्यापक, कर्मचारी वर्ग तसेच प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांच्या सक्रिय सहभागातून करण्यात आले. सर्वांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे हा उपक्रम संस्मरणीय ठरला.

सुशिला सुर्यवंशी मॅनेजमेंट इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी ॲडव्हान्समेंट, कॉलेज भविष्यातही विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी, गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि उज्ज्वल करिअर संधींसाठी सातत्याने प्रयत्नशील राहणार आहे.

## संक्षिप्त

### अमरावती व बडनेरा शहरातील पाणीपुरवठा मंगळवारी बंद

**अमरावती -** अमरावती पाणीपुरवठा योजनेअंतर्गत सिंभोरा हेडवर्क्स येथे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीमार्फत १३२ के.व्ही. व ३३ के.व्ही. मोर्शी सबस्टेशन येथे देखभाल व दुरुस्तीचे काम मंगळवार, २३ डिसेंबर २०२५ रोजी नियोजित करण्यात आले आहे.या कामामुळे सिंभोरा हेडवर्क्स येथील विद्युत पुरवठा व पंपिंग संपूर्ण दिवस बंद राहणार असल्याने २३ डिसेंबर रोजी अमरावती व बडनेरा शहरातील संपूर्ण दिवसाचा पाणीपुरवठा बंद राहणार आहे.तरी नागरिकांनी आवश्यकतेनुसार पाण्याचा साठा करून ठेवावा तसेच पाण्याचा काटकसरीने वापर करावा, असे आवाहन महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (मजीप्रा) मार्फत करण्यात आले आहे.

### जिल्ह्यात कलम ३७ (१) व (३) लागू

**अमरावती**-जिल्ह्यात शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी महाराष्ट्र पोलीस अधिसूचना व आदेशान्वये पोलीस आयुक्तालय परिक्षेत्र वगळून जिल्ह्यामध्ये ग्रामीण भागात महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) (३) प्रमाणे प्रतिबंधात्मक आदेश जारी केला आहे. अधिसूचना महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) नुसार शस्त्र तसेच विस्फोटकाच्या मालाची वाहतूक, जमावाचे एकत्रीकरण, बदनामीकारक वक्तव्य तसेच कलम ३७(३) नुसार कोणत्याही मानवी मेळाव्यास, मिरवणुकीस कोणत्याही ठिकाणी आयोजित करण्यास सार्वजनिक सुरक्षिततेसाठी धोका होण्याची शक्यता लक्षात घेऊन उपरोक्त नमूद कालावधीकरिता बंदी घालण्यात येत आहे.सदर प्रतिबंधात्मक आदेश जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, याकरिता पोलिस आयुक्तालयाचे परिक्षेत्र वगळून करण्यात आला असून ३० डिसेंबर २०२५ च्या मध्यरात्रीपर्यंत लागू राहील. या कलमाचा भंग करणाऱ्या व्यक्तीविरूध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे जिल्हाधिकारी येरेकर यांनी कळविले आहे.

### विद्यार्थ्यांची कुक्कुटपालन व्यवसायाला भेट

**लेहेगाव**-घोटा जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांसाठी व्यावसायिक मार्गदर्शन मिळावे या हेतूने कुक्कुटपालन व्यवसायाला क्षेत्रभेटीचे आयोजन करण्यात आले होते.जिल्हा परिषद प्राथमिक शाळा घोटा येथे क्षेत्रभेटीचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांना व्यावसायिक मार्गदर्शन मिळण्याकरिता कुक्कुटपालन व्यवसायाला भेट देण्यात आली यात्रसंगी विद्यार्थ्यांनी कुक्कुटपालन व्यवसाय संबंधी अनेक प्रश्न विचारले श्रीधरराव इंगोले यांनी विद्यार्थ्यांना कुक्कुटपालन व्यवसायसंबंधी सविस्तर माहिती दिली विद्यार्थ्यांनी कुक्कुटपालन हा व्यवसाय लक्षपूर्वक पाहून तो व्यवसाय कशा प्रकारे केला जातो हे समजावून घेतले त्यामुळे त्यांना बालवयातच व्यावसायिक शिक्षणाचे धडे मिळाले क्षेत्रभेट यशस्वी होण्याकरिता शाळेचे मुख्याध्यापक सुरेश ठाकूर व सहाय्यक शिक्षिका रत्ना शेगोकर तसेच पालक हरिचंद्र महिंगे यांनी परिश्रम घेतले.



### कावलीत चालतो दोन दिवस अखंड भजनाची मांड



**धामणगाव रेल्वे -** तालुक्यातील कावली येथील श्री समर्थ योगेश्वर महाराज संस्थान तनाची झोपडी येथे मार्गशीर्ष त्रयोदशी निमित्य दोन दिवस अखंड भजनाची मांड सुरू राहणार असून गुरुवारी दुपारी महाप्रसाद आयोजित केला आहे.कावली येथे अवधूत महाराज यांचे जागृत मंदिर म्हणजे श्री समर्थ योगेश्वर महाराज संस्थान तनाची झोपडी आहे येथे दरवर्षी विविध कार्यक्रम साजरे करण्यात येते यंदा मार्गशीर्ष महिना निमित्त बुधवार ला पहाटेच्या चौघड्यापासून अवधूत भजनाची मांड बसवून जागरण सुरू झाले आहे दुपारी बारा वाजेपर्यंत हा ४८ तास अखंड भजनाचा कार्यक्रम सुरू राहणार आहे त्याच्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे या कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन संस्थांनचे प्रमुख माधव शेंडे यांनी केले आहे.

## न.प.चे माजी उपाध्यक्ष विष्णू रामसहाय उपाध्याय यांचे निधन

**अचलपूर/वार्ताहर**

अचलपूर नगर परिषदेचे माजी उपाध्यक्ष विष्णु रामसहाय उपाध्याय यांचे १७ डिसेंबर रोजी निधन झाले. त्यांची अंतिम यात्रा आज गुरुवार १८ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी ३ वाजता केशवानंद नगर, गुलाब बागच्या मागे, अचलपूर रोड, परतवाडा येथील निवासस्थानावरून निघाली. ते आपल्या पश्चात सुरेश, हरिओम, मुरारी, अशोक, मनोज, संतोष, महेंद्र यांच्यासह बराच मोठा आप्त परिवार सोडून गेले आहे. त्यांचा निधनाने शोक संवेदना व्यक्त केल्या जात आहे.हसमुख, प्रेमळ, मन मिळावू व्यक्तिमत्त्व म्हणून विष्णू उपाध्याय संपूर्ण जुळ्या शहरात परिचित होते .सामाजिक व धार्मिक कार्यात सुद्धा विष्णू उपाध्याय हे नेहमी अग्रेसर राहत होते. त्यांच्या निधनाने जुळ्या शहरात शोककळा पसरली आहे.



## श्रीक्षेत्र कोंडेश्वर संस्थानचा तीर्थक्षेत्र विकासनिधी बेपत्ता

**अंजनगाव बारी/वार्ताहर**


विदर्भातील प्रसिद्ध शिवमंदीर असलेले प्रसिद्ध तिर्थक्षेत्र कोंडेश्वर संस्थानाच्या विकास कामांकरिता महाराष्ट्र शासनामार्फत २५ कोटी रुपये एवढा निधी उपलब्ध करून देण्यात आला. या रकमेमध्ये संस्थानच्या सभागृहाचे बांधकाम, ठिकठीकाणी सिमेंट रोड, सौदर्यीकरण, पार्कींग व्यवस्था, दुकाने इ. कामे करण्यात आली. मात्र भाविकांनी प्रमुख प्राधान्य दिलेला अंजनगाव बारी - कोंडेश्वर डांबरीकरण, गैबीपीर तलावाचे सौंदर्यीकरण, पथदिवे बांधकामाचे दृष्टीने अनिवार्य असलेल्या या कामाला सुरूवातही झाली नाही. तेंव्हा संस्थानच्या परिसरातील किरकोळ कामे आटोपून विकास निधी मध्येच बेपत्ता झाला की काय ? असा खडतर सवाल परिसरातील नागरीक करित आहे.

वास्तविक पाहता हा तिर्थक्षेत्र विकास निधी केवळ ४० टक्के कामाकरिता वापरात आला असुन अद्यापही ६० टक्के विकास कामे रखडली आहेत.अंजनगाव बारी - कोंडेश्वर मार्ग गेल्याकित्येक वर्षापासुन नूतनीकरणाच्या प्रतिक्षेत आहे, या मार्गावर मोठाले खड्डे पडले असुन पायी चालणाऱ्यांना सुध्दा याचा त्रास होतो. या मार्गावर हनुमान मंदीर, गैबी शाह बाबा दर्गा, तलाव, रानामाता टेकडी इत्यादी प्रेक्षणीय ठीकाणे असुन या भागाचा विकास होणे हाच या निधीमागील खरा हेतु होता.गेल्या ३ महाशिवरात्री उत्सवापासुन भाषिक अंजनगाव बारी - कोंडेश्चर मार्ग सौंदर्यीकरणाचे प्रतिक्षेत आहे. उर्वरित निधीला मार्गी लावुन येणाऱ्या महाशिवरात्री पर्यंत तरी हि कामे होणार का? असा प्रश्न आता व जनतेने शासण -दरबारी उपस्थित केला आहे. संबधीत लोकप्रतिनिधी, आमदार आजपर्यंत या कामांकडे दुर्लक्ष करित डोळेझाक करित होते. मात्र जिल्हा परिषद निवडणुका तोंडावर आल्याने आतातरी यांना जाग येणार याकडे जनतेच्या नजरा लागल्या आहे.

अंजनगाव बारी - कोंडेश्वर मार्गाचे नुतनीकरण, गैबीशाह बाबा तलावाचे सादरीकरण, पथदिवे इत्यादी सुविधा या मार्गालगत झाल्यास या ठीकाणी येणाऱ्या शाळाकरी विद्यार्थ्यांच्या सहली, हिंदू-मुस्लिम पर्यटक यांना उत्तम सुविधा उपलब्ध होऊन तिर्थक्षेत्र कोंडेश्वर संस्थानला अधिक महत्व प्राप्त होणार हे तेवढेच खरे.

# शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयात आज आंतरराष्ट्रीय एआय परिषद

### १९ डिसेंबर रोजी उद्घाटन समारंभ



**अमरावती/का.प्र.**

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती येथे ICAIISD’2025 – International Conference on AI Innovations for Societal Development या दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन १९ व २० डिसेंबर २०२५ रोजी करण्यात आले आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence) या वेगाने विकसित होत असलेल्या क्षेत्रातील संशोधन, नवोन्मेष आणि समाजोपयोगी तंत्रज्ञानाचा सखोल आढावा घेणे हा या परिषदेचा मुख्य उद्देश आहे. परिषदेचा उद्घाटन समारंभ शुक्रवार, १९ डिसेंबर रोजी सकाळी ९.०० वाजता होणार असून देश-विदेशातील नामवंत शास्त्रज्ञ, संशोधक, शिक्षणतज्ज्ञ, उद्योग प्रतिनिधी, प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत.

उद्घाटन समारंभाच्या अध्यक्षस्थानी डॉ. सचिन मांडवगणे, अध्यक्ष – नियामक मंडळ, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती तसेच प्राध्यापक, केमिकल इंजिनिअरिंग विभाग, व्हीएनआयटी नागपूर हे उपस्थित राहणार आहेत. प्रमुख अतिथी म्हणून डॉ. फणिंद्र कुमार यलवर्थी, प्राध्यापक, सीडीएस विभाग, इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, बंगळुरू यांची उपस्थिती लाभणार असून ते एआय संशोधनातील जागतिक प्रवाह व भविष्यातील दिशा यावर मार्गदर्शन करणार आहेत. प्रमुख पाहुण्यांमध्ये समीर सावरकर, सहसंस्थापक व मुख्य कार्यकारी अधिकारी, न्यूरोसिनॅप्टिक कम्युनिकेशन प्रा. लि., बंगळुरू, डॉ. निरंजन जोशी, प्रोग्राम लीड, सी-कॅम्प, बंगळुरू, डॉ. रविंद्र केसकर, अध्यक्ष – एसीएम नागपूर प्रोफेशनल चॅप्टर तसेच सहयोगी प्राध्यापक, संगणक अभियांत्रिकी विभाग, व्हीएनआयटी नागपूर आणि माननीय विभागीय सहसंचालक, तंत्रशिक्षण विभाग, अमरावती विभाग, महाराष्ट्र शासन यांचा समावेश आहे. विविध शैक्षणिक संस्था, संशोधन केंद्रे आणि उद्योग क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीमुळे परिषदेला व्यापक व बहुआयामी स्वरूप प्राप्त होणार आहे.

या आंतरराष्ट्रीय परिषदेच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालयाच्या आयोजन समितीने विशेष नियोजन केले आहे.

परिषदेचे जनरल चेअर म्हणून प्राचार्य डॉ. आशिष महल्ले, प्राचार्य, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती हे नेतृत्व करत आहेत. कॉन्फरन्स चेअर म्हणून डॉ. राजेश मेटकर, अधिष्ठाता – संशोधन व विकास विभाग, तर ऑर्गनायझिंग चेअर म्हणून डॉ. शंतनु लोही आणि डॉ. अंजना घुले हे कार्यरत आहेत. प्रा. रवी मांटे हे मुख्य सहसमन्वयक म्हणून जबाबदारी सांभाळत असून, परिषदेच्या यशासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक, अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे सक्रिय सहकार्य लाभत आहे.

# मतमोजणीच्या पार्श्वभूमीवर पोलीस आयुक्त व महापालिका आयुक्तांनी केली मतगणना केंद्रांची पाहणी

**अमरावती/का.प्र.**

आगामी मतमोजणी प्रक्रिया शांततेत, पारदर्शक व सुरळीतपणे पार पडावी, त्याच अनुषंगाने अमरावती पोलिस आयुक्त राकेश ओला व अमरावती महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी शहरातील महत्त्वाच्या मतगणना केंद्रांची सविस्तर पाहणी केली. या पाहणीमध्ये मतगणना स्पोर्ट कॉम्प्लेक्स, सांस्कृतिक भवन व नविन तहसिल कार्यालय या ठिकाणांचा समावेश होता.



या पाहणीदरम्यान दोन्ही आयुक्तांनी मतमोजणीसाठी उभारण्यात आलेल्या पायाभूत सुविधांची तपासणी केली. मतगणना केंद्रात प्रवेश व निर्गमनासाठी स्वतंत्र मार्ग, उमेदवारांचे प्रतिनिधी, माध्यम प्रतिनिधी तसेच निवडणूक कर्मचारी यांच्यासाठी करण्यात आलेली व्यवस्था तपासण्यात आली. कोणत्याही प्रकारचा गोंधळ किंवा गैरप्रकार होऊ नये, यासाठी सुरक्षा व्यवस्थेचा विशेष आढावा घेण्यात आला.

पोलीस आयुक्त राकेश ओला यांनी मतगणना केंद्र परिसरात कडेकोट बंदोबस्त ठेवण्याच्या सूचना दिल्या. सीसीटीव्ही कॅमेरे, मेटल डिटेक्टर, अतिरिक्त पोलिस फौजफाटा, दंगा नियंत्रण पथक तसेच त्वरित प्रतिसाद देणाऱ्या पथकांची तैनाती करण्याबाबत त्यांनी स्पष्ट निर्देश दिले. कायदा व सुव्यवस्था राखणे ही प्रशासनाची सर्वोच्च जबाबदारी असून कोणतीही अनुचित घटना खपवून घेतली जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक यांनी मतगणना केंद्रांवरील मूलभूत सोयी-सुविधांवर भर दिला. वीजपुरवठा, पाणी, स्वच्छता, अग्निसुरक्षा यंत्रणा, वैद्यकीय मदत तसेच आपत्कालीन परिस्थितीत तात्काळ उपाययोजना करण्याची तयारी ठेवण्याच्या सूचना त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. मतगणना प्रक्रियेत सहभागी होणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना कोणत्याही अडचणी येऊ नयेत, यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, असे त्यांनी सांगितले.

या पाहणीप्रसंगी निवडणूक विभागाचे अधिकारी, महानगरपालिकेचे वरिष्ठ अधिकारी तसेच संबंधित विभागांचे प्रमुख उपस्थित होते. सर्व अधिकाऱ्यांनी आपापल्या जबाबदाऱ्या काटेकोरपणे पार पाडाव्यात आणि मतगणना प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत सतर्क राहावे, अशा सूचना देण्यात आल्या. प्रशासनाकडून मतगणनेसाठी सर्व तयारी अंतिम टप्प्यात असून नागरिकांनीही शांतता व सहकार्य राखावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले. मतमोजणीच्या दिवशी कोणतीही अडचण निर्माण होऊ नये, यासाठी पोलिस व महानगरपालिका यंत्रणा पूर्णतः सज्ज असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले. या पाहणी दरम्यान अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त योगेश पिठे, पोलीस अधिकारी व मनपा अधिकारी उपस्थित होते.

# 'वोटर सर्च अँप' द्वारे नाव शोधण्याचे आवाहन

**अमरावती/वार्ताहर**

आगामी १५ जानेवारी २०२६ रोजी होऊ घातलेल्या अमरावती महानगर पालिका निवडणुकीच्या अनुषंगाने मनपाच्या वतीने मुळ प्रारूप मतदार यादी-२०२५ ही मतदार सुची जारी केली आहे. येत्या २७ डिसेंबर रोजी मतदार केंद्र निहाय मतदार यादी प्रसिद्ध होणार आहे.त्यामुळे मतदारांना मतदार यादीत नाव शोधण्याची सुविधा व्हावी म्हणून राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र ने 'मताधिकार वोटर सर्च अँप' तयार करण्यात आले आहे. शहरातील मतदारांनी आपले नाव शोधण्यासाठी सदरचे अँप डाऊनलोड करून मतदार यादीत नाव शोधण्याचे आवाहन आमदार सुलभा खोडके यांनी केले आहे.




अमरावती महानगर पालिका निवडणूक २०२५-२०२६ च्या अनुषंगाने महापालिकेने मूळ प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध केली. ज्यामध्ये सर्व २२ प्रभागातील मतदारांचा समावेश आहे. येत्या २७ डिसेंबर ला मनपाची प्रभागनिहाय व मतदान केंद्र निहाय सुधारित मतदार यादी प्रसिद्ध होणार आहे. त्यामुळे मतदारांना आपले नाव कोणत्या प्रभागात व मतदान केंद्रांवर आहे, हे तपासण्याची व शोधण्याची सुविधा व्हावी, याकरिता राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्रने मताधिकार वोटर सर्च अँप तयार केले असून https://play.google.com/store/apps/details?id=com.stateelectio n2&pcampaignid=web_share या लिंकवर क्लिक केल्यास आपल्याला मतदाराचे संपूर्ण नाव किंवा मतदार ओळखपत्राचा (EPIC) क्रमांक नमूद करुन मतदार यादीतील नाव शोधता येईल. त्यानंतर महानगरपालिकेच्या नावाची निवड केल्यानंतर आपले नाव दिसेल. याच ॲपच्या माध्यमातून आपले मतदान केंद्राचे ठिकाणही कळू शकेल. शहरातील मतदारांनी आपले नाव शोधण्यासाठी सदरचे अँप डाऊनलोड करून मतदार यादीत नाव शोधण्याचे आवाहन आमदार सुलभा खोडके यांनी केले आहे.

# महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण

**अमरावती/का.प्र.**

महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ ची अधिकृत घोषणा करण्यात आली असून १५ डिसेंबर २०२५ पासून आदर्श आचारसंहिता तात्काळ प्रभावाने लागू करण्यात आली आहे. निवडणूक प्रक्रिया पारदर्शक, मुक्त, निष्पक्ष व कायदेशीर पद्धतीने पार पाडण्यासाठी प्रशासनाने तयारीला वेग दिला असून त्या अनुषंगाने निवडणूक अधिकाऱ्यांचे सविस्तर प्रशिक्षण आयोजित करण्यात आले.



अमरावती महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ करिता नियुक्त करण्यात आलेले निवडणूक निर्णय अधिकारी, सहाय्यक निवडणूक अधिकारी १, २, ३ तसेच क्षेत्रीय अधिकारी यांचे निवडणुकीसंदर्भातील प्रशिक्षण १८ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृह, अमरावती महानगरपालिका येथे पार पडले.हे प्रशिक्षण अमरावती महानगरपालिका आयुक्त तथा निवडणूक अधिकारी सौम्या शर्मा चांडक यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आले. प्रशिक्षण सत्रात निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (महसूल) विवेक जाधव व उपजिल्हाधिकारी निवडणूक शिवाजी शिंदे यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना सखोल व मुद्देसूद मार्गदर्शन केले. त्यांनी निवडणूक प्रक्रियेतील कायदेशीर तरतुदी, आदर्श आचारसंहितेची काटेकोर अंमलबजावणी, निवडणूक कार्यक्रमाची अंमलबजावणी, नामनिर्देशन पत्राची छाननी, प्रचार काळातील नियम, अपात्रतेचे निकष, उमेदवारी मागे घेणे, चिन्ह वाटप, मतपत्रिका छपाई, मतदान यंत्र तयार करणे, मतदान कर्मचारी नियुक्ती व प्रशिक्षण, साहित्य वाटप, प्रत्यक्ष मतदान, मतदान प्रक्रिया, मतमोजणी तसेच आचारसंहिता भंग झाल्यास करावयाची कार्यवाही याबाबत सविस्तर माहिती दिली.यावेळी आयुक्त तथा निवडणूक अधिकारी सौम्या शर्मा चांडक यांनी निवडणूक काळात सर्व अधिकाऱ्यांनी संवेदनशीलता, तत्परता व निष्पक्षता राखून काम करावे, असे निर्देश दिले. निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोर पालन करून कोणतीही त्रुटी राहू नये, यासाठी प्रत्येक अधिकाऱ्याने आपली जबाबदारी ओळखून कार्य करावे, असे त्यांनी स्पष्ट केले. प्रशिक्षणामुळे निवडणूक प्रक्रियेसंदर्भातील शंका दूर होऊन अधिकाऱ्यांमध्ये आत्मविश्वास निर्माण होईल तसेच आगामी महानगरपालिका निवडणूक प्रक्रिया सुरळीत व पारदर्शकपणे पार पडण्यास मदत होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.यावेळी अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त योगेश पिठे, उपायुक्त नरेंद्र वानखडे उपस्थित होते.

# मतदारांना देव दर्शनयात्रा;निवडणुकीचा नवीन ट्रेंड

**अमरावती/का.प्र.**

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीचा निर्णय लांबत चालल्याने इच्छुक उमेदवारांचे खर्च करून अक्षरशः कंबरडे मोडायला लागल्याने अनेकांचे लक्ष कधी निवडणूक लागणार, याकडे लागले आहे. परंतु, अमाप पैसा आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम असलेल्या मात्र उमेदवारांकडून कितीही दिवस निवडणुका लांबल्या तरी त्यांनी खर्चाची कसलीही तमा न बाळगता नवीन शक्कल लढवत निवडणुकीचा नवीन ट्रेंड समोर आणला आहे. वेगवेगळ्या गटानुसार लोकांना दर्शनयात्रा घडविण्याचा फंडा सुरू आहे. यामुळे जिल्हा परिषद मतदारसंघातील मतदारांची दर्शनयात्रा जोरात सुरू आहे.



इच्छुक उमेदवारांनी काढलेल्या दर्शनयात्रेला झेडपीच्या गटातील मतदारांचा मोठ प्रतिसाद मिळत आहे.

जिल्हा परिषद आणि पंचायत समितीची निवडणूक लढविण्याची तीव्र इच्छा असलेल्या उमेदवारांकडून गटातील महिलांसह पुरुषांना वेगवेगळ्या दर्शनवारील नेत आहेत. यामध्ये शेगाव, शिर्डी, नाशिक, त्र्यंबकेश्वर तसेच येथील व येथील तुळजापूर तुळजाभवानी कोल्हापूर अंबादेवी व वणीच्या सप्तश्रृंगी देवी दर्शनयात्रेसह नागरिकांची तीर्थक्षेत्र दर्शन यात्रा सर्वांसाठी सुरू आहे. गटातील गावचे मतदार निवडणुका जाहीर होण्यापूर्वीच दर्शन यात्रा करीत आहेत. जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या गटातील नागरिकांची दर्शनयात्रा सुरू असल्याने एकंदरीत निवडणुकीचे वातावरण सध्या तरी दर्शनयात्रेचे दिसत आहे. निवडणुका कधी लागणार, याकडे इच्छुकांचे लक्ष लागले आहे.

वेगवेगळ्या ठिकाणी देवदर्शनासाठी मतदारांना पाठविण्यासाठी सर्वच इच्छुक उमेदवारांनी ट्रेनचा पर्याय निवडला असून, लालपरीने महिलांना अर्ध्या तिकिटात प्रवास करता येतो.इच्छुकांना आर्थिक भारही कमी पडतो. जिल्हा परिषदेच्या आगामी निवडणुकीत मतदारांना आपल्याकडे आकर्षित करण्यासाठी हे सर्व पर्याय इच्छुक उमेदवार अवलंबत आहेत. आता निवडणूक लागल्यास अनेक इच्छुकांना सोयीचे वाटत आहे.निवडणुका एप्रिल व मे महिन्यात ३ गेल्या तर खर्च कितपत करावा, याची चिंता त्यांना लागली आहे. त्यामुळे अनेक इच्छुकांना वाटतेय निवडणुका जाहीर व्हाव्यात. यावेळेस आयोगाद्वारा जि.प. निवडणुकीची तयारी केली, मात्र निवडणूक अद्याप लावलेली नाही.

## निवडणुकीसाठी वंचित बहुजन आघाडीच्या

# शनिवारी नगरसेवक उमेदवारांच्या मुलाखती


**अमरावती/का.प्र.**

अमरावती आगामी महानगरपालिका निवड-णुकीच्या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीने संघटनात्मक हालचालींना वेग दिला असून उमेदवार निवड प्रक्रियेसह पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांसाठी महत्त्वाच्या सूचना जारी करण्यात आल्या आहेत. पक्षाच्या अधिकृत प्रक्रियेबाहेर कोणतीही उमेदवारी जाहीर करू नये, असा स्पष्ट इशारा देत शिस्तबद्ध पद्धतीने निवडणूक तयारी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

वंचित बहुजन आघाडीच्या वतीने कळविण्यात आले आहे की, शनिवार २० डिसेंबर २०२५ रोजी दुपारी १ वाजता अमरावती येथील रामनगर, प्रशांतनगर बगीचा जवळ असलेल्या राहुल मेश्राम यांच्या जनसंपर्क कार्यालयात महानगरपालिका निवडणुकीसाठी नगर-सेवक पदाच्या इच्छुक उमेदवारांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेतल्या जाणार आहेत. याच वेळी पक्षाची उमेदवारी मिळविण्यासाठी आवश्यक अर्ज भरून घेण्यात येणार आहेत.




या मुलाखतीनंतर संपूर्ण माहिती प्रदेश पातळीवर सादर करण्यात येणार असून, राष्ट्रीय अध्यक्ष बाळासाहेब आंबेडकर यांच्या आदेशानुसार पक्षाचे अधिकृत उमेदवार निश्चित करून त्यांची यादी जाहीर करण्यात येणार आहे. त्यामुळे या प्रक्रियेपूर्वी किंवा तिच्या बाहेर कोणत्याही व्यक्तीने स्वतःची उमेदवारी परस्पर घोषित करू नये, अशी सक्त सूचना पक्षाने दिली आहे.



दरम्यान, मनपा निवडणुकीच्या अनुषंगाने संघट-नात्मक समन्वय अधिक मजबूत करण्यासाठी अमरावतीतील प्रशांतनगर येथील वंचित बहुजन आघाडीच्या जनसंपर्क कार्यालयात शहर कार्यकारिणीतील सर्व पदाधिकाऱ्यांची अत्यंत महत्त्वांची बैठक आयोजित करण्यात आली होती. अशी निवडणुकीची माहिती प्रदेश उपाध्यक्ष व अमरावती जिल्हा निरीक्षक प्राचार्य डॉ. धैर्यवर्धन पुंडकर यांच्या मार्गदर्शनाखाली जाहीर करण्यात आली असून, पक्षाच्या वतीने जिल्हाध्यक्ष राहुल मेश्राम यांनी अधिकृतरीत्या प्रसिद्ध केली आहे.

महानगरपालिका निवडणुकीत वंचित बहुजेन आघाडी सक्षम, शिस्तबद्ध आणि लोकाभिमुख उमेदवार मैदानात उतरविण्याच्या तयारीत असून, पक्षाच्या अधिकृत प्रक्रियेचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि इच्छुक उमेदवारांना करण्यात आले आहे.

## संत गाडगे बाबा यांच्या पुण्यतिथीनिमित्त

# संत गाडगे बाबा आजच्या सामाजिक कार्यकर्त्यांसाठी एक आदर्श

**गोपाला गोपाला**
**देवकीनंदन गोपाला...**
**कीर्तनातूनही समाजप्रबोधन**
**केले हे जनमनाला..**
**स्वच्छतेचा संदेश देऊन**
**रक्षिले आरोग्याला..**
**सलाम आमचा या**
**अद्वितीय**
**समाजसुधारकाला...**

संत गाडगेबाबा हे संत किंवा साधू नसून ते खरे समाजशिक्षक होते. त्यांच्या आचारातून विचारातून आणि कृती मधून त्यांनी तमाम मानव जातीला आत्मोद्धाराचा आणि आत्मसन्मानाचा संदेश दिला. अनेक लेखकांनी त्यांना चालते बोलते विद्यापीठ असेही संबोधले होते. तसेच आचार्य अत्रे यांनी सुद्धा त्यांना समाजवादाचे चालते बोलते व्यासपीठ म्हणूनही संबोधले होते. हे चालते बोलते विद्यापीठ अनेक गावांमधून फिरुन त्यांनी मानवी स्वभावांचा आणि मानवी प्रवृत्तींचा अभ्यास केला. सर्वस्वाचा त्याग करून त्यांनी लोकांमध्ये राहून स्वतःचा उद्धार स्वतः कसा करावा याबाबत क्रांतिकारक संदेश दिला तो म्हणजे गाडगेबाबांनी. गाडगे बाबा महाराष्ट्र राज्यातील एक कीर्तनकार संत आणि समाज सुधारक होते. संत गाडगेबाबा हे वैज्ञानिक दृष्टिकोन असलेले समाज सुधारक होते. आपल्या कीर्तनातून त्यांनी समाजातील दांभिकपणा रुढी परंपरा यावर ते टीका करीत. ते सामाजिक न्याय देण्यासाठी विविध गावांमध्ये भटकत असत. गाडगे महाराजांची सामाजिक न्याय सुधारणा आणि स्वच्छता यावर जास्त विश्वास. विसाव्या शतकातील समाज सुधार आंदोलनामध्ये ज्या महापुरुषांचा सहभाग आहे त्यापैकी एक अतिशय महत्त्वाचे नाव म्हणजे संत गाडगेबाबा. गाडगे महाराज हे गोरगरीब दिन दलित यांच्यामधील अज्ञान अंधश्रद्धा अस्वच्छता याचे उच्चाटन करण्यासाठी कार्य करणारे समाज सुधारक होते. तसेच दीनदुबळे अनाथ अपंगाची सेवा करणारे थोर संत म्हणजे गाडगेबाबा. देवळात जाऊ नका, मूर्ती पूजा करू नका, सावकाराचे कर्ज काढू नका, अडाणी राहू नका, पोथी पुराने मंत्र तंत्र चमत्कार असलेल्या गोष्टीवर विश्वास ठेवू नका, माणसात देव शोधा. रंजल्या गांजल्या अनाथ लोकांसाठी महाराष्ट्रात त्यांनी ठीक ठिकाणी धर्मशाळा, अनाथालय, आश्रम विद्यालय सुरू केली. समाजातील ज्ञान अंधश्रद्धा भोळ्या समजुती अनिष्ट रूढी परंपरा दूर करण्यासाठी त्यांनी आपले पूर्ण आयुष्य वेचले. यासाठी त्यांनी कीर्तनाच्या मार्गाचा अवलंब केला. आपल्या कीर्तनात ते शोधण्यात विविध प्रश्न विचारून त्यांना त्यांच्या अज्ञानाची दुर्गुण व दोषांची जाणीव करून देत असत. त्यांचे उपदेशही साधे सोपे असत. व्यसनाच्या आहारी जाऊ नका, देवधर्माच्या नावाखाली प्राण्यांची हत्या करू नका, चोरी करू नका, सावकाराकडून कर्ज काढू नका, जातीभेद अस्पृश्यता पाहू नका असे ते आपल्या कीर्तनातून सांगत असत. गाडगे बाबा स्वतः फाटके कपडे घालत साधी वेशभूषा ठेवत ते वैभव थाटमाट श्रीमंती यापासून दूर राहिले. त्यांच्यामध्ये माणसांच्या कपड्याने नव्हे विचाराने त्यांचे मोठेपण ठरतं. त्यांनी अनावश्यक खर्च उधळपट्टी, दिखाऊपणा यांचा विरोध केला आणि साधेपणात समाधान मानलं. त्यांचे प्रेरणादायी विचार म्हणजे स्वच्छते शिवाय देव सापडत नाही, अंधश्रद्धा दूर करा ,विज्ञान स्वीकारा , श्रमाला प्रतिष्ठा द्या ,सर्व माणसे समान आहेत, देवाची पूजा करायची असेल तर माणसांची सेवा करा म्हणजेच मानवसेवा हाच खरा धर्म यावर त्यांचे विचार अतिशय ठाम होते. संत गाडगेबाबा संत तुकाराम महाराजांना आपले गुरु मानत असत. परंतु ते मी कोणाचाही गुरु नाही , मला कोणी शिष्य नाही असे ते कायम म्हणत. डेबुजी चे लग्न लहानपणी झाले होते. त्यांना चार मुली होत्या पण ते संसारात फारसे रमले नाहीत. घरदार सोडून अवघ्या समाजाचा संसार सुधारण्यासाठी ते घराबाहेर पडले. १ फेब्रुवारी १९०५ रोजी त्यांनी घराचा त्याग करून संन्यास स्वीकारला. गाडगेबाबांचे कार्य खूप मोठे अतुलनीय असे योगदान त्यांचे आहे. त्यांनी नाशिक ,देहू , आळंदी व पंढरपूर येथे धार्मिक क्षेत्रांच्या ठिकाणी धर्मशाळा बांधल्या. गोरगरीब जनतेसाठी छोटे-मोठे रुग्णालय बांधली. अनेक नद्याकाठी घाट बांधले. अतिशय गरीब अनाथ व अपंग लोकांसाठी अन्नछत्रांची व्यवस्था केली. कुष्ठरोगांची सेवा केली. महाराष्ट्राचे संत परंपरेबाबत ज्ञानदेवी रचिला पाया तुका झालासे कळस असे म्हटले जाते . संत गाडगेबाबांच्या कार्यामुळे याबाबत धर्माच्या कळसावर गाडगेबाबांनी विसाव्या शतकामध्ये कर्मयोगाची पूजा चढवली असे म्हटले जाते. लोकसेवेच्या या धकाधकीच्या प्रवाहात असताना त्यांचे अमरावती जवळ वलगाव येथे पेढि नदीच्या पुलाजवळ २० डिसेंबर १९५६ रोजी देहावसान झाले.'गोपाला गोपाला देविका नंदन गोपाला' या भजनाचा प्रसार करणाऱ्या कर्मयोगावर दृढ श्रद्धा असणाऱ्या सतपुरुषाची आणि कर्त्या समाज सुधारकाची समाधी अमरावती येथे आहे. अमरावती विद्यापीठाला संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ असे नाव दिलेले आहे.



संत गाडगेबाबांचा दशसूत्री संदेश भुकेलेल्यांना- अन्न

तहानल्यांना- पाणी

उघड्यानागड्यांना --वस्त्र

गरीब मुला-मुलींना --शिक्षणासाठी मदत

बेघरांना --आसरा

अंध अपंग पंगू रोगी यांना --औषध उपचार

बेकारांना-- रोजगार

पशुपक्षी मुख्य प्राण्यांना ---अभय

गरीब तरुण-तरुणीचे --लग्न

दुःखी व निराशांना --हिम्मत

गोरगरिबांना --- शिक्षण

हाच आजचा रोकडा धर्म आहे आणि हीच खरी भक्ती व देव पूजा आहे असे ते नेहमी म्हणत.

गाडगेबाबा व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे सुद्धा संबंध म्हणजे दोघेही एकमेकांचे पूरक कार्य करणारे महापुरुष होते. त्यांचे संबंध परस्पर आधार समान विचारसरणी आणि समाजासाठी झपाटलेपणाने घटनेवर आधारित होते.आजही त्यांचे विचार आणि कार्य समाजासाठी प्रेरणादायक आहे. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी गाडगेबाबांना सामाजिक क्रांतीचे यंत्र असेही संबोधले होते. दोघांचे विचारांमध्ये धर्म म्हणजे सेवा हीच संकल्पना होती.गाडगेबाबांनी लोकांना शिकाल तर टीकाल हा शिक्षणाचा आग्रह धरला होता. संत गाडगे बाबा आणि कर्मवीर भाऊराव पाटील हे दोघेही वेगळ्या मार्गाने एकाद्यासाठी लढणारे थोर समाज सुधारक होते.समता शिक्षण सेवा आणि स्वावलंबन यांच्यासहसंबंधात प्रेरणा परस्पर सन्मान आणि राष्ट्रहिताचा ध्यास दिसून येतो. तसेच गाडगेबाबा व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे सुद्धा संबंध अतिशय जिव्हाळ्याचे होते.गाडगे बाबा म्हणजे चालता बोलता धर्म आहे त्यांनी समाजसेवेच्या माध्यमातून खऱ्या धर्माचा रुप दाखवलेल आहे हे तुकडोजी महाराजांनी त्यांच्या एका भाषणात गाडगेबाबांविषयी बोलताना व्यक्त केले होते. गाडगेबाबा आणि संत तुकडोजी महाराज यांचे संबंध आहे किंवा व्यक्तिगत स्नेहाचे नव्हते तर एका उच्चतम सामाजिक ध्येयासाठी एकत्र झगडणार्या दोन महामानवांचे होते . त्यांच्या कार्यातून सदाचार, सेवा, श्रम आणि जागरूकता या मूल्यांची बीज आजही समाजात रुजलेली आहेत. दोघांचाही वारसा आजच्या सामाजिक कार्यकर्त्यांसाठी एक आदर्श आहे.गाडगेबाबांसाठी व्यसन हे केवळ वैयक्तिक दोष नव्हते सामाजिक विष होते. त्यांनी व्यसनमुक्तीचा संदेश देण्यासाठी तर जीवनामध्ये संपूर्ण संयम पाळला आणि इतरांना मार्गदर्शन केले. आजही महाराष्ट्रातल्या अनेक गावांमध्ये गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान, व्यसनमुक्ती चळवळी, जनजागृती मोहिमा यांचा आधार गाडगेबाबांचे विचारच आहे.

ग्राम स्वच्छतेसाठी घेतला
हाती झाडू
समाज प्रबोधनासाठी,
अंधश्रद्धा निर्मूलनासाठी
गावोगावी किर्तन करती
धर्मशाळा व रुग्णालय
उभारली सदावर्ती
कर्मयोगी ध्वजा उभारली
भूवरती

**अर्चना व्हाडपांडे**
सहा. शिक्षिका ,
श्री गणेशदास राठी
विद्यालय , अमरावती

■ शुक्रवार, १९ डिसेंबर २०२५
paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवच

अकोला
जिल्हा विशेष

# 'आप' लढणार स्वबळावर : सर्व प्रभागात उभे करणार उमेदवार

## दिल्ली व पंजाब मॉडेल अकोल्यात आणून भ्रष्टाचारमुक्त प्रशासनाची ग्वाही



■ प्रतिनिधी | अकोला ■

आगामी अकोला महानगरपालिकेच्या निवडणुकीत आम आदमी पार्टी सर्वच प्रभागांमध्ये आपले उमेदवार उभे करणार असल्याची माहिती महानगर अध्यक्ष मसुद अहमद खान यांनी गुरुवारी पत्रकार परिषदेत दिली. त्यांनी भाजप आणि काँग्रेसच्या साट्यालोट्यामुळे शहरात निर्माण झालेल्या समस्यांवर तीव्र टीका केली आणि दिल्ली-पंजाब मॉडेल अकोल्यात आणून शहराला 'भ्रष्टाचाराच्या अजगरी विळख्यातून' मुक्त करण्याचा मानस व्यक्त केला.

भाजप व काँग्रेसच्या साठगाठामुळे भरमसाठ लावलेले मनपा कर रद्द करणे आणि नवीन कर कमी दरात लागू करणे, दर्जेदार शिक्षण व्यवस्था, प्रत्येक प्रभागात ओ.पी.डी. हॉस्पिटलची उभारणी, पाणी व स्वच्छता, दररोज शुद्ध पाणीपुरवठा आणि शहराचे सौंदर्यीकरण व नियमित साफसफाई, सुशिक्षित बेरोजगार तरुणांना बिनव्याजी एक लाख रुपयांपर्यंत कर्ज, स्वच्छ, पारदर्शक आणि भ्रष्टाचारमुक्त प्रशासन, प्रत्येक प्रभागात जिम स्थापित करणे व हेल्पलाईन सेंटर उभारणे या सर्व सोयीसुविधा पुरविण्याचा मानस असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले. नगर परिषदेच्या काळात स्थापन झालेल्या शाळांची अवस्था आज बकाल झाली आहे. शहरात कचऱ्याचे प्रचंड ढीग साचले आहेत, काही ठिकाणी रस्त्यावर दिवे नाहीत, डुकरांचे व कुत्र्यांचे साम्राज्य पसरले आहे. आरोग्याचा प्रश्न गंभीर झाला आहे आणि मनपात सगळीकडे 'कमिशनर राज' निर्माण झाले आहे. यासाठी फक्त भाजप व काँग्रेस सरकार जबाबदार आहेत असा घणाघाती आरोप मसुद अहमद खान यांनी यावेळी केला. या सर्व बाबींवर उपाय म्हणून आम आदमी पार्टी सत्ता स्थापन झाल्यानंतर काम करणार आहे. दिल्ली व पंजाब मॉडेल अकोल्यात आणून जागतिक दर्जाच्या सोयी-सुविधा, शिक्षण, आरोग्य, वीज, पाणी आणि रस्त्यांची हमी देत, आम आदमी पार्टी अकोला महानगरातील सर्वच प्रभागांत उमेदवार उभे करणार असल्याचे ते म्हणाले. तर इच्छुक उमेदवारांनी संपर्क साधावा, असे आवाहन पक्षाने केले आहे. इच्छुक उमेदवारांची यादी लवकरच जाहीर करण्यात येणार आहे. या पत्रकार परिषदेला महाराष्ट्र राज्याचे उपाध्यक्ष वसंतराव ढोके राज्य कार्यकारिणी सहसचिव अरविंद कांबळे, ज्ञानेश्वर साकरकर, जिल्हाध्यक्ष कैलाश प्रांजळे, प्रा. विजय ठाकरे, गजानन बडकले, प्रा. प्रदीप गवई, आकीब खान, अरुण शेगोकार, श्रावण रंगारी आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

# अकोला महानगरपालिका निवडणूक : उबाठा सेना व मनसे एकत्र लढणार

■ प्रतिनिधी | अकोला ■

अकोला महानगरपालिकेच्या आगामी निवडणुकीत उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना (उबाठा) आणि महाराष्ट्र नवनिर्माण सेना (मनसे) एकत्र येऊन निवडणूक लढवणार असल्याची माहिती गुरुवारी दोन्ही पक्षांच्या जिल्हाप्रमुखांनी दिली. येत्या दोन दिवसांत जागावाटपाबाबत सविस्तर चर्चा होणार असून त्यानंतर पुढील निवडणूक रणनीती निश्चित केली जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

मुंबईत ठाकरे बंधूंनी एकत्र येत महानगरपालिका निवडणूक संयुक्तपणे लढवण्याचा निर्णय घेतल्यानंतर त्याच पार्श्वभूमीवर गुरुवारी मनसेचे विदर्भाचे नेते राजू उंबरकर अकोला दौऱ्यावर आले होते. यावेळी त्यांनी मनसेचे जिल्हाप्रमुख राजेश काळे व पंकज साबळे यांना उबाठा सेनेच्या पदाधिकाऱ्यांशी आगामी महानगरपालिका निवडणुकीबाबत चर्चा करण्याचे आदेश दिले.



**दोन्ही जिल्हाप्रमुखांची सकारात्मक चर्चा; भाजपची वाढणार डोकेदुखी**

आदेशानुसार राजेश काळे व पंकज साबळे यांनी शिवसेना (उबाठा) जिल्हा कार्यालयात जाऊन जिल्हाप्रमुख गोपाल दातकर यांची भेट घेतली. आगामी महानगरपालिका निवडणूक मनसे व उबाठा सेना एकत्र लढवावी, असा प्रस्ताव यावेळी मांडण्यात आला. या प्रस्तावाला दातकर यांनी सकारात्मक प्रतिसाद देत ही निवडणूक दोन्ही पक्ष एकत्रितपणे लढतील, असा विश्वास व्यक्त केला. येत्या दोन दिवसांत उमेदवारांची जागावाटप प्रक्रिया पूर्ण करून उमेदवारी जाहीर केली जाईल, असेही दोन्ही जिल्हाप्रमुखांनी सांगितले. उबाठा सेना व मनसे यांची ही संभाव्य युती झाल्यास भाजपसमोर मोठे आव्हान उभे राहणार असून, महापालिका निवडणुकीत भाजपची डोकेदुखी वाढणार असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे.

# शुभमंगल कार्यालयात २० व २१ डिसेंबर रोजी भव्य पुष्पप्रदर्शन

### अकोला गार्डन क्लब आणि महाबीजचा संयुक्त उपक्रम: एक हजार पेक्षा जास्ती झाडांचा प्रदर्शनीत समावेश



■ प्रतिनिधी | अकोला ■

अकोला गार्डन क्लब व महाबीज यांच्या संयुक्त विद्यमाने अकोल्यातील गोरक्षण रोडवरील शुभमंगल कार्यालयात दिनांक २० व २१ डिसेंबर रोजी दोन दिवसीय भव्य पुष्पप्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. हे प्रदर्शन सकाळी १० ते रात्री ८ या वेळेत सर्व नागरिकांसाठी खुले राहणार आहे.Iकोला गार्डन क्लब ही संस्था गेल्या ५१ वर्षांपासून सातत्याने पुष्पप्रदर्शनाचे आयोजन करत असून, यंदाचे हे ५२ वे वर्ष आहे. या प्रदर्शनात १,००० पेक्षा अधिक फुलांच्या व झाडांच्या जाती व प्रकार पाहायला मिळणार असून, निसर्गप्रेमी व पुष्पप्रेमींसाठी ही एक पर्वणी ठरणार आहे, अशी माहिती क्लबचे अध्यक्ष संजय शर्मा यांनी दिली.

प्रदर्शनात गुलाब व शेवंतीसह अनेक नवनवीन फुलांचे प्रकार, विविध रंगछटांचे गुलाब, तसेच बोन्साय व आकर्षक शोभिवंत झाडे पाहायला मिळणार आहेत. यासोबतच औषधी गुणधर्म असलेल्या झाडांसाठी स्वतंत्र दालन उभारण्यात येणार आहे.

यंदाच्या प्रदर्शनात महिला व मुलांसाठी विविध गेम शोचे आयोजन अकोला गार्डन क्लबच्या महिला विंगकडून करण्यात आले असून, नागरिकांच्या सोयीसाठी फूड स्टॉल्स तसेच घरगुती गार्डनसाठी लागणारे साहित्य व शोभिवंत फुलझाडांची विक्री स्टॉल्सही उपलब्ध असणार आहेत. शालेय विद्यार्थ्यांसाठीही हे प्रदर्शन खुले आहे. दिनांक २० डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्या हस्ते प्रदर्शनाचे उद्घाटन होणार आहे. यावेळी प्रमुख उपस्थिती म्हणून महाबीजच्या व्यवस्थापकीय संचालक एस. भुवनेश्वरी व जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी अनिता मेश्राम उपस्थित राहणार आहेत. या भव्य पुष्पप्रदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन अकोला गार्डन क्लबचे सचिव श्याम गोटफोडे, माजी अध्यक्ष अजय सेंगर, नीरज आवंडेकर, दिनेश पारेख व क्लबच्या इतर पदाधिकाऱ्यांनी केले आहे.

# ४११ केळी उत्पादक शेतकरी विम्याच्या रकमेपासून वंचित

## विमा कंपनीकडून हेतुपुरस्सर टाळाटाळ केल्याचा शेतकऱ्यांचा आरोप

**हिवरखेड / तेल्हारा :** तेल्हारा तालुक्यातील हिवरखेडसह विविध महसूल मंडळांतील एकूण ४११ केळी उत्पादक शेतकऱ्यांची पिक विम्याची रक्कम अद्याप खात्यात जमा करण्यात आलेली नाही, असा गंभीर आरोप शेतकऱ्यांनी विमा कंपनीवर केला आहे. सर्व निकष पूर्ण होऊनही विमा कंपनी जाणीवपूर्वक रक्कम अदा करण्यास टाळाटाळ करीत असल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.

तेल्हारा तालुक्यातील हिवरखेड, अडगाव बु., माळेगाव बा. व तेल्हारा या महसूल मंडळांतील ४११ शेतकऱ्यांनी केळी पिकाचा विमा उतरवला होता. फळपिक विमा योजनेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार १ नोव्हेंबर ते २८ फेब्रुवारी दरम्यान कमी तापमान, तसेच एप्रिल व मे महिन्यात सलग पाच दिवस ४२ ते ४५ अंश सेल्सिअसपेक्षा जास्त तापमान नोंद झाल्यास विमा लागू होतो.



दिनांक २९ ऑक्टोबर २०२५ रोजी विमा कंपनीला प्राप्त झालेल्या ई-मेलनुसार अडगाव बु., माळेगाव बा. व हिवरखेड महसूल मंडळात कमी तापमानाचा ट्रिगर लागू झाल्याची माहिती कृषी विभागाने विमा कंपनीला दिली आहे. याशिवाय स्वयंचलित हवामान केंद्राच्या एप्रिल महिन्याच्या अहवालानुसार वरील सर्व महसूल मंडळांत सलग पाच दिवस ४२ अंश सेल्सिअसपेक्षा अधिक तापमानाची नोंद झाली आहे.

> 'सर्व निकष पूर्ण असून निधी मंजूर असतानाही जाणीवपूर्वक विमा रक्कम रोखली जात आहे. हा सरळसरळ शेतकऱ्यांवर अन्याय आहे.'
> **प्रदीप वानखडे,** केळी उत्पादक शेतकरी, हिवरखेड

> 'सदर विमा रक्कम मंजूर असून येत्या आठवड्यात शेतकऱ्यांच्या खात्यात रक्कम जमा करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.'
> **प्रशांत काबळे,** जिल्हा व्यवस्थापक, युनिव्हर्सल सोम्पो जनरल इन्शुरन्स कंपनी लि., अकोला

कृषी विभागाने आवश्यक सर्व अहवाल, आकडेवारी व पत्रव्यवहार विमा कंपनीकडे पाठवून प्रक्रिया पूर्ण केली असतानाही, इतर तालुक्यांतील शेतकऱ्यांच्या खात्यात विमा रक्कम जमा होत असताना तेल्हारा तालुक्यातील शेतकऱ्यांना मात्र वंचित ठेवले जात आहे, असा आरोप शेतकऱ्यांनी केला आहे. विमा कंपनीच्या अधिकाऱ्यांकडे विचारणा केली असता उडवाउडवीची उत्तरे देत वेळकाढूपणा केला जात असल्याचेही शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

यावर्षी केळीचे बाजारभाव दोनशे रुपये प्रति क्विंटलपर्यंत घसरले असून आर्थिक अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांवर विमा न मिळाल्याने मोठे संकट ओढावले आहे. वेळीच विमा रक्कम न मिळाल्यास शेतकऱ्यांसमोर आत्महत्येसारखा टोकाचा मार्ग उरणार नाही, अशी तीव्र भावना शेतकऱ्यांनी व्यक्त केली असून शासन व लोकप्रतिनिधींनी तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे.

# उबाठा सेनेची अकोला शहर कार्यकारिणी जाहीर



### पश्चिम शहरप्रमुखपदी ज्येष्ठ पत्रकार आशिष गावंडे यांची नियुक्ती

■ प्रतिनिधी | अकोला ■

गत आठवड्यात उबाठा सेनेचे अकोला शहरप्रमुख राजेश मिश्रा यांनी शिंदे गटात प्रवेश केल्यानंतर पक्षाने तात्काळ संघटनात्मक बदल करत अकोला पश्चिम शहरप्रमुखपदी ज्येष्ठ पत्रकार आशिष गावंडे यांची नियुक्ती जाहीर केली आहे.

अकोला पश्चिम विधानसभा मतदारसंघात आशिष गावंडे यांचा दांडगा जनसंपर्क असून राजकारणाचे उत्तम ज्ञान आणि सामाजिक कार्यातील सक्रिय सहभाग यामुळे त्यांच्या नियुक्तीमुळे आगामी महानगरपालिका निवडणुकीत उबाठा सेनेला निश्चितच बळ मिळणार असल्याचे बोलले जात आहे.

अकोल्यातील नामांकित वृत्तपत्रात राजकीय बीट सांभाळणारे आशिष गावंडे हे नोकरीसोबतच समाजकार्यातही सदैव अग्रेसर राहिले आहेत. पश्चिम अकोला विधानसभा मतदारसंघात त्यांची विशेष पकड असून सर्व समाजघटकांमध्ये त्यांचा व्यापक जनसंपर्क आहे. सौम्य, मितभाषी स्वभाव आणि प्रभावी राजकीय समज असलेल्या गावंडे यांची कार्यक्षमता हेरून उबाठा सेनेच्या वरिष्ठ नेतृत्वाने त्यांची अकोला पश्चिम शहरप्रमुखपदी नियुक्ती केली आहे. याचबरोबर उपजिल्हाप्रमुखपदी सुरेंद्र विसपुते, शहर संघटकपदी राजू चव्हाण, शहर युवा अधिकारीपदी प्रशांत मानकर, जिल्हा संघटक (शेतकरी सेना) शिवा मोहोड, जिल्हा संघटक गंगाधर ढोरे व भूषण भीरड तसेच जिल्हा समन्वयकपदी अश्विन पांडे यांचीही नियुक्ती करण्यात आली आहे. या सर्व नियुक्त्या उबाठा सेनेचे प्रदेश सचिव विनायक राऊत यांच्या पत्राद्वारे जाहीर करण्यात आल्या आहेत.

# रिपब्लिकन पक्ष (खोरीपा)

## महानगरपालीका निवडणूक लढविणार

**अकोला :** रिप. पक्ष (खोरीपा) ची जिल्हा बैटक दिनांक १७-१२-२०२५ ला सर्कीट हाऊस अकोला येथे सपन्न झाली. बैठकीमध्ये अकोला महानगरपालीका निवडणूकीत पक्षाचे उमेदवार निवडणूक लढविणार त्यांनी पक्षाचे पदाधिकारी यांचेकडे अर्ज सादर करावे. समविचारी पक्षासोबत युतीचे बोलणी करण्याचे अधिकार पक्षाचे अध्यक्ष दिगंबर वाकोडे यांना देण्यात आले आहे. या बैठकिचे अध्यक्षस्थानी अकोला जिल्हा अध्यक्ष दिगंबर वाकोडे होते. या बैठकीला गोवर्धन तिडके, मधुकर वानखडे, दौलत सावळे, मिलींद बन्सोड, इंगळे, प्रमोद ढवळे, राजू गोपनारायण, पळसपगार, सुरेश इंगळे इत्यादी हजर होते.


**Change In Name**

I Have Change My Name
OLD NAME
**ARSHEENA FARHAT SHAFIULLAH KHAN**
NEW NAME
**ARSHINA FARHAT MOIZUL HAQUE**
My Residential Address is :- Aksa Appartment Kalal ki Chawl Mominpura Akola Maharashtra 444001.

**जाहीर नोटीस**

**वि. ०६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २१५७/२०२५ — प्रोसेस नं. १९६१९/२०२५
चौ.ता. ०२/०१/२०२६ — दिनांक : २९/११/२०२५

**अर्जदार :** १. इंदुबाई दयाराम उंबरकर २. राजु दयाराम उंबरकर अर्जदार क्र १ व २ रा. समाज मंदिराचे (बौद्ध पुतळ्याजवळ), लहान उमरी, उमरखेड, ता. जि. अकोला. ३. संजय दयाराम उंबरकर रा. लहान उमरी, जठारपेठ, अकोला. ता. जि. अकोला. ४. अंजू गजानन ढाकरे रा. पोपटखेड रोड, महेश कॉलनी, अकोट, ता. अकोट जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : दयाराम मारोती उंबरकर
**पत्ता :-** रा. समाज मंदिराचे (बौद्ध पुतळ्याजवळ), लहान उमरी, उमरखेड, ता. जि. अकोला.

यो अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत दयाराम मारोती उंबरकर यांचे दि. २५/०३/२०२१ रोजी अकोला, ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०२/०१/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २९/११/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**जाहीर नोटीस**

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २२६२/२०२५ — प्रोसेस नं. २०५२१/२०२५
चौ.ता. २७/०१/२०२६ — दिनांक : १५/१२/२०२५

**अर्जदार :** १. श्रीमती सिमा गौरीशंकर परमा २. सौ. पुजा अमोल ढोले दोघेही रा. शिवालय, गुप्ते मार्ग, स्टेट बँकेजवळ, एडीएम ब्रांच, जठारपेठ, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : गौरीशंकर राचप्पा परमा
**पत्ता :-** रा. शिवालय, गुप्ते मार्ग, स्टेट बॅंकेजवळ, एडीएम ब्रांच, जठारपेठ, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत गौरीशंकर राचप्पा परमा यांचे दि. ०८/०४/२०२० रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २७/०१/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १५/१२/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**जाहीर नोटीस**

**वि. ०६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २२०५/२०२५ — प्रोसेस नं. २०१८४/२०२५
चौ.ता. ०९/०१/२०२६ — दिनांक : ०८/१२/२०२५

**अर्जदार :** १. कौसल्या सुभाष बगाडे रा. मुखर्जी बंगल्या जवळ, राउत वाडी, अकोला. ता. जि. अकोला. २. प्रतिक्षा सुभाष बगाडे रा. दुर्गामाता गार्डन बी ३३/३, इंदिरा नगर, सुप्पर बिबडेवाडी, पुणे सिटी, मार्केट यार्ड, पुणे. ३. भाग्यश्री मनोज चुंबळकर रा. टिळक चौक, चंडिकावेश, वाशिम. ता. जि. वाशिम.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : सुभाष माणिकराव बगाड़े
**पत्ता :-** रा. मुखर्जी बंगल्या जवळ, राउत वाडी, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत सुभाष माणिकराव बगाडे यांचे दि. ०८/०६/२०२५ रोजी विदर्भ हॉस्पिटल, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०९/०१/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०८/१२/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**जाहीर नोटीस**

**वि. ०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २१३९/२०२५ — प्रोसेस नं. १९४७४/२०२५
चौ.ता. ०९/०१/२०२६ — दिनांक : २७/११/२०२५

**अर्जदार :** १. प्रशांत श्रीराम खापरकर रा. लक्ष्मी नगर, मोठी उमरी, अकोला. ता. जि. अकोला. २. सौ. अलका ज्ञानेश्वर पळसकार रा. मु. पो. वडाली देशमुख, ता. अकोट, जि. अकोला. ३. सौ. कल्पना शंकरराव शिरळकार रा. तिरूपती नगर नं. १, साई नगर, अकोली रोड, अमरावती, साई नगर, एसओ अमरावती. ४. अर्चना सुनिल कळसकार रा. मु. पो. विहीगांव, ता. अंजनगाव सुर्जी, जि. अमरावती.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. चंद्रभागाबाई जयराम खापरकर २. श्रीराम जयराम खापरकर
**पत्ता :-** रा. लक्ष्मी नगर, मोठी उमरी, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत चंद्रभागाबाई जयराम खापरकर यांचे दि. ०१/११/२००९ रोजी व तसेच मयत श्रीराम जयराम खापरकर यांचे दि. १६/०५/२०२३ रोजी लक्ष्मी नगर, मोठी उमरी, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ०९/०१/ २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वत: जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २७/ ११/ २०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**जाहीर नोटीस**

**वि. ०६ वे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २२६६/२०२५ — प्रोसेस नं. २०६२५/२०२५
चौ.ता. २२/०१/२०२६ — दिनांक : १६/१२/२०२५

**अर्जदार :** १. अभय किशोर गगलानी रा. बिरला गेट नं. २ जवळ, श्रीहरी पार्क अपार्टमेंट, तापडिया नगर, जठारपेठ रोड, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. किशोर त्रिभुवनदास गगलानी २. सौ. जयश्री किशोर गगलानी
**पत्ता :-** रा. बिरला गेट नं. २ जवळ, श्रीहरी पार्क अपार्टमेंट, तापडिया नगर, जठारपेठ रोड, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत किशोर त्रिभुवनदास गगलानी यांचे दि. १०/०४/२०२३ रोजी व तसेच मयत सौ. जयश्री किशोर गगलानी यांचे दि. १३/०२/२०२१ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २२/०१/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १६/ १२/ २०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**जाहीर सुचना**

दि. १८.१२.२०२५

सर्वत्र लोकांना कळविण्यात येते कि, आमचे पक्षकार, हे मे. ग्रीन व्हेली डेव्हलपर्स भागीदारी फर्म तर्फे भागीदार मोहम्मद कमर अब्दुल कादर व इतर ३ यांचे कडून त्यांचे मालकीचे व ताब्यातील मौजे अकोली खुर्द ता. जि. अकोला, येथील शेत सर्व्हे नं २१/३ पार्ट, मधील लेआऊट प्लॉट क्र ५-अ, क्षेत्रफळ ३०३.७४५ चौ.मी. ज्यास चतु:सीमा: पुर्वेस: रोड, पश्चीमेस: प्लॉट नं ९ व १०, उत्तरेस : प्लॉट नं ४, दक्षीणेस: प्लॉट नं ५-ब व लेआऊट प्लॉट क्र ५-ब, क्षेत्रफळ ३०३.२८१ चौ.मी. ज्यास चतु:सीमा: पुर्वेस रोड, पश्चीमेस: प्लॉट नं ८ व ९, उत्तरेस:प्लॉट नं ५-अ, दक्षीणेस: प्लॉट नं ६, असे २ खुले प्लॉट विकत घेत आहेत, व तसा करार झालेला आहे.

तरी सदरच्या वर उल्लेखीत मालमत्ते बाबत कोणाचा कोणत्याहि प्रकारचा हक्क, संबंध, गहाण, अगर बोजा असल्यास, किंवा काही हीतसंबंध असल्यास, खालील पत्त्यावर कागद पत्रा सहित, आज पासुन सात (७) दिवसांचे आत भेटावे. अन्यथा कोणाचा कोणत्याहि प्रकारचा उजर चालणार नाहि याचि कृपया नोंद घ्यावि.

**शिशिर अरविंद देशपांडे**
अधिवक्ता, दिवाणी न्यायालयासमोर,
स्टेशन रोड, अकोला
मोबाईल क्र ९८२३०९१३७७

**जाहीर नोटीस**

**वि. सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. २१६३/२०२५ — प्रोसेस नं. २०१९२/२०२५
चौ.ता. १९/०१/२०२६ — दिनांक : ०८/१२/२०२५

**अर्जदार :** १. शशिकला शालिग्राम कोकाटे रा. कोल्हाटकर मंगल कार्यालयाजवळ, निबंधे प्लॉट, लहान उमरी, अकोला. ता. जि. अकोला. २. संजीव शालिग्राम कोकाटे रा. नागे लेआउट, कौलखेड, अकोला. ता. जि. अकोला. ३. राजाभाऊ शालिग्राम कोकाटे मयत तर्फे वारस ३ अ. श्रीमती शोभा राजाभाऊ कोकाटे ३ब. अजय राजाभाऊ कोकाटे ३अ ते ३ब रा. कोल्हाटकर मंगल कार्यालयाजवळ, निबंधे प्लॉट, लहान उमरी, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : शालिग्राम बळीराम उर्फ शालिग्राम बळीराम कोकाटे
**पत्ता :-** रा. निबंधे प्लॉट, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत शालिग्राम बळीराम उर्फ शालिग्राम बळीराम कोकाटे यांचे दि. ०६/०५/२०१५ रोजी राहते घरी निबंधे प्लॉट, अकोला. ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक १९/०१/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०८ / १२ / २०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
आदेशानुसार
अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला



जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २२**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail. com, abhiram.deshpande70@gmail.com

# कोणाच्या दबावाखाली घातला एक कोटींचा सिमेंट रस्ता ?

## मोहिनी नगरात 'व्हीआयपी' विकास; जनतेच्या पैशांची उघड लूट

**वर्धा/ रवींद्र लाखे**

वर्धा शहरातील मोहिनी नगर परिसरात एकही नागरिक राहत नसलेल्या भागात तब्बल एक कोटी रुपयांचा सिमेंट काँक्रीट रस्ता उभारण्यात आल्याने शहरात संतापाची लाट उसळली आहे. सामान्य नागरिकांना मूलभूत सुविधांसाठी वर्षानुवर्षे संघर्ष करावा लागत असताना, मात्र मोकळ्या आणि निर्जन परिसरात कोट्यवधींचा निधी खर्च होतोच कसा? असा थेट प्रश्न आता जनतेकडून उपस्थित केला जात आहे.



या प्रकरणाचा तपास आमच्या प्रतिनिधींनी केला असता, धक्कादायक वास्तव समोर आले आहे. या रस्त्यालगत एका मोठ्या कन्स्ट्रक्शन कंपनीकडून बारा मजली फ्लॅट कॉम्प्लेक्सचे भव्य बांधकाम सुरू आहे. या प्रकल्पातील दोन फ्लॅट एका प्रभावशाली राजकीय नेत्याने घेतल्याची जोरदार चर्चा असून, त्याच पार्श्वभूमीवर या रस्त्याला घाईघाईने मंजुरी देण्यात आली. विशेष म्हणजे, हा रस्ता लेआउटधारकाच्या खर्चातून नव्हे, तर थेट नगरपालिकेच्या फंडातून करण्यात आल्याचा गंभीर आरोप आहे.वास्तविक पाहता, लेआउटमधील अंतर्गत रस्ते, नाल्या व सुविधा पुरवण्याची जबाबदारी ही संबंधित लेआउटधारकाचीच असते. मात्र या प्रकरणात नियमांना हरताळ फासून वर्धा नगर परिषदेचा निधी वापरण्यात आल्याने प्रशासनाच्या भूमिकेवर संशयाचे ढग गडद झाले आहेत.

धक्कादायक बाब म्हणजे, ज्या परिसरात हजारो नागरिक वास्तव्यास आहेत, तिथे आजही खड्डयांनी भरलेले रस्ते, नाल्यांचा अभाव आणि अपुरा वीजपुरवठा हीच ओळख आहे. पावसाळ्यात चिखल, उन्हाळ्यात धूळ आणि रात्री अंधार, अशा अवस्थेत जगणाऱ्या नागरिकांच्या तोंडाला पाने पुसून, मात्र 'व्हीआयपी' बिल्डर प्रकल्पासाठी रेड कार्पेट टाकल्यासारखा सिमेंट रस्ता घातल्याचा आरोप होत आहेया प्रकरणात कोणत्या अधिकाऱ्यांनी मंजुरी दिली, कोणत्या ठरावाच्या आधारे निधी खर्च झाला, आणि कोणत्या राजकीय दबावामुळे नियम पायदळी तुडवले गेले, याची तातडीने चौकशी होणे गरजेचे आहे.

अन्यथा, सामान्य जनतेच्या कराच्या पैशातून मोजक्या लोकांचे उखळ पांढरे करण्याचा हा प्रकार लोकशाही व्यवस्थेवरच घाला ठरणार, अशी तीव्र प्रतिक्रिया नागरिक व्यक्त करीत आहेत.आता प्रश्न एकच आहे. जनतेच्या पैशांचा हिशेब कोण देणार? आणि हा 'व्हीआयपी' रस्ता घालणाऱ्यांवर कारवाई कधी होणार? जनतेच्या हितासाठी हा प्रश्न दुर्लक्षित करता येणार नाही.

स्थानिक नागरिकांचा आरोप आहे की, या रस्त्यामुळे संबंधित फ्लॅट कॉम्प्लेक्सच्या घरांच्या किमतीत मोठी वाढ होणार असून, खासगी बिल्डरच्या फायद्यासाठीच जनतेचा पैसा वापरण्यात आला. इथे एकही नागरिक राहत नाही, मग हा रस्ता जनतेसाठी की बिल्डरसाठी ? असा संतप्त प्रश्न नागरिक विचारत आहेत.

# गिरड येथे संताजी जगनाडे महाराज जयंती साजरी

## गावातून निघाली भव्य शोभायात्रा

**समुद्रपूर/जनमाध्यम**

तालुक्यातील गिरड येथे तेली समाज बांधवांच्या वतीने संताजी जगनाडे महाराज जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्त संत गाडगेबाबा सभागृहात जयंती समारोहाचे आयोजन करण्यात आले होते. सायंकाळी सहा वाजता गावातून भव्य शोभायात्रा काढण्यात आली. पारंपरिक वाद्यांच्या गजरात निघालेल्या या शोभायात्रेमुळे संपूर्ण गावात भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते.



शोभायात्रेचा समारोप संत गाडगेबाबा सभागृहात करण्यात आला. त्यानंतर जयंती कार्यक्रमास सुरुवात झाली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. किरण नौकरकर होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून गिरडचे सरपंच राजू नौकरकर, उपसरपंच मंगेश गिरडे, कवडू वानोडे, मोहगावचे सरपंच विलास नवघरे, माजी जिल्हा परिषद सदस्य फकिरा खडसे, प्रशांत ठाकूर आदी मान्यवर उपस्थित होते.मान्यवरांच्या हस्ते संताजी जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी नुकतीच डॉक्टर पदवी प्राप्त केलेल्या डॉ. किरण नौकरकर यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

उपस्थितांना मार्गदर्शन करताना डॉ. किरण नौकरकर यांनी संताजी जगनाडे महाराज यांच्या जीवन व कार्यावर प्रकाश टाकला. संत व महापुरुष हे कोणत्याही एका जाती, समाज किंवा पंथापुरते मर्यादित नसून ते संपूर्ण मानवजातीचे मार्गदर्शक असतात. प्रत्येक संताने समाजाला सत्य, समता व सदाचाराची शिकवण दिली आहे. त्या शिकवणीचा अवलंब करून समाजहिताचे कार्य करणे हीच खरी संतवाणी आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले. तसेच सत्काराबद्दल आयोजकांचे आभार मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वीते साठी विनोद येणोरकर, हेमंत तेलरांधे, कुणाल बंडे, अशोक वांदिले, राजू कापसे, श्रीकांत तेलरांधे यांच्यासह गावातील समाजबांधव, महिला भगिनी व युवकांनी परिश्रम घेतले. मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

# निधन वार्ता

## संध्या सुभेदार



**वर्धा -** स्थानिक केळकरवाडी येथील संध्या विनायक सुभेदार यांचे १८ डिसेंबरला सकाळी ८ वाजता वृद्धापकाळाने निधन झाले. त्या ८७ वर्षाच्या होत्या. त्यांच्यावर स्थानिक हिंदू स्माशानभुमित अंत्यसंस्कार करण्यात आले.यांच्या मागे १ मुलगा आणि ३ मुली असा बराच मोठा आप्तपरिवार आहे. त्यांच्या कुटुंबीयांनी देहदानाचा निर्णय घेतला आहे.

## बयाबाई चंद्रभानजी नाखले



**वर्धा-** मसाळा टेलिकॉम नगर येथील रहिवासी बयाबाई चंद्रभानजी नाखले यांचे अल्प आजाराने वयाच्या ७९ व्या वर्षी गुरूवार दि, १९ डिसेंबर रोजी दुःखद निधन झाले. त्या सामाजिक कार्यकर्ते मार्क्सवादी कम्युनिस्ट पार्टीचे ज्येष्ठ नेते कॉम्रेड चंद्रभानजी नाखले यांच्या पत्नी, यशवंत विद्यालय झडशीचे मुख्याध्यापक मुकुंद नाखले व वृत्तपत्र एजंट हर्षवर्धन नाखले यांच्या मातोश्री होत. त्यांचा मागे पती, दोन मुले, स्नुषा, चार मुली, नातवंडे बराच मोठा आप्त परिवार आहे. त्यांच्यावर स्थानिक स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले.

# चन्नावरचे ई विद्या मंदिरात दोन दिवसीय सांस्कृतिक महोत्सव

## कला, संस्कार आणि सृजनशीलतेचा विद्यार्थ्यांमधून जागर

**वर्धा/ जनमाध्यम**

शिक्षणासोबतच संस्कार, सांस्कृतिक जाणीव आणि सृजनशीलतेची जोपासना करण्याच्या उद्देशाने चन्नावरचे ई विद्या मंदिर, येळकेली येथे भव्य दोन दिवसीय सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. आकार एज्युकेशन सोसायटी, वर्धा यांच्या वतीने हा कार्यक्रम, २३ डिसेंबर २०२५ व बुधवार, २४ डिसेंबर २०२५ रोजी दररोज सायंकाळी ५.१५ वाजता उत्साहात संपन्न होणार आहे.

कार्यक्रमाच्या पहिल्या दिवशी तारे दाखवत आहेत, आनंदाने फिरत आहेत. या नावीन्यपूर्ण संकल्पनेवर आधारित सांस्कृतिक उत्सव होणार आहे. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांच्या नृत्य, गायन, नाट्यछटा, समूह सादरीकरणे तसेच विविध कलाविष्कार सादर केले जाणार असून विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना अभिव्यक्तीचे मुक्त व्यासपीठ मिळणार आहे. आत्मविश्वास, कल्पकता आणि संघभावनेचे दर्शन या सादरीकरणांतून घडणार आहे.दुसऱ्या दिवशी रामाच्या पावलावर पाऊल : धर्माचा प्रवास या भावपूर्ण संकल्पनेवर आधारित कार्यक्रम सादर केला जाणार आहे. सत्य, कर्तव्य, त्याग, सेवा आणि धर्मनिष्ठ जीवनमूल्यांचा संदेश विद्यार्थ्यांच्या अभिनय, संवाद आणि दृश्यरूपांतून प्रभावीपणे मांडला जाणार आहे. बदलत्या सामाजिक परिस्थितीत नैतिक मूल्यांचे महत्त्व अधोरेखित करण्याचा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

या दोन दिवसीय महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी शाळेचे व्यवस्थापन, शिक्षकवर्ग व कर्मचारी परिश्रम घेत असून विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड उत्साहाचे वातावरण आहे. आकार एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष दिनेश चन्नावार यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच शाळेच्या संचालक व प्राचार्य अपुर्वा पांडे यांच्या नेतृत्वाखाली हा उपक्रम साकारत आहे.पालक, नागरिक, शिक्षणप्रेमी आणि विद्यार्थीवर्गाने मोठ्या संख्येने उपस्थित राहून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना दाद द्यावी, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

# संक्षिप्त

## रेल्वे स्थानक परिसरातून दुचाकी लंपास

**हिंगणघाट-** रेल्वे स्थानक परिसरातून अज्ञात चोरट्याने दुचाकी चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. राहुल देवचंद वनकर (रा. हनुमान वॉर्ड, हिंगणघाट) यांच्या तक्रारीवरून हिंगणघाट पोलिसांनी गुन्हा नोंदविला आहे.

## वृद्धाची आत्महत्या

**हिंगणघाट -** महावितरण कार्यालयाच्या मागील परिसरातील टिनाच्या शेडमध्ये रमेश काळे (वय ६१, रा. इंदिरा गांधी वॉर्ड) यांनी गळफास घेऊन आत्महत्या केली. कामावरून न परतल्याने शोध घेतला असता ही घटना उघडकीस आली. हिंगणघाट पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे.

## बसची दुचाकीला धडक

**वर्धा -** खरांगणा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील आमगाव परिसरात भरधाव बसने दुचाकीला धडक दिली. या अपघातात अजय अंबोरे (रा. आमगाव) गंभीर जखमी झाले. नागरिकांनी तातडीने जखमीला रुग्णालयात दाखल केले. बस चालक विनोद सलामे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## शिवीगाळ थांबविल्याने मारहाण

**देवळी -** तालुक्यातील वाटखेडा चौफुलीजवळ शिवीगाळ करणाऱ्यास हटकले असता त्याने मारहाण केल्याची घटना घडली. भूषण अरुण टिपणे (रा. काळोना चोरे) जखमी झाले असून, आरोपी विशाल दौड याच्याविरुद्ध देवळी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

## क्षुल्लक कारणावरून कटरने हल्ला

**हिंगणघाट -** येथील हनुमान वॉर्डात क्षुल्लक वादातून कटरने हल्ला करून एकास जखमी करण्यात आले. गोपाल नारायण तलमले हे जखमी झाले असून, आरोपी सकलीन शेख याच्याविरुद्ध पोलिसांनी गुन्हा नोंदविला आहे.

## मोटारपंपच्या स्टार्टरचा शॉक

**वर्धा -** मौजा वरुड शिवारात शेतातील विहिरीवरील मोटारपंपच्या स्टार्टरचा जोरदार शॉक लागून पुरुषोत्तम भाऊराव उराडे (वय ५७, रा. पवनार) यांचा मृत्यू झाला. सेवाग्राम पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे.

## शेगावच्या पोथरा तिरावर रेती माफियांचा डेरा

**समुद्रपूर-** पोलिस ठाण्याच्या हद्दीतील शेगाव–गोठाडे येथील पोथरा नदीपात्रात रेती माफियांनी अक्षरशः तळ ठोकला असून, अवैधपणे रेतीचा उपसा करून चढ्या दराने वाहतूक केली जात आहे. महसूल विभागाकडून दुर्लक्ष होत असल्याची संतप्त प्रतिक्रिया नागरिकांत उमटत आहे.चोरीच्या रेतीची माहिती मिळताच समुद्रपूर पोलिसांनी समुद्रपूर-गिरड मार्गावर नाकेबंदी केली. तपासणीदरम्यान कागदपत्रांशिवाय रेती वाहतूक करणारा ट्रॅक्टर पकडण्यात आला. पोलिसांनी रेती, ट्रॅक्टर व ट्रॉली असा एकूण १० लाख ९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.या प्रकरणी सचिन चिंधुजी धोटे (रा. रामनगर) व कृष्णा बंडुजी धोटे (रा. निरगुडी) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# विहित मुदतीतच ५० टक्के सवलतीसह कर भरण्याचे आवाहन

**साहूर/ जनमाध्यम**

ग्रामपंचायतच्या थकीत करावर ५० टक्के सवलत देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला असून त्या अनुषंगाने ग्रामपंचायत साहूरने विशेष ग्रामसभेचे आयोजन करून नागरिकांना सवलतीचा लाभ देण्याचा ठराव मंजूर केला आहे. मात्र ही सवलत केवळ शासनाच्या मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानअंतर्गत ठरविण्यात आलेल्या १७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीतच लागू राहणार असून ३१ डिसेंबर २०२५ ही अंतिम मुदत आहे. त्यानंतर कोणत्याही नागरिकांना सवलत मिळणार नसल्याची स्पष्ट सूचना ग्रामपंचायत अधिकारी राजेश जवंजाळ यांनी दिली आहे.

ग्रामपंचायतचे सरपंच प्रकाश गायकवाड, ग्रामपंचायत अधिकारी राजेश जवंजाळ तसेच कर्मचारी नरेश चांदुरकर, प्रशांत वानखडे हे स्वतः नागरिकांच्या दारात जाऊन मकान कर वसुली करत असून ५० टक्के कर सवलतीबाबत मार्गदर्शन करून नागरिकांना या सुवर्णसंधीचा लाभ घेण्याचे आवाहन करीत आहेत. या योजनेला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून अनेक थकबाकीदार नागरिकांनी सवलतीचा फायदा घेत आपला कर भरल्याची माहिती प्रशासनाने दिली.मकान कर हा ग्रामपंचायतीच्या उत्पन्नाचा प्रमुख व अत्यंत महत्त्वाचा स्त्रोत असून गावातील विकासकामे, नागरी सोयी-सुविधा, कर्मचाऱ्यांचे वेतन व दैनंदिन खर्च यासाठी ग्रामपंचायत मोठ्या प्रमाणात या उत्पन्नावर अवलंबून असते. मात्र सध्या साहूर गावात चालू आर्थिक वर्षापर्यंत लाखो रुपयांचा मकान कर थकीत असल्याची माहिती समोर आली आहे. थकबाकीदार नागरिकांना वेळोवेळी नोटिसा देऊनही अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.दरम्यान, ३१ डिसेंबर २०२५ नंतर थकीत कर न भरल्यास पोलीस संरक्षणात कठोर कारवाई व जप्तीची प्रक्रिया राबविली जाईल, असा इशाराही ग्रामपंचायत प्रशासनाकडून देण्यात आला आहे. त्यामुळे ही वेळ नागरिकांवर येऊ नये, यासाठी सर्व थकबाकीदारांनी अंतिम मुदतीपूर्वीच ५० टक्के सवलतीचा लाभ घेऊन आपला संपूर्ण कर भरावा, असे कळकळीचे आवाहन सरपंच व ग्रामपंचायत अधिकारी जवंजाळ यांनी केले आहे.

# शेतकऱ्यांच्या मुळावर उठणाऱ्या प्रस्तावित बियाणे कायद्याला आव्हान

**वर्धा / नवी दिल्ली/ जनमाध्यम**

शेतकऱ्यांच्या उत्पादन क्षमतेशी आणि भवितव्याशी थेट संबंध असलेल्या बियाण्यांच्या प्रश्नावर केंद्र सरकारने आणलेला प्रस्तावित बियाणे (कृषी) कायदा २०२५ सध्या वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. या कायद्यातील तरतुदी शेतकऱ्यांच्या हिताऐवजी त्यांच्याच अडचणी वाढवणाऱ्या ठरतील, असा गंभीर आरोप होत असून खासदार अमर काळे यांनी याविरोधात आक्रमक भूमिका घेत केंद्रीय कृषी मंत्र्यांकडे ठोस मागणी केली आहे.



या प्रस्तावित कायद्यानुसार चुकीचे किंवा बोगस बियाणे आढळल्यास थेट कृषी केंद्र चालकांना दोषी धरून ५० हजारांपासून १० लाख रुपयांपर्यंत दंड व गुन्हा दाखल करण्याची तरतूद करण्यात आली आहे. प्रत्यक्षात कृषी केंद्र चालक हे बियाण्यांचे उत्पादक नसून कंपन्यांकडून पुरवलेले कृषी विभागाने प्रमाणित केलेले पॅकबंद बियाणेच शेतकऱ्यांना विकतात. अशा परिस्थितीत कंपन्यांच्या किंवा तपास यंत्रणेच्या त्रुटींसाठी विक्रेत्यांवर कारवाई करणे म्हणजे अप्रत्यक्षपणे शेतकऱ्यांनाच अडचणीत ढकलण्यासारखे आहे.कृषी केंद्र चालकांवर जर अशा कठोर तरतुदी लादल्या गेल्या, तर अनेक केंद्रे बंद पडण्याची भीती आहे. याचा थेट फटका शेतकऱ्यांना बसणार असून त्यांना दर्जेदार बियाणे मिळणे कठीण होईल. आधीच अतिवृष्टी, दुष्काळ, कीड आणि बाजारभावाच्या संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांसाठी हा कायदा आणखी डोकेदुखी ठरण्याची शक्यता आहे.ही बाब लक्षात घेत कृषी केंद्र चालकांनी खासदार अमर काळे यांच्याकडे धाव घेतली. शेतकऱ्यांच्या हिताला बाधा येऊ नये, यासाठी कायद्यात तातडीने दुरुस्ती करावी, अशी ठाम भूमिका घेत खासदार काळे यांनी केंद्रीय कृषी मंत्र्यांशी सविस्तर चर्चा केली. बियाण्यांच्या गुणवत्तेसाठी संबंधित कंपन्या आणि कृषी विभागालाच जबाबदार धरावे, अशी स्पष्ट मागणी त्यांनी केली.

# पदभार न सोडल्याने आसोला ग्रामस्थांचा पंचायत समितीवर मोर्चा

## प्रहार जनशक्ती पक्षाच्या नेतृत्वात आंदोलन

**समुद्रपूर/ जनमाध्यम**

तालुक्यातील आसोला येथील ग्रामपंचायतीचे ग्रामविकास अधिकारी डी. बी. बांबोळे यांची बदली होऊनही त्यांनी अद्याप पदभार न सोडल्याने गावकऱ्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत होता. या प्रकारामुळे ग्रामपंचायतीची कामे रखडत असून नागरिकांना नाहक त्रास सहन करावा लागत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. अखेर या विरोधात ग्रामस्थांनी प्रहार जनशक्ती पक्षच्या मार्गदर्शनाखाली पंचायत समिती कार्यालयावर बेधडक मोर्चा काढत प्रशासनाला जाब विचारला.

ग्रामस्थांनी वारंवार पंचायत समिती कार्यालयात भेटी देऊन तक्रारी केल्या; मात्र संबंधित अधिकाऱ्यांकडून सातत्याने दुर्लक्ष होत असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. त्यामुळे संतप्त नागरिकांनी पंचायत समितीवर धडक देत थेट आंदोलन छेडले. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेता विस्तार अधिकारी नरेश जामुनकर यांनी तातडीने हस्तक्षेप करत ग्रामविकास अधिकारी डी. बी. बांबोळे यांच्याकडून पदभार काढून सूर्यवंशी यांच्याकडे सोपविण्याचे आदेश दिले.प्रहार जनशक्ती पक्षाच्या दणक्यानंतर ग्रामविकास अधिकारी बांबोळे यांनी विस्तार अधिकारी नरेश जामुनकर व नरेश वाणकर यांच्या उपस्थितीत अधिकृतरीत्या पदभार हस्तांतरित केला. त्यामुळे आसोला ग्रामस्थांनी सुटकेचा निश्वास टाकला.

या आंदोलनात देवा धोटे ईश्वर कोळसे, मनोहर जिवतोडे, कृतिका ईश्वर कोळसे यांच्यासह सुनील तळवेकर, शुभम वैद्य, बंदुजी बाहुरे, श्रावण कुमरे, गजानन चंभारे, उषा जिवतोडे, वनिता मुंढरे, कल्याणी गुरफोडे, सुरेखा धोटे, राणी गडमडे, माधुरी गुरफोडे आदींसह मोठ्या संख्येने आसोला येथील ग्रामस्थ उपस्थित होते.ग्रामपंचायतीचे कामकाज सुरळीत सुरू करण्याची मागणी यावेळी ग्रामस्थांनी जोरकसपणे लावून धरली.



जनमाध्यम

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्यो मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा, वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**

**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**

(Responsible for selection of News Under PRB Act)

**वर्धा आवृत्ती वर्ष** - १४ **अंक** - २४


आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/ २०१३/५१०९३

**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१

फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८

**ई-मेल**- atimadhyam@gmail.com, abhiramdeshpande@gmail.com

# अल्पसंख्यांक हक्क दिवस साजरा





**अमरावती/प्रतिनिधीः-** अल्पसंख्यांक नागरिकांना त्यांच्या घटनात्मक व कायदेशीर हक्कांची जाणीव व्हावी, त्यांना याबाबत माहिती मिळावी यासाठी दरवर्षी १८ डिसेंबर रोजी 'अल्पसंख्याक दिवस ' साजरा करण्यात येतो. अल्पसंख्यांक हक्क दिवसाचे औचित्य साधून आज नियोजन भवन येथे विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

नगर प्रशासन सहाय्यक आयुक्त विकास खंडारे, जिल्हा नियोजन अधिकारी वर्षा भाकरे, कौशल्य विभागाच्या सहाय्यक आयुक्त प्रांजली बारस्कर, योजना शिक्षणाधिकारी राजेश वरखडे, माध्यमिक उपशिक्षणाधिकारी इम्रान खान, प्राथमिक उपशिक्षणाधिकारी नरेंद्र गायकवाड, पोलीस उपअधीक्षक राजेश भोयर यावेळी उपस्थित होते.

महाराष्ट्र राज्य अल्पसंख्यांक आयोगामार्फत अल्पसंख्यांकांसाठी शासनाने राबविण्यात येणाऱ्या योजनांची माहिती अल्पसंख्यांक समाजातील नागरिकांना व्हावी, हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे.

सहाय्यक आयुक्त खंडारे म्हणाले, अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी शासनामार्फत विविध योजना उपक्रम राबविले जातात. त्याचा लाभ विद्यार्थ्यांनी घ्यावा , असे आवाहन केले. अल्पसंख्यांक नागरिकांना त्यांच्या घटनात्मक व कायदेशीर हक्काची जाणीव व्हावी यासाठी हा दिवस साजरा करण्यात येत असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

जिल्हा नियोजन अधिकारी भाकरे यांनी अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांसाठी शासनामार्फत राबविण्यात येत असणाऱ्या योजना, विविध उपक्रम, शिष्यवृत्ती याबाबत माहिती दिली. सहाय्यक आयुक्त बारस्कर यांनी कौशल्य विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना, प्लेसमेंट ड्राईव्ह याबाबत माहिती दिली. यावेळी शिक्षकवृंद, विद्यार्थी, संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे संचालन आणि आभार आपत्ती व्यवस्थापन विभागाचे सुरेंद्र रामेकर यांनी मानले.

## सोफीया प्रकल्पाजवळील बांधकामावरून पडल्याने मजूराचा मृत्यू

**अमरावती/प्रतिनिधीः-** माहुली जहागीर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील सोफिया प्रकल्पाजवळील बांधकामस्थळी झालेल्या अपघातात एका मजुराचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना मंगळवारी दुपारी घडली. मृत मजुराचे नाव बानेश्वरदास कलावंत दास (वय ३६, रा. ठाकीण, फालीमारी, लालीमारी, कोचबिहार, पश्चिम बंगाल) असे आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सोफिया प्रकल्पाच्या बाजूला सुरू असलेल्या बांधकामावर बानेश्वरदास हे काम करत असताना अचानक तोल जाऊन ते खाली पडले. पडताना त्यांच्या डोक्याला व शरीराच्या इतर भागांना गंभीर दुखापत झाली. सहकारी मजुरांनी तात्काळ त्यांना उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले. प्रकृती चिंताजनक असल्याने डॉक्टरांनी त्यांच्यावर तातडीचे उपचार सुरू केले. उपचार सुरू असतानाच बानेश्वरदास यांची प्रकृती अधिक खालावली. अखेर दुपारी ३.२५ वाजता इर्विन (पीडीएमसी) रुग्णालयात डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. या घटनेची माहिती मिळताच नातेवाइक व सहकारी मजुरांनी रुग्णालयात गर्दी केली. अपघाती मृत्यूमुळे परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. या घटनेची नोंद माहुली जहागीर पोलीस ठाण्यात करण्यात आली असून, पोलिसांनी पंचनामा करून पुढील तपास सुरू केला आहे. बांधकामस्थळी सुरक्षा उपायांचा अभाव होता का, याबाबतही पोलिसांकडून चौकशी करण्यात येत आहे. या दुर्घटनेमुळे बांधकामस्थळांवरील कामगारांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

## वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रमोद पोतदार यांचा वाढदिवस रक्तदानाने होणार साजरा



**मोर्शी/प्रतिनिधीः-** शासनाचे विविध पुरस्कार प्राप्त करून मोर्शी शहरात रक्तदान चळवळ राबवून जवळपास २६५० रक्तपिशव्या संकलित करण्याचे अविरत कार्य पार पाडणाऱ्या येथील उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रमोद पोतदार यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने दि.१९ डिसेंबर रोजी स्थानिक उपजिल्हा रुग्णालय मोर्शी येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

जिल्ह्यात अपघाताचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले असून अनेक वेळा अपघात झाल्यास रुग्णाला रक्ताची नितांत गरज भासते तसेच शस्त्रक्रिया करतांना रुग्णाला रक्त मिळविण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागते प्रसंगी मोठी किंमत देऊन रक्त विकत आणावे लागते. जिल्ह्यामध्ये रक्तदान शिबिरे कमी होत असल्यामुळे रक्ताचा तुटवडा जाणवत आहे.

अपघात घडल्यास वेळेवर रक्त उपलब्ध होत नसल्यास रुग्णाला प्राणास मुकावे लागते. ही गंभीर समस्या लक्षात घेऊन रक्तदाता संघाचे अध्यक्ष डॉ.प्रदीप कुऱ्हाडे,कोषाध्यक्ष डॉ. प्रमोद पोतदार, कार्याध्यक्ष मिलिंद ढोले, सचिव गजानन हिरुळकर,सहसचिव अजय पाटील यांनी या रक्तदान शिबिराचे आयोजन केले आहे.

या रक्तदान शिबिरासाठी पोलीस स्टेशन मोर्शी, राजस्व विभाग मोर्शी, तहसील कार्यालय मोर्शी,तथा सर्व सामाजिक संघटना मोर्शी तालुका यांच्या वतीने जास्तीत जास्त रक्तदान करून सहकार्य करण्याचे आवाहन रक्तदाता संघाचे अध्यक्ष डॉ.प्रदीप कुऱ्हाडे, कार्याध्यक्ष मिलिंद ढोले, सचिव गजानन हिरुळकर,सहसचिव अजय पाटील यांनी केले आहे.

## जाहीर सुचना

या जाहीर सुचनेव्दारे सुचित करतो की, माझे पक्षकार **बबनराव भिमरावजी गावंडे,** रा.अचलपूर, ता. अचलपूर, जि. अमरावती यांनी दि.२९/०३/२०१० रोजीचे खरेदी दस्त क्र.११६५ नुसार मौजे -परतवाडा, ता.अचलपूर, जि.अमरावती येथील नझुल शिट नं.१९-डी मधील नझुल प्लॉट नं.१७०/१ भाग ज्याचे क्षेत्रफळ २६५.७९ चौ.मि. व त्यावरील बांधकाम सह हा मनोजकुमार गुलाबचंदजी जोशी यांचे कडून विकत घेतला आहे.

हयाप्रमाणे सदर खरेदी दि.२९/०३/२०१० रोजीचे दस्त क्र.११६५ चे **मुळ खरेदी दस्त** माझे पक्षकार बबनराव भिमरावजी गावंडे यांचे जवळ आहे. परंतु सदर मालमत्तेचे पूर्वीचे मुळ खरेदी दस्त जसे दि.२५/०४/२००६ रोजी दस्त अ.क्र.१२०५ चे दस्त **अ.क्र.१२०५ चे दस्त, हे या जाहीर सुचनेचा विषय असुन** सदर दस्ताचे मुळ खरेदीखत व त्याची पावती माझे पक्षकार यांचे कडून गहाळ झालेली आहे.

सदर हरविलेल्या दस्ताची रितसर दि.११/१२/२०२५ पोलीस स्टेशन परतवाडा येथे तक्रार दाखल केलेली आहे.

तरी सदर प्लॉट बाबत कोणाचोही, कोणत्याही प्रकारचे कर्ज, गहाण, बोजा, हक्क, हितसंबंध व इतर कोणतीही भानगड, कायदेशिर वाद, लवाद,दावा असल्यास किंवा त्याबाबत कोणतीही हरकत असल्यास जाहीर सुचनेपासुन १५ दिवसाचें आंत खालील पत्यावर लेखी स्वरुपात संपर्क साधावा. त्यानंतर आक्षेप आल्यास याची नोंद घेतली जाणार नाही.

दिनांक १२/१२/२०२५
अमरावती.

ॲडव्होकेट
**राहुल व्ही.मोहोड**
प्रेरणा कॉलनी, राधा नगर,
अमरावती- ४४४६०३
मो.क्र.९०९६४६०६७०

## सायटेशन/जाहीरनामा

**विद्यमान दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी**

आर.एम.जे.सी.क्र.७७२/२५ ने.ता.१७.०१.२०२६

अर्जदार - **१.सौ.सुनंदा साहेबराव खाजबागे,** वय ६६ वर्षे, धंदा - घरकाम
**२.श्रीमती मेघा संतोषराव खाजबागे,** वय ४१ वर्षे, धंदा - घरकाम
**३.देवेश संतोष खाजबागे,** वय १५ वर्षे, धंदा - शिक्षण
(अ.पा.क.आई अर्जदार क्र.२)
सर्व रा.बाजार चौक, अडगांव, ता.मोर्शी, जि.अमरावती

-- विरुध्द --

**निल**

वरील अर्जदारांनी वि.दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत U/s २, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट (८) १८२७ प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदार क्र.१ चा मुलगा, अर्जदार क्र.२ चे पती व अर्जदार क्र.३ यांचे वडिल नामे **संतोष साहेबराव खाजबागे यांचा दिनांक ०२/११/२०२५ रोजी तामिळनाडू येथे मृत्यू झाला.** तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय तथा निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदर प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरिल अर्जदाराशिवाय इतर कोणतेही वारस नाहीत. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदाराचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एक महिन्याचे आत वि.न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कुणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कारवाई करण्यात येईल.

**दिनांक- १२/१२/२०२५**

आदेशानुसार,
शिक्का **(सहाय्यक अधीक्षक)**
दिवाणी न्यायालय क.स्तर, मोर्शी

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अमरावती आवृत्ती वर्ष - ३७ अंक १०२
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025
मुख्य कार्यालय :- अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९६२२९६८६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर रेल्वे, जि. अमरावती यांचे न्यायालय

आर.एम.जे.सी. क्र.२७०/२०२५ ने.ता.०५.०१.२०२६

**जाहीरनामा**

**अर्जदार :** १. सरस्वती गोविंदलाल पनपालीया, वय ९१ वर्षे, धंदा - घरकाम
२. किशोर गोविंदलालजी पनपालीया, वय ५६ वर्षे, धंदा - शेती
दोन्ही रा.मांडवा, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती
३. सुनिता शामसुंदर चांडक, वय ५७ वर्षे, धंदा - घरकाम
रा.नेहरु वार्ड, शेगांव बी.के., ता.वरोरा, जि.चंद्रपूर
४. अरुणा विजय भट्टड, वय ६० वर्षे, धंदा - घरकाम
रा.बाबा सॉ मिल, नागपूर रोड, चंद्रपूर, ता.जि.चंद्रपूर

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** १. गोपाल गोविंदलालजी पनपालीया, वय ६८ वर्षे, धंदा - व्यापार
रा.बी.-६०३, शिवम अव्हेन्यू, रेश्मा रो-हाऊस समोर पर्वत पटीया, सुरत (गुजरात)
२. रेखा जुगलकिशोर टावरी, वय ६५ वर्षे, धंदा - घरकाम
रा.एस.बी.आय. शिवाजी नगरच्या मागे, बनोसा दर्यापूर, ता.दर्यापूर, जि.अम.

या नोटीसद्वारे सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **सरस्वती गोविंदलाल पनपालीया व ईतर -वि- निरंक** यांनी दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर रेल्वे यांचे न्यायालयात वारसा हक्काचे प्रमाणपत्र मिळण्याकरीता **मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे भाग ८ कलम २** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

अर्जदाराचे असे म्हणणे आहे की, **गोविंदलाल हुकूमचंद पनपालीया** यांचा मृत्यू दिनांक **०४.०८.२०२५** रोजी मौजा **मांडवा**, ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती येथे झाला. अर्जदार यांचेशिवाय मयतांचे इतर कोणीही वारसदार नाही असे अर्जदाराने अर्जामध्ये नमुद केले आहे.

वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास न्यायालय अर्जदारास त्यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांना वारसा हक्काचे प्रमाणपत्र घोषित करुन देण्यात येईल.

आज दिनांक **१० माहे डिसेंबर २०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशानुसार,
शिक्का **सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय,
चांदूर रेल्वे

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,

**वि.श्री.आर.आर.खामतकर, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२६३६/२०२५
**श्रीमती प्रभा अधिक तीन -वि- निरंक**
पुढील ता.०५.०१.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** 1. Prabha Wd/o Subhash Kadam, Age 78 Yrs. Occu.: Household R/o Laburnum Park Flat No.P-803, Magarpatta City, Pune
2. Uttara W/o Ramchandra Dhanawade, Age 53 Yrs. Occu.: Housewife R/o B-1403, Sai Saakshaal Plot No.09, Sector 6 Kharghar Dist. Raigad
3. Rakhi W\o Mandar Chitale, Age 51 Yrs. Occu.: Housewife R/o A-304, Ambience Divas Apartment, Sarjapura Road, Opp.ALT Training College, Beilandur, Dist.Banglore, Karnataka
4. Abhijit S/o Subhash Kadam, Age 45 Yrs. Occu.: Job R/o Laburnum Park, Flat No.P-803, Magarpatta City, Pune

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **सुभाष शंकरराव कदम** हे दिनांक 12.11.2006 रोजी **नेरुल, नवी मुंबई** येथे मयत झाले. अर्जदार **प्रभा अधिक तीन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **प्रभा अधिक तीन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१६.१२.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशानुसार,
शिक्का **सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

## जाहीर नोटीस

प्रो.नं. ४६८७ /२०२५
दिवाणी न्यायालय व.स्तर दर्यापुर
दि.१८/१२/२०२५

**वि.२ रे सह दिवाणी न्यायालय (व.स्तर) दर्यापूर जि.अमरावती यांचे न्यायालय**

किरकोळ अर्ज क्र.५०६/२०२५ ने.ता.१९.०१.२०२६

अर्जदार - १. **प्रमोद दौलतराव नाईक,** वय ४९ वर्षे, धंदा - शेती
२. **विनोद दौलतराव नाईक,** वय ५२ वर्षे, धंदा - शेती
अ.क्र.१ व २ रा.खानपुर चिपर्डा, ता.दर्यापूर, जि.अमरावती
३. **पद्मा विश्वनाथ वानखडे,** वय ६० वर्षे, धंदा - घरकाम
रा.वडनेर गंगाई, ता.दर्यापूर, जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार- निरंक

या जाहीर नोटीसद्वारे सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की,**दौलतराव जयराम नाईक** हे **दि.१०/११/२०२५ रोजी मरण पावले आहे.**

अर्जदार यांनी मृतकाचे वारस असल्याबाबत **बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट चे कलम २ प्रमाणे** वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज केला आहे. जर कोणास वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसांचे आत आपला आक्षेप सादर करावा. अन्यथा अर्जदारांना मृतकाचे वारस ठरविण्यात येऊन त्यांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल.

**मालमत्तेचे वर्णन :- दौलतराव जयराम नाईक** यांच्या नावे खालील प्रमाणे मिळकत आहे.
१) मौजा सर्फाबाद, ता.अंजनगाव सुर्जी, जि.अमरावती येथील शेत गट क्र.२४/२/ब आर. आ.रु. ४.००/-
२) मौजा-खानपुर चिपर्डा, ता.दर्यापूर, जि.अमरावती, ग्रामपंचायत नालवाडा, अ.क्र.मालमत्ता क्र.१०९, क्षेत्रफळ २३९२ चौ.फुट (१२९ चौ.मि.)
वरील मिळकतीची बाजारभाव किंमत २०,००० रु.आहे.

आज दि.**१८.१२.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशानुसार,
शिक्का **सहाय्यक अधीक्षक (प्रशासन)**
दिवाणी न्यायालय व.स्तर , दर्यापूर

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती

**वि.श्री. एस.बी.कळदाते २ रे सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज - २८१३/२०२५**
**शिला व इतर विरुध्द निरंक**
**पुढील तारीख ०३.०२.२०२६**

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार : 1) **Shila Nirnjanrao Wakode ,** Age 81 yrs., Occu.- Household
2) **Sunil Nirnjanrao Wakode ,** Age 61 yrs., Occu.- Retired
Both R/o. Vivekanand Colony, Rukhmini Nagar Road, Amravati, Tq. & Dist. Amravati
3) **Shelja Vishwas Ghom,** Age 59 yrs., Occu.- Household R/o. Jalalka Hirapur, Tq. Bhatkuli, Dist.Amravati
4) **Lalita Sanjay Kalmegh,** Age 54 yrs., Occu.- Household R/o. Susanyog Colony, Kathora Road, Amravati
5) **Savita Vinod Rode,** Age 58 yrs., Occu.- Household R/o. Vidhyut Nagar, VMV, Amravati
6) **Anita Pramod Deshmukh,** Age 56 yrs., Occu.- Household R/o. Brahamanwada Pathak, Tq. Chandur Bazar, Dist. Amravati

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :- निरंक**

सर्वत्र लोकास सुचित करण्यात येते की, **मयत निरंनजनराव भिमराव वाकोडे दि.१२.०२.२०१६** रोजी अमरावती येथे मयत झाले. **अर्जदार शिला व इतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे ह्या कोर्टात सदरहू **मयत** यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा श्रीमती **शिला व इतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदरहू मयताचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू **मयत** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक ०६.११.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशान्वये,
शिक्का **सहायक अधीक्षक,**
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती

## जाहीर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी यांचे न्यायालयात**

आर.एम.जे.सी.क्र.७८५/२०२५ ने.ता.२२.०१.२०२६

**अर्जदार -** १. श्रीमती सुशिला रामदास ठाकरे, वय ७८ वर्षे, धंदा - घरकाम
२. राजेंद्र रामदास ठाकरे, वय ५५ वर्षे, धंदा - शेती
दोघेही रा.धामणगांव, ता.मोर्शी, जि.अमरावती
३. ज्योती रामभाऊजी वानखडे, वय ५१ वर्षे, धंदा - घरकाम
रा.लाडकी बु., ता.मोर्शी, जि.अमरावती

-- विरध्द --

**गैरअर्जदार- निरंक**

वरील अर्जदारांनी विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे पमाणपत्र मिळण्याबाबत **सेक्शन-२, बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट-८, १८२७** प्रमाणे प्रकरण दाखल केलेले आहे. अर्जदार नं.१ चे पती व अर्जदार नं.२ व ३ यांचे वडील **नामे रामदास रामचंद्र ठाकरे** हे दि.**०९.०९.२०२५** रोजी धामणगांव, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे मयत झालेले आहेत. तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय व निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदाराशिवाय ईतर कोणीही वारस नाही. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक १६.१२.२०२५

आदेशानुसार,
शिक्का **सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय,(क.स्तर) मोर्शी

## जाहीर सुचना

सर्वत्र लोकांना कळविण्यात येते की, माझे पक्षकार **रितुश्री हर्षल गेडाम,** रा.दाभा, ता.नांदगांव खंडे., जि.अमरावती यांनी **पद्माबाई उत्तमराव गेडाम, सोपान उत्तमराव गेडाम, सोनाली अतूल नागपुरे, अतुल हरिदास नागपुरे व गणेश उत्तमराव अविनाशे** यांचे विरुध्द मौजा दाभा, ता.नांदगांव खंडे., जि.अमरावती येथील शेत सर्व्हे नं.१०६/१, क्षेत्र ० हे.८१ आर या शेतजमिनीबाबत व ईतर मिळकतीबाबत वाटणी करुन ताबा मिळण्याकरीता माझे पक्षकाराने दिवाणी न्यायालयात दावा दाखल केला असून सदर दाव्याचा नंबर नियमित दिवाणी दावा नं.४०९/२०२५ असा असून सदरचा दावा हा विद्यमान ५ वे सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर, अमरावती यांचे न्यायालयात प्रलंबित आहे.

तरी या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, वरील मिळकतीसंबंधी वाद न्यायपविष्ठ असल्यामुळे सदरच्या मिळकतीबाबत कोणीही कोणत्याही प्रकारचा हस्तांतरणाचा व्यवहार कोणासोबतही करु नये. केल्यास तो माझे पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

**स्थळ- अमरावती**
**दिनांक १९.१२.२०२५**

रितुश्री हर्षल गेडाम तर्फे
**(अधिवक्ता प्रसाद ह.पिंपळगांवकर)**
**गोविंद,** वैभव कॉलनी, बायपास रोड,
अमरावती-४४४६०७
मो.नं.९८२३७४८२७०

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,

**वि.श्री.एस.बी.कळदाते, २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२६७८/२०२५
**शिवदास व ईतर -वि- निरंक**
पुढील ता.२१.०१.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** 1. Shivdas Rajendra Tayde
Age 33 Yrs. Occu.: Labour
R/o Budhawara Chowk, Shirala, Tq. Dist. Amravati.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **सुनिता राजेंद्र तायडे** हे दिनांक 26.04.2021 रोजी **नेरुल, नवी मुंबई** येथे मयत झाले. अर्जदार **शिवदास व ईतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **शिवदास व ईतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **२९.११.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशानुसार,
शिक्का **सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

## तहसिलदार मोर्शी यांचे कार्यालय

रा.मा.क्र./ ५९(२९)/आखतवाडा/२०२५-२०२६

**जाहीरनामा**

ज्या अर्थी प्रकरणात अर्जदार श्री सरीचंद सेबला राठोड व किसन कोसरे रा.अंबाडा यांनी मौजा इरुर येथील शेत सर्वे नं. २०/४ क्षेत्र २.३९ हे आर या शेताचे ७/१२ वरील इतर अधिकारातील गोमाजी लोणारी हे नाव कमी करणेबाबत या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

त्या अर्थी प्रकरणात ज्या कोणास आक्षेप वा हरकती घ्यावयाच्या असेल त्यांनी जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून **१५ दिवसाचे आत** गैरअर्जदार किंवा त्यांचे वतीने उपस्थित राहून आपले म्हणणे मांडावे अन्यथा सदर प्रकरणात एकतर्फी कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**दिनांक - १८.१२.२०२५**

शिक्का **सही /-**
**तहसिलदार, मोर्शी**

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती

**वि.श्री.आर.आर.खामतकर ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (कनिष्ठ स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज - २८५१/२०२५**
**श्रीमती सुंनदा अधिक तीन विरुध्द निरंक**
**पुढील तारीख १७.०१.२०२६**

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार : 1) **Sunanda Devidasrao Garad ,** Age 75 yrs., Occu.- Household
2) **Praful Devidasrao Garad,** Age 49 yrs., Occu.- Business
1 & 2 both R/o. Near Sakah Mangalam, Kamal Colony, Rukhmini Nagar, S/o. Tq. & Dist. Amravati
3) **Mohini Prashant Dhawale,** Age 54 yrs., Occu.- Household R/o. Old Bypass Road, Samara Nagar No. 1, Amravati, Tq. & Dist. Amravati
4) **Manisha Pravin Hinge,** Age 51 yrs., Occu.- Household R/o. Plot No.32, Pandharkawada Road, Near Yavatmal, Tq. & Dist. Yavatmal.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :- निरंक**

सर्वत्र लोकास सुचित करण्यात येते की, **मयत देविदास महादेवराव गरड हे दि.२६.०७.२०१२** रोजी अमरावती, ता.जि.अमरावती येथे मयत झाले. **अर्जदार सुंनदा अधिक तीन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे ह्या कोर्टात सदरहू **मयत** यांचे वारसांचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **श्रीमती सुंनदा अधिक तीन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदरहू मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर ह्या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने ह्या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि ह्या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदरहू **मयत** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज **दिनांक १६.१२.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशान्वये,
शिक्का **सहायक अधीक्षक,**
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अमरावती

## जाहीर नोटीस

**विद्यमान २ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती**

आर.एम.जे.सी.क्र.७११/२०२५ ने.ता.२९.०१.२०२६

**अर्जदार :** १. श्रीमती लीला शामराव पेटले, वय ६९ धंदा - घरकाम
२. विलास शामराव पेटले, वय ४८ धंदा - नोकरी
३. मनिष शामराव पेटले, वय ४५ धंदा - नोकरी
४. संदीप शामराव पेटले, वय ४३ धंदा - शेती
अर्जदार नं.१ ते ४ रा. पो.शिरजगांव कसबा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
अर्जदार नं.२ रा.पो.प्रसाद कॉलनी, जठारपेठ अकोला, जि.अकोला
अर्जदार नं.३ रा.पो. अमरदीप सोसायटी, कारेगांव, ता.जि.पुणे

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ ८ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **शामराव गणपतराव पेटले** यांचा मृत्यू दिनांक **०७.१२.२००८** रोजी रा.शिरजगांव कसबा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झाला. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदार यांना कार्यालयीन तसेच शैक्षणिक कामाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.७११/२०२५** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.**१७.१२.२०२५** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

आदेशानुसार,
शिक्का **सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,
चांदूर बाजार

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,

**वि.श्रीमती एन.सी.सोरटे, ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२६९३/२०२५
**श्रीमती रेखा अधिक तीन -वि- निरंक**
पुढील ता.०६.०१.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** 1. Rekha Rajkumar Devgikar, Age 40 Yrs. Occu.: Household
2. Atul Rajkumar Devgikar, Age 21 Yrs. Occu.: Labour
3. Rupali Rajkumar Devgikar, Age 20 Yrs. Occu.: Household
All R/o Mahadeo Khori, Near Hanuman Mandir, Amravati
4. Kalpana Navin Raut, Age 22 Yrs. Occu.: Household
R/o Dahoda, Po.Pathara, Tq.Ramtek, Dist. Nagpur.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **राजकुमार बळीरामजी देवगीकर** हे दिनांक 22.09.2023 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **रेखा अधिक तीन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **रेखा अधिक तीन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **०३.१२.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशानुसार,
शिक्का **सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

## दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर,

**वि.श्री.आर.आर.खामतकर, ५ वे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र.२७९२/२०२५
**श्रीमती सुनंदा अधिक तीन -वि- निरंक**
पुढील ता.१५.०१.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :** 1. Smt.Sunanda Dadarao Gaygole, Age 62 Yrs. Occu.: Household
2. Nilesh Dadarao Gaygole, Age 42 Yrs. Occu.: Pvt.Service
3. Mangesh Dadarao Gaygole, Age 41 Yrs. Occu.: Service
4. Charushila Dadarao Gaygole, Age 36 Yrs. Occu.: Service
All R/o Ekvira Vidyut Colony, Nawasari V.M.V. Amravati.

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** Nil

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **दादाराव श्रीरामजी गायगोले** हे दिनांक 14.03.2025 रोजी **अमरावती, ता.जि.अमरावती** येथे मयत झाले. अर्जदार **सुनंदा अधिक तीन विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **सुनंदा अधिक तीन विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदर्हु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदर्हु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदर्हु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदर्हु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक **१५.१२.२०२५** रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशानुसार,
शिक्का **सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर
अमरावती

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त



### जि.प शाळेतील सीईओनी साधला विद्यार्थ्यांशी संवाद

**तिवसा**-जि.प.च्या सीईओ संजिता महापात्र यांनी मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान अंतर्गत तिवसा तालुक्यात दौऱ्यावर असताना, जिल्हा परिषद शाळा करजगाव येथे भेट दिली व विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधला. यावेळी त्यांनी शालेय परिसर पाहणी, संगणक कक्ष, स्वच्छतागृहे, शालेय पोषण आहार, शालेय परसबाग, व शाळेतील विविध उपक्रमांची पाहणी केली तसेच शाळेतील आनंददायी वातावरण पाहून सर्व विद्यार्थी, शाळेचे मुख्याध्यापक अविनाश गंजीवाले, शिक्षिका सविता पारसे, वृषाली बंड यांचे कौतुक केले. यावेळी त्यांच्यासोबत गटविकास अधिकारी अभिषेक कासोदे, गटशिक्षणाधिकारी डॉ. नितीन उंडे, सहाय्यक गटविकास अधिकारी अमझरे साहेब, उलेमाले साहेब, गावचे सरपंच आशिष बांबल, ग्रामसेवक नरेंद्र पवार आदी मान्यवर उपस्थित होते. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विद्यार्थ्यांशी थेट संवाद साधल्यामुळे विद्यार्थी व शिक्षकांमध्ये नवीन ऊर्जा निर्माण झाली. यावेळी त्यांनी गावातील इतर उपक्रमांची सुद्धा पाहणी केली.

### गटविकास अधिकारी म्हणून भोरखडे यांची नियुक्ती

**धामणगाव रेल्वे :** स्थानिक पंचायत समितीमध्ये गत अनेक महिन्यांपासून रिक्त असलेल्या गटविकास अधिकारीपदी पी.जी. भोरखडे यांची नियुक्ती करण्यात आली. वाशिम जिल्ह्यातील मानोरा येथून त्यांची नुकतीच बदली करण्यात आली.



### कौस्तुभ आखरे व प्रसन्न अंबाडकर राज्यस्तरीय धनुर्विद्या स्पर्धेसाठी निवड

**अमरावती-** क्रीडा व युवक संचालनालय, पुणे व अमरावती जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय तसेच अमरावती डिस्ट्रिक्ट आर्चरी असोसिएशन यांच्या सहकार्याने झालेल्या जिल्हा व विभागीय धनुर्विद्या स्पर्धेत भारतीय विद्या मंदिरद्वारा संचालित भारतीय कनिष्ठ महाविद्यालय, राजापेठ येथील कौस्तुभ आखरे व प्रसन्न अंबाडकर यांनी प्रथम क्रमांक पटकावून राज्यस्तरीय स्पर्धेसाठी पात्रता मिळवली आहे.१८ ते २० डिसेंबर २०२५ दरम्यान अमरावती जिल्हा क्रीडा संकुल, विद्यापीठ येथे होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेत ते सहभागी होणार आहेत. या यशाबद्दल संस्था अध्यक्ष डॉ. सतीश कुळकर्णी, सचिव अनंत सोमवंशी, प्राचार्य डॉ. आराधना वैद्य, प्रा. राहुल पवार तसेच सर्व प्राध्यापक, कर्मचारी व अमरावती आर्चरी असोसिएशनने त्यांचे अभिनंदन केले आहे.

# टीईटी परीक्षा सक्तीचा फटका

## सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाने शिक्षक पदोन्नतीला ब्रेक

**अमरावती/का.प्र.**

शिक्षक सेवेत कायम राहण्यासाठी व पदोन्नती करिता टीईटी परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असल्याचा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. या सर्वोच्च निकालामुळे शिक्षण विभागातील विविध पदांच्या पदोन्नतीला ब्रेक लागला आहे. राज्यातील एकाही जिल्हा परिषदेने सर्वोच्च न्यायालयाने टीईटीबाबत दिलेल्या निकालानंतर पदोन्नती प्रक्रिया राबवलेली नाही. ही पदोन्नती थांबल्याने निवृत्तीच्या अखेरच्या टप्प्यात असलेल्या व पदोन्नतीसाठी पात्र असलेल्या शिक्षक वर्गात मोठी नाराजी आहे.सर्वोच्च न्यायालयाने एक सप्टेंबर रोजी टीईटी परीक्षेबाबत निकाल दिला. न्यायालयाच्या या निर्णयावर केंद्र शासन व राज्य शासनाने कोणतेही आदेश अद्याप काढलेले नाहीत. मात्र, तरीही सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानंतर गेल्या चार महिन्यांत राज्यातील कोणत्याही जिल्ह्यात पदोन्नती प्रक्रिया राबविलेली नाही.शिक्षण विभागात विषय शिक्षक, मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख व शिक्षण विस्तार अधिकारी अशा पदांवर पदोन्नती दिली जाते. सेवाज्येष्ठतेने ही पदोन्नती देतात. सेवानिवृत्तीच्या शेवटच्या दोन-चार वर्षांत ही पदोन्नती मिळते.टीईटीच्या निर्णयानंतर काही राज्य सरकारांनी पुनर्विचार याचिका दाखल केल्या आहेत. महाराष्ट्र शासनानेही पुनर्विचार याचिका दाखल करावी, यासाठी शिक्षक संघटनांनी मोर्चा, शाळा बंद आंदोलने केली.दिल्ली येथे सुरू असलेल्या अधिवेशनात खासदार धैर्यशील माने यांनी टीईटीबाबत केंद्र शासनाने पुनर्विचार याचिका दाखल करण्याची लक्षवेधीद्वारे मागणी केली. शिवाय अनेक खासदारांनी याबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदींना भेटून निवेदन सादर केले.नागपूरच्या हिवाळी अधिवेशनात अनेक आमदारांनी टीईटीबाबत आवाज उठविला. यावर टीईटी संदर्भात निर्णय घेण्यासाठी राज्य शासनाने समिती स्थापन करण्याचा निर्णय जाहीर केला. अमरावतीत केंद्रप्रमुख,मुख्याध्यापक पदोन्नतीचे आदेश रखडल आहे.या मागणी करीता शिक्षक-शिक्षकेत्तर संघटना समन्वय समितीने राज्यव्यापी ५डीसेंबरला सर्व जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चे आणि धरणे आंदोलन केले होते.तसेच ९डीसेंबरला नागपूर हीवाळी अधिवेशनावर शिक्षकांनी भव्य मोर्चा काढला होता.या मोर्चात राज्यभरातुन हजारो शिक्षक सहभागी झाले होते.

# अमरावती विभाग शिक्षक मतदार संघाची प्रारुप यादी प्रसिद्ध

## लिंकवर मतदारांना शोधता येणार आपले नाव

**अमरावती -** भारत निवडणूक आयोगाने अमरावती विभाग शिक्षक विधानपरिषद मतदार संघासाठी नव्याने मतदार याद्या तयार करण्याचा कार्यक्रम घोषित केला आहे. यानुसार, ३ डिसेंबर २०२५ रोजी शिक्षक मतदार संघाची प्रारुप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली असून, मतदारांना आता घरबसल्या आपले नाव ऑनलाइन शोधता येणार आहे. विभागीय आयुक्त कार्यालय आणि विभागातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांमध्ये ही यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे.दि १ नोव्हेंबर २०२५ या अर्हता दिनांकावर आधारित ही प्रक्रिया राबविण्यात येत आहे. ऑनलाइन नाव शोधण्यासाठी अधिकृत लिंक शिक्षक मतदारांच्या सुविधेसाठी मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र यांनी संकेतस्थळ https://ceoelection.maharashtra.gov.in/ConstituencyRolls/TandGElectoralRollsSimple.aspx उपलब्ध करून दिले आहे.

अमरावती विभागातील सर्व पात्र शिक्षकांनी या प्रारुप यादीमध्ये आपले नाव असल्याची खात्री करावी. याबाबत अधिक माहिती हवी असल्यास संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाच्या निवडणूक शाखेशी संपर्क साधावा, असे आवाहन उप-जिल्हा निवडणूक अधिकारी शिवाजी शिंदे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

### शुक्रवारी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन शिबिर
## आयएएस आकाश वर्मा, उपजिल्हाधिकारी सुनील टाकळे यांचे मार्गदर्शन

**अमरावती**-जिल्हा प्रशासन अमरावती यांच्या वतीने स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी 'स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन शिबिर क्र. ३' चे आयोजन करण्यात आले आहे. शिबिर दि. १९ डिसेंबर रोजी दुपारी ३ वाजता जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन भवनात पार पडणार आहे.मार्गदर्शन शिबिरात केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत देशात २० वा क्रमांक पटकावणारे आयएएस अधिकारी आकाश वर्मा आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षेत राज्यात ८ व्या क्रमांकाने उत्तीर्ण झालेले उपजिल्हाधिकारी सुनील टाकळे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत.सदर शिबीर सर्व विद्यार्थ्यांसाठी पूर्णपणे विनामूल्य आहे. या शिबिरात यूपीएससी आणि एमपीएससी परीक्षांची तयारी कशी करावी, अभ्यासाचे नियोजन आणि यशाची सूत्रे यावर सविस्तर चर्चा केली जाणार आहे. जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# मुख्य कार्यकारी अधिकारी सीईओ यांची सालोरा बु.शाळेला भेट

**कुऱ्हा -** जि.प. पूर्व माध्य. मराठी शाळा, सालोरा बु पं. स. तिवसा येथे मा. संजिता महापात्र मुख्यकार्यकारी अधिकारी,जि प.अमरावती यांनी भेट दिली. सालोरा शाळेचे शैक्षणिक व सहशैक्षणिक कामकाज, शिस्तबद्ध वातावरण तसेच विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त व आत्मविश्वासपूर्ण प्रतिसाद पाहून मा. मुख्य कार्यकारी अधिकारी (सीईओ) अत्यंत प्रभावित झाले. शाळेत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांमधून विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानासोबतच कौशल्य, सर्जनशीलता व मूल्याधारित शिक्षणाची जोपासना होत



असल्याचे त्यांनी नमूद केले. विद्यार्थ्यांनी सादर केलेले उपक्रम, प्रश्नोत्तरांमधील त्यांचा सहभाग, स्वच्छ व नीटनेटकी शाळा परिसर, शिक्षकांचे नियोजनबद्ध अध्यापन व व्यवस्थापन यामुळे शाळेची गुणवत्ता अधोरेखित झाली. शिक्षकवृंदाची मेहनत, विद्यार्थ्यांशी असलेले आपुलकीचे नाते व पालकांचा सकारात्मक सहभाग यामुळेच शाळेने ही उंची गाठली असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

या भेटीदरम्यान मा. सीईओ यांनी शाळेच्या कार्याचे मनापासून कौतुक करून विद्यार्थ्यांना पुस्तके व शालोपयोगी वस्तू भेट देवून विद्यार्थ्यांसोबत भोजन केले भविष्यातही अशाच नाविन्यपूर्ण उपक्रमांतून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवावा, अशा शुभेच्छा दिल्यात.

सोबत मा. अभिषेक कासोदे गटविकास अधिकारी तिवसा, मा.नारायण आमझरे सहा.गविअ,मा. डॉ. नितीन उंडे गटशिक्षणाधिकारी, मा. राठोड विस्तार अधिकारी, मा. उलेमाले विशिअ उपस्थित होते. सालोरा बु. शाळेचा हा गौरव संपूर्ण शिक्षकवृंद, विद्यार्थी व पालकांसाठी प्रेरणादायी असेल.असे मत डॉ नितीन उंडे गटशिक्षणाधिकारी पं.स.तिवसा यांनी व्यक्त केले.

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महत्त्वाचे-प्रा.डॉ.प्रमोद गारोडे

**परतवाडा/वार्ताहर**

स्थानिक आय. ई. एस. गर्ल्स कनिष्ठ महाविद्यालयात भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालयाच्या वतीने स्कूल कनेक्ट कार्यक्रम अंतर्गत 'राष्ट्रीय शैक्षणिक धोरण – २०२०' या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा. डॉ. प्रमोद गारोडे यांनी विद्यार्थ्यांना राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० चे महत्त्व सविस्तरपणे विशद केले.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आय. ई. एस. गर्ल्स कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्य सौ. विद्याताई मुऱ्हेकर उपस्थित होत्या. तर प्रमुख अतिथी म्हणून प्रा. डॉ. सतीश भागवत, पर्यवेक्षक अरुण राणे, प्रा. डॉ. भैय्यासाहेब चिखले, प्रा. बबलू मासोदकर यांची उपस्थिती होती.यावेळी मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. प्रमोद गारोडे म्हणाले की, राष्ट्रीय शैक्षणिक धोरण- २०२० हे केवळ अभ्यासक्रमापुरते मर्यादित नसून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देणारे धोरण आहे. या धोरणामुळे विद्यार्थ्यांमध्ये सर्जनशीलता, चिकित्सक विचार, संवादकौशल्य, नैतिक मूल्ये व जीवनोपयोगी कौशल्ये विकसित होण्यास मदत होईल. शिक्षणात लवचिकता, कौशल्याधिष्ठित शिक्षण, बहुविषयक अभ्यासक्रम व व्यावसायिक शिक्षणाला चालना देण्याचे महत्त्व त्यांनी अधोरेखित केले. तसेच, विद्यार्थ्यांनी बदलत्या काळाशी सुसंगत राहून नव्या संधींचा लाभ घ्यावा, आत्मविश्वासाने आपले ध्येय निश्चित करावे आणि शिक्षणाचा उपयोग समाजहितासाठी करावा, असे आवाहनही त्यांनी केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. सतीश भागवत यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. रवींद्र श्रीनाथ यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. डॉ. भैय्यासाहेब चिखले यांनी केले.या कार्यक्रमाला आय. ई. एस. गर्ल्स कनिष्ठ महाविद्यालयातील प्रा. स्नेहा तनपुरे, प्रा. प्राजक्ता इंगळे, प्रा. शुभांगी गोहत्रे, प्रा. कविता वडस्कर, प्रा. प्राजक्ता करकरे, प्रा. विजय सातपुते यांच्यासह मोठ्या संख्येने कनिष्ठ महाविद्यालयीन विद्यार्थिनी उपस्थित होत्या. स्कूल कनेक्ट कार्यक्रमांतर्गत आयोजित या मार्गदर्शनपर व्याख्यानाचा विद्यार्थ्यांना निश्चितच लाभ झाला, उपस्थितांनी व्यक्त केले.

# साऊर येथे श्रीमद्भागवत ज्ञानयज्ञ सप्ताहाचे आयोजन

## १८ ते २५ डिसेंबरदरम्यान विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम

**टाकरखेडा संभू/वार्ताहर**

येथे कर्मयोगी श्री संत गाडगे महाराज पुण्यतिथी, डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख जयंती व कै. बापुरावजी बोंडे (पाटील) स्मृती महोत्सवानिमित्त श्रीमद्भागवत ज्ञानयज्ञ सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमाची सुरुवात गुरुवार, १८ डिसेंबर २०२५ रोजी होऊन गुरुवार, २५ डिसेंबर २०२५ रोजी समारोप होणार आहे.

या सप्ताहात ह.भ.प. सु. श्री स्नेहगंगाश्रीजी माई (आळंदी, पुणे) यांच्या अमृतमय वाणीतून भागवत कथा होणार असून, सकाळी सामूहिक ध्यान-रामधून, दुपारी भागवत कथा, सायंकाळी सामुदायिक प्रार्थना, हरिपाठ तसेच रात्री हरिकर्तन व




भजन संध्या असे दैनंदिन कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. २० डिसेंबर : पंचरंगी भारुड – ह.भ.प. श्री निंबाजी महाराज तागड, २१ डिसेंबर : जाहीर कीर्तन-हभप. श्री नारायणदास महाराज पडोळे,२२ डिसेंबर : हरिकिर्तन – हभप. श्री अनिल महाराज साखरे, २३ डिसेंबर : राष्ट्रीय कीर्तन – हभप. श्री शुकदासजी महाराज गाडेकर, २४ डिसेंबर : भजन संध्या – श्री दिनेशजी शर्मा, २५ डिसेंबर : सकाळी भव्य दिंडी सोहळा, दुपारी काल्याचे हरिकिर्तन (ह.भ.प. श्री संदिप महाराज गिरी) व महाप्रसाद; सायंकाळी समारोपीय कार्यक्रम होईल, दिंडी सोहळ्यात साऊर व परिसरातील विविध भजनी मंडळे व वारकरी दिंड्यांचा सहभाग राहणार आहे. बाहेरगावाहून येणाऱ्या भाविकांसाठी वाहन सेवेचीही व्यवस्था करण्यात आली आहे. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्री गुरुदेव सेवा मंडळ, संत गाडगेबाबा भजनी मंडळ, समस्त गावकरी मंडळी व विविध संस्था सहकार्य करीत आहेत. भाविकांनी कुटुंबासह उपस्थित राहून या धार्मिक सोहळ्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# भातकुली मुलांच्या शाळेत शिक्षण परिषद

**भातकुली**-पंचायत समिती भातकुली मधिल जिल्हा परिषद प्राथमिक मराठी मुलांची शाळा, भातकुली येथे भातकुली केंद्राची शिक्षण परिषद झाली.शिक्षण परिषदेत चे अध्यक्ष शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष आ. दिनेश खेडकर हे होते तर प्रमुख अतिथी म्हणून शाळा समितीचे सदस्य विष्णु जाधव, श्रीकांत खरबडे होते. तर मार्गदर्शक म्हणून केंद्राचे केंद्रप्रमुख राजेंद्रजी नकाशे व आसरा केंन्दाचे केंद्र प्रमुख शैलेश दहातोंडे तसेच सतीश वानखडे होते.कार्यक्रमाची सुरुवात क्रांतीज्योती सावित्रीबाई



फुले यांच्या प्रतिमेचे पूजन तथा दीप प्रज्वलन करून मान्यवरांच्या हस्ते करण्यात आली.त्यानंतर सामूहिक प्रार्थना घेऊन, मान्यवरांचे स्वागत गीताने शाळेच्या विद्यार्थ्यांनी स्वागत केले. त्यानंतर मान्यवरांचे पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. शिक्षण परिषदेचे प्रास्ताविक नकाशे साहेब (कें. प्र.)यांनी केले तर आ.श्रीकांत खरबडे तथा आ. सतीश वानखडे,आ. रामकृष्ण चव्हाण यांनी शिक्षण परिषदेला मार्गदर्शन केले. यावेळी सकारात्मक शिक्षण, शिष्यवृत्ती,जानेवारीचे मासिक नियोजन यावर मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वप्नाली खर्चान यांनी केले तर आभार प्रदर्शन अर्चना सावरकर यांनी केले. शिक्षण परिषद सर्वांनी सुरुची भोजनाचा आस्वाद घेतला व शिक्षण परिषदेची सांगता राष्ट्रवंदनांनी करण्यात आली अशाप्रकारे भातकुली केंद्राची शिक्षण परिषद उत्साहात पार पडली.

## निधन

### कलावंती साठवणे

**कुऱ्हा**-श्री क्षेत्र जहागीरपूर येथील मंदिरासमोरील बेल फुल व



प्रसाद विक्रेते धनराज चंपतराव साठवणे यांच्या मातोश्री ग.भा.कलावंती चंपतराव साठवणे यांचे वयाच्या ७५ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले.त्यांच्या पश्चात दोन मुले,एक मुलगी, जावाई, स्नुषा, नातू नातवंड असा बराच मोठा आप्त परिवार आहे स्व.कलावती साठवणे यांच्या अंत्यविधी करिता सर्वच स्तरांवरील नातेवाईक व गावकरी उपस्थित होते. यावेळी सामुहिक श्रध्दांजली वाहण्यात आली.

### अनिल खारकर



**वाठोडा खुर्द**-येथील रहिवाशी श्री अनिल शेषरावजी खारकर यांचे वयाच्या ६७ व्या वर्षी दिनांक १६ डिसेंबर ला आकस्मिक निधन झाले. त्यांच्यावर स्थानिक स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. प्रसंगी पंचक्रोशीतील गणमान्य नागरिक उपस्थित होते. त्यांचे मागे पत्नी, मुलगा, तीन भाऊ, बहीण असा मोठा आप्त परिवार आहे.

# सोमठाणा खुर्द येथील प्रकल्पग्रस्तांना मोबदला मिळणार

## कागदपत्रे सादर करण्याचे अकोट वन्यजीव विभागाचे आवाहन

**अमरावती/का.प्र.**

मेळघाट व्याघ्र प्रकल्पांतर्गत मौजे सोमठाणा खुर्द या गावाचे पुनर्वसन सन २०१३-१४ मध्ये करण्यात आले असून, या गावातील ४२ शेतमुल्यांकनधारक व २१ वनहक्कधारक यांना आता नवीन भूसंपादन कायद्यानुसार शेतीची एक पट रक्कम व त्यावरील ३० टक्के दिल्याचा रक्कम अदा करण्यात आलेले आहे.

भूसंपादन कायदा २०१३ नुसार, मौजे सोमठाणा खुर्द येथील ४२ शेतमल्यांकनधारक व २१ हक्क धारक यांच्यासाठी निधी उपलब्ध झाला असून शेतमुल्यांकन व वन हक्कधारक यांना शेतीचा मोबदला रक्कम वितरित करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

उपवनसंरक्षक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अकोट वन्यजीव विभाग यांनी यासंदर्भात माहिती दिली असून उर्वरित लाभार्थ्यांनी आवश्यक कागदपत्रे तातडीने सादर करण्याचे आवाहन केले आहे.मौजे सोमठाणा खुर्द येथील पुनर्वसन अधिनियम १९९९ च्या तरतुदींनुसार झाले होते. सुरुवातीला शासन निर्णयानुसार ४२ शेतमुल्यांकनधारक व २१ वनहक्कधारक यांना शेतीच्या मूल्यांकनाची १ पट रक्कम आणि त्यावर ३० टक्के दिलासा रक्कम देण्यात आली होती. मात्र, केंद्र शासनाचा भूसंपादन अधिनियम २०१३ लागू झाल्याने आणि नवीन धोरणानुसार जमिनीचा मोबदला वाढीव दराने मिळणे अपेक्षित असल्याने, आता या लाभार्थ्यांना मुल्यांकनाच्या ४ पट रक्कम देय ठरली आहे.

त्यानुसार, यापूर्वी अदा केलेली १ पट रक्कम व ३० टक्के दिलासा रक्कम वजा करून उर्वरित मोबदला वितरित करण्यासाठी निधी उपलब्ध झाला आहे.काही लाभार्थ्यांना यापूर्वीच रक्कम अदा करण्यात आली आहे, परंतु उर्वरित शेतमुल्यांकनधारक व वनहक्कधारकांनी अद्याप आवश्यक कागदपत्रे सादर केलेली नाहीत. यामुळे प्रशासनाला देय रक्कम वितरित करण्यात तांत्रिक अडचणी येत आहेत. तरी संबंधित लाभार्थ्यांनी १०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरवर अर्ज, बँक पासबुकची छायाप्रत, शेतीचा ७/१२ उतारा आणि मूळ खातेदार मयत असल्यास वारस प्रमाणपत्र व वारसाच्या बँक खात्याची छायाप्रत अकोट वन्यजीव विभाग कार्यालयात तात्काळ जमा करावी लाभार्थ्यांची नावनिहाय यादी महाराष्ट्र वनविभागाच्या www.mahaforest.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून, ग्रामस्थांनी या सुविधेचा लाभ घेऊन आपला प्रलंबित मोबदला प्राप्त करून घ्यावा, असे आवाहन अकोट वन्यजीव विभाग उपवनसंरक्षक आर. एस. टोलिया यांनी केले आहे.

## सैनिक कल्याण विभागात ७२ लिपिक पदांची भरती; ३१ डिसेंबरपर्यंत ऑनलाईन अर्जाची मुदत

**अमरावती-** महाराष्ट्र राज्य सैनिक कल्याण विभाग, पुणे आणि त्यांच्या अधिपत्याखालील विविध जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयांमध्ये 'लिपिक टंकलेखक (गट-क)' या संवर्गातील एकूण ७२ रिक्त पदांच्या भरतीसाठी प्रक्रिया राबविण्यात येत असून पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

या भरती प्रक्रियेत महाराष्ट्र राज्याचे अधिवास असलेले माजी सैनिक तसेच शासन निर्णयानुसार युद्ध काळात किंवा शांततेच्या काळात सैनिकी सेवेत कार्यरत असताना शहीद झालेल्या किंवा अपंगत्वामुळे नोकरीसाठी अयोग्य ठरलेल्या माजी सैनिकांच्या कुटुंबातील एका वारसदाराला पात्रतेनुसार अर्ज करता येणार आहे. एकूण ७२ पदांपैकी ३ पदे किमान ४० टक्के दिव्यांगत्व असलेल्या उमेदवारांसाठी राखीव ठेवण्यात आली असून, दिव्यांगत्वाच्या प्रकारानुसार व गुणवत्तेनुसार ही निवड केली जाणार आहे.या संपूर्ण भरती प्रक्रियेसाठी ऑनलाईन पद्धतीनेच अर्ज स्वीकारले जाणार आहेत. इच्छुक उमेदवारांनी विभागाचे अधिकृत संकेतस्थळ www.mahasainik.maharashtra.gov.in यावरील 'Resources' आणि 'Recruitment' टॅबमध्ये जाऊन ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत आपले अर्ज सादर करणे बंधनकारक आहे. विहित मुदतीनंतर वेबलिंक बंद होणार असून इतर कोणत्याही माध्यमातून आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत, असे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, यांनी कळविले आहे.

# वाळू तस्करांचा पोलिसांवर हल्ला


## एक जखमी, जीव वाचवण्यासाठी पोलिसांकडून हवेत फायर




**यवतमाळ/प्रतिनिधीः-** जिल्ह्यातील महागाव तालुक्यातील मोरथ- वाकोडी नदीपात्रातून रेतीची तस्कारी सुरू असताना पोलिसांनी धाड टाकली. कारवाई करण्यासाठी आलेल्या पोलिसांवरच काही जणांनी हल्ला केला. जीव वाचविण्यासाठी पोलिसांना अखेर हवेत दोन राऊंड फायर करावे लागले, त्यानंतर हल्लेखोर पसार झाले. या हल्लयात सहायक पोलिस निरीक्षक जखमी झाले आहेत. ही घटना आज गुरूवार १८ डिसेंबरच्या सकाळी १० वाजता घडली. यामुळे संपूर्ण पोलिस दलात खळबळ उडाली आहे. पोलिस अधीक्षक कुमार चिंता घटनास्थळी दाखल झाले आहे. हल्लेखोरांपैकी दोघांना महागाव पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. सहायक निरीक्षक सुनील अंभोरे असे जखमी अधिकाऱ्याचे नाव आहे. ते पथकासह कारवाई करत असताना पाच जणांनी त्यांच्यावर हल्ला केला, तुफान हाणामारी झाली, शेवटी स्वतःच्या बचावा करिता अंभोरे यांनी गोळीबार केल्याचे प्रत्यक्षदर्शी कडून सांगण्यात येत आहे. आरोपीच्या काही नातेवाईकांना महागाव पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. पोलिस कारवाईत शेख गुलाब (वय २५) हा तरुण जखमी झाल्याची माहिती आहे. त्याला पुसद येथे उपचारासाठी दाखल केले आहे. या घटनेला ठाणेदार (पान २ वर)

# जिल्हाधिकारी कार्यालयाला बॉम्बने उडवण्याची धमकी; प्रशासनात खळबळ

## अज्ञात ई-मेलमुळे दहशत, पोलीस व बॉम्बशोधक पथकाकडून सखोल तपास

**अकोला/प्रतिनिधीः-** स्थानिक जिल्हाधिकारी कार्यालयाच्या शासकीय ई-मेल आयडीवर अज्ञात व्यक्तीने नवनिर्मित इमारत बॉम्बने उडवण्याची धमकी दिल्याने गुरुवारी सकाळी जिल्हा प्रशासनात एकच खळबळ उडाली. धमकीचा ई-मेल प्राप्त होताच प्रशासन व सुरक्षा यंत्रणा तत्काळ सतर्क झाल्या. प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता जिल्हा पोलीस अधीक्षकांना तात्काळ (पान २ वर)

# जबरी चोरी प्रकरणातील दोन आरोपी गजाआड



**-गुन्हे शाखेची कारवाई**

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरात घडलेल्या जबरी चोरीच्या गंभीर गुन्ह्याचा शहर गुन्हे शाखेने अवघ्या ८ तासांत छडा लावत दोन आरोपींना अटक केली आहे. आरोपींकडून चोरी केलेला (पान २ वर)

# भूभागाचा अभ्यास करून तातडीने भूकंप मापक यंत्र बसवणार

## प्रशांत कांबळे यांच्या ठिय्या आंदोलनानंतर तहसीलदारांचे लेखी पत्र



**तिवसा/प्रतिनिधीः-** शिवणगाव, शिरजगाव, शेंदोळा या गावात भूकंप सदृश्य धक्के येत असल्याने तातडीने भूकंप मापक यंत्र बसवण्याची मागणी केली होती. २६ नोव्हेंबर रोजी जिवॉलॉजिकल पथक शिवणगावात येऊन थातुरमातूर तपासणी करून भूकंप मापक यंत्र बसवण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, २३ दिवसानंतरही त्याची पूर्तता झाली नसल्याने अखेर सामाजिक कार्यकर्ते प्रशांत कांबळे यांच्या नेतृत्वात तिवसा तहसीलदार यांच्या कार्यालयात ठिय्या आंदोलन करण्यात आले. दरम्यान चार तास ठिय्या मांडल्यानंतर शिवणगाव येथील भुभागाचा अभ्यास करून जीएसआय विभाग भूकंप मापक यंत्र बसवण्यासाठी केंद्र सरकारची मान्यता मिळताच यंत्र तत्काळ बसवण्यात येणार असल्याचे लेखी आश्वासन तहसीलदार मयूर कळसे यांनी दिले आहे.

दुपारी १२.३० वाजता सुरू झालेल्या ठिय्या आंदोलनानंतर तहसीलदार कळसे यांनी जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांची भेट घेऊन संबंधित ठिय्या आंदोलनाची माहिती दिली. दरम्यान शिवनगाव आणि आजूबाजूच्या शिवारात येत असलेल्या भूकंप सदृश्य धक्क्यांमुळे (पान २ वर)

# प्रशिक्षणार्थी विद्यार्थ्यांना दिले निकृष्ट दर्जाचे मैदानी साहित्य

## -जिल्हाधिकारी यांच्याकडे तक्रार



**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत अल्पसंख्याक विभाग अंतर्गत निवड झालेल्या प्रशिक्षणार्थ्यांना निकृष्ट दर्जाचे मैदानी साहित्य दिल्याची तक्रार विद्यार्थ्यांनी आज गुरुवार १८ डिसेंबर रोजी जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे. निवेदनात म्हटले आहे की, विद्यार्थ्यांची हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ मध्ये पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षणासाठी निवड झाली आहे. संस्थेमार्फत (पान २ वर)

# इच्छुक उमेदवारांचे कॉँग्रेस भवनात शक्तिप्रदर्शन

## पहिल्या दिवशी शेकडो उमेदवारांनी दिल्या मुलाखती




**अमरावती/प्रतिनिधीः-** महानगरपालिका निवडणुकीचा बिगुल वाजल्यानंतर राजकीय पक्ष सक्रिय झाले आहे. उमेदवार निवडीसाठी इच्छुकांच्या मुलाखती सुरू आहे. भाजपाच्या मुलाखती झाल्यानंतर आता आज गुरुवार १८ डिसेंबर पासून शहर कॉँग्रेसच्या वतीने मुलाखती सुरू करण्यात आल्या आहे. गुरुवारी पहिल्या दिवशी शेकडो इच्छुक उमेदवारांनी कॉँग्रेस (पान २ वर)



## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे स्वागत

**अमरावती :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे अमरावती विमानतळ येथे आज (दि.१८) आगमन झाले. यावेळी जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. त्यानंतर अंजनगाव सुर्जी येथील नियोजित कार्यक्रमासाठी ते रवाना झाले.

# साडेसात फुटाच्या अजगराला जीवनदान!



**मोर्शी/प्रतिनिधीः-** मोर्शी लगतच असलेल्या मलिमपूर येथील एका शेतात साडेसात फुटाचा अजगर आढळून आला. भला मोठा अजगर दिसल्याने गावात एकच खळबळ उडाली. दि.१७ डिसेंबर रोजी मलिमपूर शेत शिवारातील काकपुरे यांच्या शेतात साडेसात फुटाचा भला मोठा अजगर गुंडाळून बसला असल्याचे आशिष मेश्राम यांना दिसताच घाबरलेल्या मेश्राम यांनी लगेच याबाबतची माहिती शेत मालकाला दूरध्वनीवरून दिली. क्षणाचाही विलंब न करता आशिष मेश्राम यांनी सर्पमित्र यांच्याशी संपर्क साधून लगेच त्यांना घटनास्थळी पाचारण केले. सर्पमित्र विजय फुसे, शेषाद्री वयले,विवेक सावरकर,प्रियांशु तायवाडे,भास्कर गोंढाणे,शेख तौसीफ, संदीप भलावी यांनी घटनास्थळी धाव घेऊन अवघ्या १५ मिनिटात त्या साडेसात फुटाच्या अजगराला रेक्सु करून सुरक्षितपणे (पान २ वर)

# शेतीसाठी दिवसा आठ तास वीज द्या

## महाराष्ट्र राज्य किसान सभेची मागणी




**नांदगाव खंडेश्वर/प्रतिनिधीः-** महाराष्ट्र राज्य किसान सभा शाखा- शिवणी रसलापूरच्या वतीनेही उपकार्यकारी अभियंता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी नांदगाव खंडेश्वर यांना शेतकऱ्यांच्या तक्रारी चे निवेदन देण्यात आले.जिल्ह्यातील काही तालुक्यांमध्ये दिवसा शेती करता आठ तास वीज मिळत आहे,तर आपल्या तालुक्यात का नाही? असा प्रश्न शेतकऱ्यांनी यावेळी केला.रात्रीच्या वेळी जंगली जनावरे व अति थंडी मुळे शेतकऱ्याच्या जीवाला धोका निर्माण झालेला असल्यामुळे दिवसा वीज देण्यात यावी.काही तांत्रिक अडचणीमुळे वेळापत्रकानुसार विद्युत पुरवठा खंडित झाला असल्यास ती वेळ पुढे भरून देण्यात यावी. रामपूर,एकलासपूर,शिवणी , पापळ,गावाजोर, तळेगाव,गावाशेजारी असलेले कृषी फीडर अंतर्गत येणाऱ्या डीपी ची मोठ्या प्रमाणात दुरावस्था झालेली आहे. त्यामध्ये फेज टाकण्याकरिता किटकॅट सुद्धा नाहीत, ओवर लोडिंग मुळे डीपी मध्ये केबल जळालेल्या अवस्थेत आहे. सब स्टेशन मधील कर्मचारी व वायरमन हे शेतकऱ्यांचे फोन उचलत नाहीत व त्यांना योग्य माहिती देत नाही.विद्युत पुरवठा हा जर शेतकऱ्यांना रात्रीच्या वेळी करत असाल तर (पान २ वर)

# राज्यस्तरीय शालेय आर्चरी क्रीडा स्पर्धेचे उद्‌घाटन

## आंतरराष्ट्रीय खेळाडूंसाठी ५० लाखांचा निधी उपलब्ध करून देणार

## -जिल्हाधिकारी आशिष येरेकर



**अमरावती/प्रतिनिधीः-** जिल्ह्यातील खेळाडू राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय आर्चरी स्पर्धेत प्राविण्य प्राप्त करतात. नैसर्गिक क्रीडा कौशल्य असूनही अत्याधुनिक साहित्याअभावी खेळाडू राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धेत कमी पडतात. यासाठी जिल्हा वार्षिक योजनेतील नाविण्यपूर्ण योजनेतून किमान १० ते १५ आंतरराष्ट्रीय खेळाडूंना ५० लाख रूपयांचा निधी उपलब्ध करुन देण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी आशिष येरेकर दिली.

राज्यस्तरीय शालेय आर्चरी क्रीडा स्पर्धेचे आयोजन जिल्हा क्रीडा संकुल येथील आंतरराष्ट्रीय आर्चरी रेंजवर दि. १७ ते २० डिसेंबर २०२५ या दरम्यान होत आहे. आज या स्पर्धेचे उद्‌घाटन पार पडले. यावेळी राज्य (पान २ वर)



# लिव्ह इनमध्ये राहणारी अल्पवयीन गरोदर

## -डफरीनमध्ये दाखल झाल्यावर उघड झाला प्रकार



**अमरावती/प्रतिनिधीः-** एका अल्पवयीन मुलीला लग्नाचे आमिष दाखवून गेल्या दीड वर्षापासून तिच्या सोबत लिव्ह इन मध्ये राहून तिला गरोदर केल्याचे प्रकरण खोलापुरी गेट पोलीस ठाणे हद्दीत समोर आले आहे. अल्पवयीनच्या माहितीच्या आधारावर पोलिसांनी आरोपी शेख सलमान शेख सलीम (वय २१ यास्मिन नगर) याच्याविरुद्ध कलम ६४(२),(एम) व पोक्सोचे कलम ४,६ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

माहितीनुसार आरोपी शेख सलमान गवंडी काम करतो. वर्ष २०२४ मध्ये त्याने पीडितेच्या घरी गवंडी काम केले होते. या दरम्यान त्याची पिडिते सोबत ओळख झाली. ही ओळख हळूहळू प्रेमात बदलली.एक दिवस (पान २ वर)

# आनंदवाडी कॅनलमध्ये तरुण गेला वाहून

## वडिलांच्या डोळयासमोर घडली घटना



**तिवसा/प्रतिनिधीः-** आनंदवाडी परिसरातील कॅनलमध्ये २१ वर्षीय मुलगा वडीलादेखत वाहून गेला.ओम अरविंद सहारे (अमरावती ) असे मुलाचे नाव आहे. आज गुरुवार १८ डिसेंबरच्या सकाळी ११.३० वाजताच्या सुमारास ही घटना घडली. माहितीनुसार ओम सहारे हा पाय धुण्यासाठी कॅनॉल जवळ गेला असतांना अचानक पाय घसरून तो प्रवाहात पडला. पाण्याचा वेग अधिक असल्याने काहीच वेळ्यात तो प्रवाहामध्ये वाहून गेला. ही संपूर्ण घटना त्याच्या वडिलांच्या (पान २ वर)

# आम आदमी पक्षाकडून उमेदवार घोषित




**अमरावती/प्रतिनिधीः-** महानगरपालिका निवडणुकीसाठी येत्या १५ जानेवारी रोजी मतदान होणार आहे. निवडणुकीसाठी प्रशासन सज्ज झाले आहे आणि राजकीय पक्ष देखील तयारी मध्ये लागले आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आम आदमी पार्टीच्या वतीने (पान २ वर)

# गुरुकुल आश्रम शाळेतून दोन विद्यार्थी बेपत्ता

## व्यवस्थापकाची ठाण्यात तक्रार

**तिवसा/प्रतिनिधीः-** स्थानिक गुरुदेव अध्यात्म गुरुकुल आश्रम शाळेतून दोन विद्यार्थी मंगळवारीं रात्री बेपत्ता झाल्याची घटना समोर आली आहे. यामुळे परिसरात खळबळ उडाली. व्यवस्थापक सुधीर मनोहर निस्ताने (वय ४१, गुरुदेव नगर ) यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल करून दोघांचा शोध सुरू केला आहे. ओम दामोदर सहारे (वय १५,हिरापूर निमखेड बाजार, ता. अंजनगाव सुर्जी ) व पारस बाळकृष्ण पिंपळकर (वय १४, नंदोरी, चंद्रपूर) असे बेपत्ता झालेल्या विद्यार्थ्यांचे नावे आहे. माहितीनुसार ओम आणि पारस मंगळवारी रात्रीपर्यंत आश्रम मध्ये होते. परंतु बुधवार सकाळ पासून ते कोणाला दिसले नाही. दैनंदिन कार्यातही त्यांचा सहभाग नव्हता. म्हणून शिक्षकांनी त्यांचा शोध घेतला (पान २ वर)